म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

# …द्ध तीर्थाटन

[…ारनाथ, बुद्धगया]

## आणि

# त्यापासून झालेला आत्मबोध

[भाग १ व २]

: लेखक :


ल. ना. अंकुश गुरुजी

REFBK-0013678

मूल्य : तीन रुपये



# माझे बौद्ध तीर्थाटन




लेखक ल. ना. अंकुश गुरुजी.

# माझें बौद्ध तीर्थाटन

[सांची, सारनाथ, बुद्धगया]

आणि

# त्यापासून झालेला आत्मबोध

[भाग १ व २]

महाराष्ट्र राज्य साहित्य नि संस्कृति मंडळाकडून रु. १००० चें अनुदान मिळाल्यामुळें लेखक आभारी आहे.

REFBK-0013678

ल. ना. अंकुश गुरुजी

मूल्य : तीन रुपये

प्र का श क

**ल. गो. पवार,**

अध्यक्ष–विचार विकास

अभ्यास मंडळ, मुंबई.

११/२० बी. आय. टी. चाळ,

मुंबई ११.

*

मु द्र क

**व. वि. आपटे,**

**हिंदुस्थान मुद्रणालय,**

८६५ सदाशिव पेठ, पुणें २.

*

मुखपृष्ठावरील चित्र

**मानकर व सावंत.**

*

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

*

पहिली आवृत्ति

बुद्ध जयंति ८ मे १९६३.

प्रति २०००.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ..........
नों. दि: ..........




# समर्पण



ज्या महात्म्याने आपल्या
महान त्यागातून मानवी
जीवनातील दुःख, दारिद्र्य
आणि अज्ञान नष्ट करण्या-
करिता जगाला शांति,
प्रेम, समता, स्वातंत्र्य नि
विश्व बंधुत्वाचा महान
संदेश दिला, ते भगवान
गौतमबुद्ध

त्याच प्रमाणे ज्यांनी
कोट्यावधि पददलिता-
ना मुक्ति स्वातंत्र्याचा
[illegible] त्यांच्या
जीवनामध्ये नवचैतन्य
नि जागृति निर्माण
केली, ते विश्वरत्न
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर

या दोन श्रेष्ठतम
गुरु शिष्याच्या पवित्र स्मृतीस
आदर समर्पण!



स्थळप्रत.

# माझें हृदगत

‘माझें बौध्द तीर्थाटन’ हें प्रवास वर्णन प्रसिद्ध करून अफाट अशा मराठी वाङ्नय क्षेत्रांत त्याचा दर्जा नि उपयुक्तता कितपत ठरेल याबद्दल जसा मी साशंक आहे तद्वत्‌च या प्रवास वर्णनांत मी उत्तर भारतांतील अनेक प्रमुख शहरांना भेटी देऊनहि फक्त सांची, सारनाथ नि बुद्धगया या तीन स्थळांचीच माहिती विशेष करून वर्णिली असल्याने विशिष्ट संकोचित दृष्टिकोनाचाहि आरोप होण्याचा संभव आहे. शिवाय त्यांत पाहिलेल्या स्थलवर्णनाशिवाय अवांतर इतर माहिती आल्याने प्रवासवर्णनाचा वाङ्मयीन संकेत तर माझ्याकडून धुडकावला गेला नाहीं ना? अशी अंधुकशी शंकाहि अनानुभवामुळें मनाला चाटून जात.

याबद्दल इतकाच खुलासा करतां येईल कीं, उपरोक्त बौद्ध तीर्थस्थानें ही उत्तरभारतांतच आहत. नि त्यांची माहिती निदान महाराष्ट्रांतील बौद्धांना तरी अपरिचित असल्यानें ती उणीव भरून काढावी नि त्याचबरोबरच त्या स्थळीं असलेल्या मूर्ति, शिलालेख, स्तंभालेख आदि शिल्पकलाकृतिद्वारें जें बौद्ध तत्वज्ञान चित्रित केलें गेलें आहे त्याचीहि ओळख ( जी मला झाली ती ) इतरांना करून द्यावी, या एकमेव उद्देशानें प्रेरित होऊन, ही माहिती या पुस्तकांत दिली आहे. ती कितपत साधली आहे याचा निर्णय सूज्ञ वाचकच देतील.

माझ्या समजुतीप्रमाणें सर्वसामान्य जनतेला नामनिर्देशापलिकडे भ. गौ. बुद्धाबद्दल जास्त माहिती नाहीं. थोड्याबहुत जिज्ञासू सुशिक्षितांना जी माहिती आहे ती इंग्रजी ग्रंथावरून किंवा त्या ग्रंथांचे भाषांतरित केलेल्या मराठी पुस्तकांवरून मिळालेली असणार. आणि इंग्रजी भाषेंतील हे सर्वग्रंथ संस्कृत भाषेतील ‘ललित विस्तर’ व ‘अश्वघोषकृत बुद्धचरित्र काव्य अथवा पाळी भाषेंतील जातककथांच्या प्रस्तावनेंतील ‘बुद्ध चरित्र’ यावरून लिहिलेले आहेत. त्यांपैकीं संस्कृत ग्रंथांतील बराचसा भाग आणि त्याचंप्रमाणें जातक कथा या सर्व काल्पनिक असून, दैवीचमत्कार नि असंभवनीय घटनांनी भरलेला आहे. या वर्णन केलेल्या घटनांना मूळ पाली भाषेतील ‘तिपिटक’ नांवाच्या बौद्धांच्या जो सर्वात प्राचीन ग्रंथ आहे, त्यांत मुळींच आधार

सापडत नाही. अशा परिस्थितीत या वाङ्मयावर कितपत विश्वास ठेवावा? अशा वेळीं भ. बुद्धाविषयीं किंवा त्या धर्माच्या तत्त्वज्ञानाविषयी विश्वसनीय नि आधारभूत माहिती मिळण्याचें एकमेव ठिकाण किंवा साधन म्हणजे प्रमुख बौद्ध तीर्थ स्थानें नि तेथील शिल्पकलाकृति हेंच होय. त्यांतूनच सदर धर्माचें तत्वज्ञान हुडकून काढणे या शिवाय अन्य मार्ग नाही. म्हणून सांची, सारनाथ व बुद्धगया या स्थळांच्या निरीक्षणांतून मला जें अंशतः ज्ञान उमगलें तेंच या पुस्तकांत देण्याचा प्रयत्न केला आहे

दुसरें असें कीं या पुस्तकांत प्रवास वर्णनाबरोबरच इतर अवांतर बाबींचा उल्लेख आल्यामुळे—विषयांतर हा या पुस्तकाचा जणूं काय विशेषच बनला आहे. हा आरोप मान्य करूनहि याबाबतींत नम्रपणें हेंच म्हणेन कीं, सदर बाबतींत माझा नाईलाज झाला. कारण प्रवासाला निघते-वेळीं माझ्याबरोबर केवळ पाय किंवा डोळेच नव्हते तर डोकेंहि होतें.

हें कोणासहि कबूल करावें लागेल कीं, कोणताहि जिज्ञासू प्रवासी डोळ्यांनीं ज्या वेगांत निरीक्षण करील किंवा पायांनीं ज्या वेगांत तो चालेल, त्याच्या किती तरी पटीनें त्याच्याबरोबर असलेलें त्याचें डोकें भरधांव चालत असतें. मात्र पायाप्रमाणें एकाच ठराविक दिशेनें चालण्याचें त्याला बंधन नसतें, तर जिज्ञासेच्या मदांत त्याचा ज्ञात-अज्ञात हुडकण्याचा स्वैराचार अखंड चालू असतो.

त्याशिवाय प्रवासाला निघतेवेळीं माझ्याबरोबर माझे सत्तर-ऐंशी व्यवसाय बंधू असतांना नि सोबतीची मुळींच गरज नसतांना; एवढेंच नव्हें तर मी नको नको म्हणत असतांना देखील कल्पनाशक्ति, स्मरणशक्ति नि चिकित्सा-वृत्ति यांचा तांडा हट्टानें माझ्यामागें लागलाच या सर्व लटांबरावर जर माझा वचक असता तर त्यांना मी नक्की मना केलें असतें. कारण माझा संकल्प फक्त निरीक्षण शक्तीलाच घेऊन जावयाचा होता. परंतु तो संकल्प उपरोक्त लोकांनीं तडीस जाऊं दिला नाहीं. नि त्यामुळेंच सदर प्रवासवर्णन लिहितांना त्या हट्टी लटांबरांनीं माझ्या लेखणीचा ताबा घेऊन त्यांच्या मर्जीनुरूप लिहिण्यास भाग पाडलें. त्याला मी तरी काय करूं? तेव्हां सूज्ञ वाचक या विषयांतराबद्दल केवळ मलाच दोषी ठरविणार नाहींत, अशी आशा बाळगतों.

सदर प्रवास वर्णनांतील स्थळें, अनेक लोकानीं पाहिली वाचलीहि असतील अशा लोकांना निदान भारतीयांना तरी त्यांत नाविन्य तें काय वाटणार ?

या बाबतींतहि मी स्वानुभवानें सांगू शकतों कीं, ठराविक स्थळें अनेकांनीं पाहिलीं असलीं आणि प्रवासांत घडणाऱ्या बहुतेक गोष्टीहि सारख्याच असल्या तरी प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक वेळीं कांहीं तरी विशिष्ट असे वैयक्तिक अनुभव येणारच. शिवाय जिज्ञासेच्या प्रमाणांत प्रत्येकाचा निरीक्षणाचा चष्मा हा भिन्न भिन्न असणारच. या नियमाला अनुसरून माझ्या चष्म्यांतून जसें दिसलें, तेंच लेखणीद्वारें प्रसृत केलें आहे. त्याचा वाचकांनीं हंस-क्षीर न्यायानें आस्वाद घ्यावा अशी अपेक्षा आहे.

सदर पुस्तकाच्या पहिल्या विभागांत मुंबईहून निघाल्यापासून विशिष्ट स्थळीं पोहोंचेपर्यंतचा मार्ग, प्रमुख स्टेशनें, लागणारा वेळ, तेथील स्थानांतील प्रेक्षणीय स्थळें नि ती पाहाण्यासाठीं लागणारीं इतर वाहनें, येणाऱ्या अडचणी इत्यादींची संक्षिप्त माहिती दिल्यानें त्या मार्गानें नव्यानें जाऊं इच्छिणाऱ्या प्रवाशाच्या अंशतः अडचणी दूर होण्यास खात्रीनें मदत होईल अशी माझी समजूत आहे. शिवाय सदर प्रवास वर्णनांत ज्या मुख्य तीन बोद्ध तीर्थांची (सांची, सारनाथ व बुद्धगया) माहिती दिली आहे. तीच या पुस्तकांतील मुख्य प्रतिपाद्य विषय असल्यानें नि त्या स्थळांच्या परिचयाची नितांत आवश्यकता महाराष्ट्रांतील बौद्धांना असल्यामुळें त्याचीच माहिती विस्तारानें दिली आहे. अर्थात ती उपलब्ध होण्यासाठीं मला त्या त्या बौद्धतीर्थ स्थळीं ज्या ज्या भिक्खू आदि प्रमुख व्यक्तींकडून सदर माहिती मिळू शकली त्यांचा मनापासून आभारी आहे. त्याचप्रमाणें प्रस्तुत स्थळीं प्रसिद्ध केली गेलेलीं माहितीपत्रकें, चित्रें, आदींचा माहिती संकलीत करण्याच्या दृष्टीनें फारच उपयोग झाला. विशेषतः " बुद्धगया या स्थळांची ऐतिहासिक माहिती मिळण्यास" श्री भिक्षू शिलाचार यांनीं प्रसिद्ध केलेल्या ' बुद्धगया ' या हिंदी पुस्तिकेचा अत्यंत उपयोग झाला. म्हणूनच श्री. भिक्षू शिलाचार यांनीं माझ्याप्रमाणेंच इतर सर्व मराठी भाषिकांस कायमचें उपकृत करून ठेवलें आहे. त्याचें कधीहि न फिटणारें ऋण मान्य करून सर्व मराठी भाषिकांतर्फे त्यांचें अंतःकरणपूर्वक आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतो.

पुस्तकाच्या दुसऱ्या विभागांत भेटी दिलेल्या बौध्द तीर्थस्थानांच्या निरीक्षणानें माझ्या मनावर कोणता नि कसा परिणाम झाला याचें मनोविश्लेषण केलें आहे. सांची, सारनाथ व बुध्दगया या तिन्ही स्थळीं अस्तित्वांत असलेले शिलालेख, स्तंभालेख, विविध आकाराच्या मूर्ति इत्यादि कलाकृतीच्या सूक्ष्म निरीक्षणांतून मला ज्या बुध्दधर्मीय तत्वज्ञानाची उकल होऊं शकली. त्यावद्दलचें विवेचन माझ्या कुवतीप्रमाणें मी केलें आहे. अर्थात् सदर निरीक्षणास पूर्वसंस्कारामुळें मनाची वा विचाराची जी घडण तयार झाली होती, ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीतून बाहेर पडलेला ' बुध्द आणि त्याचा धर्म ' या ग्रंथामुळें तयार झाली. शिवाय त्यांनी इ. सन १९५० ते सन १९५६ पर्यंत जी अनेक ठिकाणी बौध्द धर्मावर व्याख्यानें दिली व लेख लिहिले ते ऐकून व वाचून माझ्या विचाराला एक विशिष्ट प्रकारची कलाटणी मिळाली नि त्याच दृष्टिकोनांतून मी सदर निरीक्षण केलें, व माझ्या मनाची खात्री करून घेतली.

परिणामी अलिकडील बौध्द वाङमयांत उद्धृत केलेलें भगवान बुध्दाचें चरित्र नि बोध्दधर्माचें तत्त्वज्ञान कसें विकृत स्वरूपांत नि दिशाभूल करणारें प्रसिद्ध केले गेले आहे याची प्रचिती सदर स्थळें निरीक्षण कल्यानें प्रत्ययास आलें.

त्याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच धर्माचा अंगिकार कां केला ? तद्वतच् त्यांनी आपल्या कोटयावधि अनुयायांना तोच धर्म स्वीकारण्याची शिफारस कां केली ? पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांचें ते धर्मांतर की धर्मग्रहण ? त्याचप्रमाणें बोध्दधर्म या देशांतून कोणी व कां नष्ट केला ? त्या धर्माच्या तत्वज्ञानास निराळी कलाटणी देण्याचें कार्य कोणी व कां केलें? ईश्वराची निर्मिति कोणी केली ? कां? भारताची अधोगति कशामुळें झाली ? तद्वतच् डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिन्दूधर्म सुधारणेचे प्रयत्न कां व कसें केले ? नि त्यांत त्यांना अपयश कां आले ? भारताची संस्कृति विश्वबंधुत्वाचें नातें जोडण्यास पूरक आहे कां ? तसेच ती या देशांतील सर्व लोकांनी अभिमान बाळगण्याच्या पात्रतेची आहे कां ? वैदिक धर्माच्या खुळचट रुढी-रिवाजामुळें या देशाची प्रगति कशी अगतिक बनली आहे. नि त्यामुळें भारत देश वैज्ञानिक क्षेत्रांत मागासलेला कां राहिला ? या देशांतील

बहुजन दलीत समाज दुःखमुक्त होण्यास आज कोणत्या तत्त्वज्ञानाची गरज आहे ? इत्यादि प्रश्नांचा उहापोह सदर प्रकरणांत संक्षिप्त रूपानें केला आहे त्यामुळें बहुजन समाजाच्या विचारास चालना मिळण्यास निश्चित मदत होईल, अशी माझी समजूत आहे.

सदर विवेचनाच्या ओघांत मला इतर धर्मावर विशेषत: वैदिक किंवा ब्राह्मणी हिंदू धर्मावर टीका करावी लागली आहे. तद्वत्‌च कांहीं लोकादरास पात्र असलेल्या, परंतु त्यांच्या केवळ सनातनी वृत्तीमुळें त्यांचा नामनिर्देश करुन, त्यांचा थोडाबहूत उपाहासहि झाला असेल. परंतु त्यांच्या पांडित्याचा अवमान व्हावा किंवा त्यांच्या धर्माचा मी संपूर्ण द्वेष्टा आहे; अशांतला भाग नाहीं. तर ज्या वैदिक धर्मानें पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजाचा जो हजारो वर्षे अनन्वित छळ केला या पूर्वग्रहदूषित मनोवृत्तीतून तसे विचार मांडणें मला भाग पडलें.

हिंदू धर्माच्या जातीय व्यवस्थेंमुळे राष्ट्राच्या ऐक्यास नि त्या अभावी राष्ट्रोन्नत्तीस कशी खीळ पडली आहे; या राष्ट्रीय हिताच्या तळमळीतून हे कठोर विचार मांडणें क्रमप्राप्त झाले आहेत.

कोणत्या धर्माचा अवमान व्हावा अथवा कोणा व्यक्तीची हेतूपुरस्सर बदनामी करावी, असा माझा द्वेषमूलक हेतू मुळींच नाहीं. केवळ धर्माच्या नावांखालीं बहुजन समाजाची सामाजिक व आर्थिक जी हानी झाली आहे नि होत आहे ती नष्ट व्हावी नि त्या समाजाची पर्यायानें राष्ट्राची खुंटलेली प्रगति प्रवाहित व्हावी, याच एकमेव तळमळींतून माझे सदर विचार बाहेर पडले आहेत. अर्थात् हे करतांना यदाकदाचित् कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर त्याला माझा नाईलाज आहे. ते जर वास्तव परिस्थितीचा साकल्याने विचार करतील तर माझी खात्री आहे की निश्चितपणें तें माझ्यावर रुष्ट न होतां सामाजिक नि राष्ट्रीय हिताच्या व्यापक दृष्टीकोनांतून माझ्या विचारांशी समरसच होतील. असो. अशा विचाराने ग्रंथित झालेले हें पुस्तक मुद्रणालयांतून प्रसवण्यापूर्वीचा वृत्तांत सांगितल्याशिवाय मला राहावत नाहीं

सदर प्रवास वर्णनाचा खंडशः मजकूर ‘ धर्मयान ’ या मासिकांतून सुमारें तेरा–चौदा लेखांद्वारें प्रसिद्ध झाला होता. ते लेख ‘ विचार विकास अभ्यास मंडळ ’ या नावाच्या मुबईत स्थापन झालेल्या नवोदित तरुणांच्या संघटनेतील

कांहीं सदस्यांच्या वाचण्यांत आल्यावरून त्यांनीं माझी भेट घेतली नि तें लिखाण पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याबद्दल माझे मागें त्यांनीं सारखा समेमिरा लावला. त्यांचा पिच्छा पुरविण्याचा चिवटपणा प्रारंभी जरी मला तिरस्करणीय वाटला असला तरी. त्यांनीं माझ्या सर्व अडचणींचा भार आपल्या शिरावर घेतला, एवढेंच नव्हें तर पुस्तक प्रकाशनाची जबाबदारीहि मंडळानें पत्करल्यानें सर्व बाजूनी त्यांनीं मला निरूत्तर करून टाकलें. त्यामुळें मला होय म्हटल्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं.

माझ्या होकारानंतर त्यांच्यांत संचारलेला दुर्दम्य उत्साह नि धांवपळ मला मोठी कौतुकास्पद वाटली. कारण सदर मंडळाचे बहुसंख्य सभासद; वेळ, पैसा नि श्रम खर्ची घालून, अखेरपर्यंत खपत होते. विशेषतः सर्वश्री— सि. रा. ढसाळ, रंगनाथ पवार, ल. गो. पवार, बी. एम्. खैरमोडे, मधुकर भालेराव, शांताराम जाधव, हि. ल. अंकुश इत्यादि कार्यकर्त्यांनी जें अविश्रांत श्रम खर्ची घातलें त्या त्यांच्या श्रमाची फल-निष्पत्ति म्हणजेच हें प्रसिध्द झालेलें ' माझें बौध्द तीर्थाटन ' पुस्तक होय. त्यांच्या या धडपडींत जरी समाज सज्ञान करण्याचा भाग असला तरी त्यांच्या या कृत्यामुळें मला मात्र त्यांनी कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. एवढेंच नव्हें तर परस्परांचा अविट स्नेहभाव कायम टिकण्यास एकप्रकारे भरच घातली आहे यांत मुळीच अतिशयोक्ति नाही.

त्याचप्रमाणें माननीय श्री. घनःशाम तळवटकर, श्री. यशवंतराव उर्फ भय्यासाहेब आंबेडकर, श्री. विष्णूपंत कर्डक, श्री. आर. जी. खरात श्री. एस. पी. दारोळे इत्यादि मान्यवर नेत्यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

तसेंच दलित समाजाचे तळमळीचे जुने नेते माझे परम स्नेही नि हित चिंतक माननीय बॅरिस्टर श्री. एस्. एन्. मानेसाहेब यांनी माझ्या लेखन कलाकृतीस जे हार्दिक प्रोत्साहन दिलें नि सदर लिखाणाबद्दल आपला बहु-मोल अभिप्राय व्यक्त केला, कीं जो या देशांतील झाडून साऱ्या विचार-वंतांनी आदर्शभूत मानावा इतकें त्यातील विचार दूरदर्शीपणाचें आहेत. याबद्दल त्यांचे आभार कसें नि कोणत्या शब्दात व्यक्त करावेत हेंच सुचेनासें झालें आहे.

तद्वत्‌च महाराष्ट्रांतील ख्यातनाम साहित्यिक नि स्वतंत्र राष्ट्रीय बाण्याचे लेखक माननीय श्री. चिं. वि. जोशी यांनी सदर पुस्तकास प्रस्तावना लिहिल्याबद्दल ऋण व्यक्त करतांना माझी मति कुंठित होऊन, जिव्हा अक्षरशः निःशब्द झाली. कारण त्यांनी पस्तावनेत व्यक्त केलेल्या मौलिक विचारांवरूनच त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेची नि अगाध अनुभवाची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही. अशा महान्‌ व्यक्तीचें माझ्यासारख्यानें आभार मानतांना संकोचल्याची अवस्था निर्माण होतेच. तरी पण त्यांनी माझ्याबद्दल दर्शविलेल्या जिव्हाळ्याबद्दल नि लिखाणांतील विचाराशी झालेल्या एकरूपतेबद्दल मी त्यांचा कृतज्ञतापूर्वक हार्दिक आभारी आहे.

त्याचप्रमाणें सदर पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील सुबक नि अर्थबोधयुक्त चित्र काढून, ज्यांनी मला आपल्या कलानैपुण्यानें भारावून सोडलें. ते माझे आवडते विद्यार्थी श्रीयुत कृष्णा मानकर व त्यांचे साथी श्री. मारुती सावंत यांचे आभार मानल्यास त्यांना ते मुळीच खपणार नाही. याची जाणीव असूनहि त्यांची माझ्यावरील अविट श्रद्धा नि त्यांची चिरस्मरणीय कलाकृति यायोगें त्यांचे आभार मानल्याशिवाय मला राहावत नाही.

तसेंच पुस्तक छपाईच्या पूर्वतयारी खातर ज्यांनी बहुमोल श्रम घेतले नि सर्व प्रकारचें साहाय्य केलें ते माझे परमस्नेही नि हितचिंतक सर्वश्री– डी. एस्‌ गायकवाड, शरद महातेकर, एस्‌. आर. कवडे, एम्‌. ए. जाधव, टी. आर. पाडळे या पुण्यांतील कार्यकर्त्यांचे जितके आभार मानावें तितकें अपुरेंच पडतील. तसेंच आर्थिक कमजोरीमुळें ग्रंथ प्रकाशनाबद्दल जी घोर चिंता लागून राहिली होती. ती दूर होण्यास ' महाराष्ट्र राज्याच्या साहित्य आणि संस्कृति मंडळानें ' फार मोठें औदार्य दर्शविले कारण त्यांच्या रु. २,००० च्या उदार अनुदानामुळेंच माझें ग्रंथमुद्रणाचें आर्थिक ओझें कमी होऊ शकलें. म्हणून त्यांच्या उपकाराचें ऋण मान्य करून, त्यांचा मनापासून मी आभारी आहे. तसेंच पुस्तक छपाईचें काम अल्पावधीत करून दिले तें हिंदुस्थान मुद्रणालयाचे श्री. व. वि. आपटे यांचा मी आभारी आहे.

११/११ ट्रस्ट चाळ, आग्रीपाडा<br>मुंबई नं. ११<br>बुध्द जयंति. ८ मे १९६३

ल. ना. अंकुश गुरुजी<br>लेखक

# प्रकाशनाचें निवेदन

महाराष्ट्रीय बौद्ध समाजातील निःस्पृह कार्यकर्ते श्री. ल. ना. अंकुश गुरूजी यांनी उत्तर भारताचा प्रवास करून विशेषत: बौध्दतीर्थ स्थळांचे वर्णनात्मक व अभ्यासपूर्ण लिहिलेलें ' माझें बौद्ध तीर्थाटन ' हे विचारप्रवर्तक पुस्तक सूज्ञ वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत हर्ष होत आहे. सदर पुस्तक धार्मिक दृष्टीनें अत्यंत उपयुक्त असून बोध्दांच्या तीर्थस्थळांची माहिती देतांना लेखकानें योग्य स्थळीं बहुमोल विचारांची गुंफण केली आहे, त्यामुळें पुस्तकांचें महत्व खास आगळे झाले आहे.

केवळ सामाजिक दृष्टिकोनांतून पुस्तक लिहिणे व छापणें आजच्या महगंतेच्या काळांत आठवें आश्चर्य होय. पुस्तक कितीहि उपयुक्त असलें तरी तें समाजांत वारेमापखपून अमाप पैसा मिळेल ही कल्पना दुधखुळी आहे. कारण साहित्यिकाला आर्थिक साहाय्य करण्याची नीति समाजांत जन्मली नसल्यानें अन्यायाला वाचा फोडणारी व सामाजिक समतेस्तव निर्भीडपणें झुंजणारी झुंजार लेखणीहि अखेर बोथट होते व समाज हिताप्रीत्यर्थ जन्मलेलीं प्रकाशन संस्थाहि अखेर लयास जाते. या सामाजिक समस्येची मीमांसा करूनहि आम्हीं प्रकाशन क्षेत्रांत उत्साहानें धीरगंभीर पाऊल टाकीत आहोत. कारण काळ अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे.

'ग्रंथ हेंच गुरु' या महान् मंत्राशी आम्हीं तादात्म्य पावलो असून, 'प्रयत्न करा म्हणजे प्रकाश दिसेल ' हे ध्येयवाक्य उराशीं बाळगून, आम्हीं साहित्य क्षेत्रांत पदार्पण करीत असलो तरी अखेर परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर हा आमचा ज्ञानदीप ! हा आमचा मार्गदीप ! ! आणि हा न आमचा बोधिवृक्ष ! ! ! यांत मुळींच संदेह नाहीं–

शेवटी ग्रंथकर्त्यास दीर्घायुरारोग्य लाभो व त्यांचें हस्ते वाङ्मयीन कार्य सतत घडो ही सदिच्छा बाळगून प्रत्येक विचारवंत बौध्दांनी सदर पुस्तक संग्राह्य करून आमची उत्स्फूर्त भावना इंच इंच वाढवावी, हीच अभिलाषा.

श्री. ल. गो. पवार,
अध्यक्ष,

श्री. हि. ल. अंकुश
कार्यवाह,
विचार विकास अभ्यास मंडळ,
११/२०, आग्रीपाडा ट्रस्ट चाळ, मुंबई ११

# अभिप्राय

**बॅ. एस्. एन्. माने, सभासद पब्लिकसर्व्हिस कमिशन,**
**महाराष्ट्रराज्य मुंबई.**

माझे मित्र श्री. ल. ना. अंकुश गुरुजी यांनीं ' माझे बौध्द तीर्थाटन ' हें पुस्तक प्रसिध्द करून मराठी भाषिक बौध्दांना भगवान गौ. बुध्दाच्या धर्माची तात्विक भूमिका समजावून देण्याचा आस्थापूर्वक प्रयत्न केलेला आहे.

श्री. अंकुशगुरुजी यांनीं उत्तर भारतांत एकूण अठरा दिवस प्रवास केला असून, या कालावधींत त्यांनीं दिल्ली, आग्रा, लखनौ, ऋषिकेश, वाराणसी, कलकत्ता, हैद्राबाद इत्यादि प्रमुख शहरांना भेटी दिल्या आहेत. परंतु हा त्यांचा प्रवासाचा गौण भाग आहे. त्यांच्या प्रवास वर्णनांतील मुख्य भाग भारतांतील प्रमुख बुध्दक्षेत्रें—सांची, सारनाथ व बुध्दगया येथील माहिती हा आहे. त्यांनी तेथील संपूर्ण माहिती गोळा करून ती प्रसिध्द करण्याची कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडली आहे एवढेंच नव्हें तर त्या स्थळांच्या निरीक्षणानें त्यांना जो खऱ्या बौध्द तत्वज्ञानाचा अंशतः उलगडा झाला तो त्यांनीं निर्भीडपणें दिग्दर्शित करून, बौध्द जनतेपुढें भ. बुध्दाच्या जीवनाचा अप्रसिध्द असा चरित्र ग्रंथच ठेवला आहे असे मला वाटतें.

भगवान बुध्दांनीं गृहत्याग केल्यानंतर ठिकठिकाणीं त्यांनीं केलेल्या तपश्चर्या, त्यांनीं भोगलेला देहदंड, त्यांच्या तपश्चर्या त्यातून मिळालेला अनुभव तसेंच ज्या महाबोधी वृक्षाच्या छायेखालीं भगवान बुध्दांना दिव्य-ज्ञान प्राप्त झालें त्या महाबोधी वृक्षाच्या इतिहासाचें वर्णन श्री. अंकुश गुरुजी यांनीं अत्यंत तन्मयतेनें आणि भावनापूर्ण मनोवृत्तीनें केलें आहे. शिवाय देशी व विदेशी सम्राटांनीं बांधलेलें स्तूप, धर्मशाळा आणि त्यांनीं तयार केलेल्या बुध्दमूर्ति यांचीहि संपूर्ण माहिती श्री अंकुश यांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे. सारांश श्री. अंकुश गुरुजी यांचे हें पुस्तक बुध्द यात्रेकरूंना हिंदुस्थानांतील बुध्दक्षेत्रांची उत्कृष्ट मार्गदर्शिका म्हणून उपयुक्त ठरेल यांत बिलकूल शंका नाही.

बुध्दतत्वज्ञानाची जनतेच्या जीवनाच्या दृष्टीनें उपयुक्तता आहे; या तत्वज्ञानानें सर्व सामान्य जनतेचें ऐहिक सौख्य वाढविण्याच्या दृष्टीनें किती महत्व आहे. डॉ आंबेडकरांनी हिंदुस्थानांतील पददलितांच्या उन्नतीसाठी

महात्मा गौतमबुध्दाचा बौध्दधर्मच का पसंत केला ? आणि हा धर्म पत्करण्यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हेतू काय ? या सर्व प्रश्नांची उकल श्री. अंकुश यांनी अत्यंत सुंदर आणि उद्‌बोधक रीतीनें केलेली आहे.

श्री. अंकुश गुरुजी यांनी भारतीय सर्वसामान्य जनतेनें हिंदुधर्माचा सर्वस्वी त्याग करून, भगवान बुध्दाच्या थोर धर्माचा स्विकार करावा असें आग्रहानें प्रतिपादन केलें आहे. भारतीय हिंदुधर्मीयांनी बुध्दधर्म हा राष्ट्रधर्म मानून त्याचा स्विकार केल्यास श्री. अंकुश यांच्या मतें या राष्ट्राच्या अत्यंत महान् अशा सर्व समस्या सोडविण्यास हा धर्म त्यांना समर्थ करील, असें त्यांचें ठाम मत आहे.

ते म्हणतात भारत आज जातीभेदाने खिळखिळा झाला आहे. सामाजिक विषमतेमुळे भारतांत आज खरें ऐक्य नांदत नाहीं. भारतांतील सामाजिक गुलामगिरीमुळें जगाच्या बाजारांत भारताला किंमत राहिली नाही. हें त्याचें म्हणणे कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. अशा परिस्थितींत भारतानें मानवतेचा मानबिंदू म्हणजेच बुद्धधर्म हा राष्ट्रधर्म म्हणून त्याचा स्विकार केल्यास भारतांतील विषमता समूळ नष्ट होईल आणि भारतांत बुध्द ही एकच एक मानव जात मानली जाईल तद्वतच् भारतांत जातीभेदाला जागा रहाणार नाही. दुसरी गोष्ट, भगवान बुध्दाचा धर्म हा "बहुजन सुखाय, बहुजन हिताय" याच तत्वावर आधारलेला आहे. या धर्मांत धनसंचय निषिध्द मानला आहे. स्वतः भगवान बुध्दांनी भिक्षा-पात्र हातांत घेऊन मिळेल तें अन्न भक्षण करून आपल्या अनुयायांसह धर्मप्रसाराचें काम केलें आहे.

श्री. अंकुश यांच्या मताप्रमाणें भारतानें बुध्द धर्म स्विकारल्यास या देशांतील आर्थिक विषमता नष्ट होईल आणि कामगार शेतकरी इत्यादि श्रमजीवी जनता यांचे सर्व आर्थिक प्रश्न सुटतील व देशांतील सामान्य जनतेला या देशांत समाजसत्तावाद स्थापन करून रक्तलांछित क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याचें कारणच उद्‌भवणार नाही. तें म्हणतात आज बुध्दधर्माचें महायान व हिनयान असें दोन पंथ असून, भगवान बुध्दांनी उपदेशिलेला हिनयान हा मूळ पंथ आहे आणि म्हणून भारतीय जनता या पैकी हिनयान पंथाच्या मार्गानें गेल्यास ती आपले आर्थिक व सामाजिक प्रश्न सहज सोडवूं शकेल, त्यासाठी त्याला कोणत्याहि इझमची किंवा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
........ दि. ........



रक्तमय क्रांतीची जरूरीच भासणार नाही. माझा स्वतःचा बुध्द तत्व-ज्ञानाचा अभ्यास म्हणण्याइतका सखोल नसल्यामुळें मी माझे मत या विषयावर अधिकार वाणीने देऊं शकत नाही. तथापि स्वतःच्या सुखाची होळी करून, जगाच्या सुखासाठीं आत्मयज्ञ करणाऱ्या भगवान बुध्दाबद्दल मला आतयंतिक आदर आहे तसेंच चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या, विषमतेच्या घाणीनें सडलेल्या; पांच हजार वर्षाहून अधिक काळ अत्यंत कठोरपणे व निष्ठुरतेने गुलामगिरीची जोपासना करणाऱ्या हिंदुधर्मापेक्षा मानवतेची जोपासना करणारा बुध्दधर्म श्रेष्ठतम आहे यांत मला बिलकूल शंका वाटत नाही.

बुध्दधर्माप्रमाणेंच मुसलमान व ख्रिस्ति या दोन धर्मात विषमतेला स्थान नाही. बुध्दधर्म, ख्रिस्तिधर्म व मुसलमान धर्म या तीन धर्मियांची संख्या आज २२५ कोटीहून जास्त आहे. या तिन्ही धर्म संस्थापकांपैकी एकहि धर्म संस्थापकाने मानवाला पिढयान् पिढया विषमतेच्या कोंडाळयांत डांबून टाकण्याचा आपल्या अनुयायांना उपदेश केला नाही. याउलट ख्रिस्तानें 'तुझ्या शेजाऱ्यावर प्रेम कर ' असेंच आपल्या अनुयायांना आवजून सांगितले आहे, महंमद पैगंबरानें तर आपल्या अनुयायांना उद्देशून म्हटले आहे की, तुम्ही तुमच्या आयुष्यात एका जरी गुलामाला मुक्त केलेत, तरी तुमच्या साठी स्वर्गाचा दरवाजा खुला आहे. तात्पर्य या दोन महान् धर्मपुरुषांनी पद-दलीत मानवाला त्याच्या गर्तेतून वर काढण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी मदतीचा हात पुढे करावा असाच उपदेश केला आहे. असें जरी असले तरी भगवान बुध्दाचें तत्वज्ञान भारतभूमीतच जन्मांला आले असल्यामुळे भार-ताच्या उध्दराच्या दृष्टीने या ज्ञानाचा खास उपयोग होईल असें समजून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या तत्वज्ञानाचा स्विकार केला असावा अशी माझी समजूत आहे

आपण आज जगावर दृष्टी फेकल्यास आपणांस दिसून येईल की, आज जगाचें आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी जगांतील कोणताहि देश किंवा जमात आपला मोर्चा धर्माकडे वळवित नाही. प्रत्येक देशांपुढचें महत्वाचें प्रश्न सोडविण्यासाठी देशाची शासनसंस्था (सरकार) कोणत्या तात्विक भूमिकेवर आधारलेली असावी याकडेंच आज सर्व जगाचे लक्ष केंद्रित झालें

आहे. आज प्रत्येक देशापुढें समाजसत्तावाद किंवा निर्भेळ लोकशाही हा तात्विक वाद सुरूं आहे. या वादांत सर्व मानवजात गुरफटली गेली आहे. समाजसत्तावादी राष्ट्रें योग्यायोग्य मार्गाबद्दल विधिनिषेध न मानतां समाजसत्तावादी सरकार स्थापण्याचा प्रयत्न करीत असून, लोकशाही राष्ट्र जनतेनें निवडून दिलेल्या जनतेच्या प्रतिनिधींच्या मार्फत लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. बुध्द धर्माचें प्राबल्य असलेल्या चीन, कोरिया, व्हिएटनाम, तिबेट वगैरे देशांत समाजसत्तावादी पक्षानें अधिकार सुत्रें धारण केली आहेत तर सिलोन, ब्रह्मदेश वगैरे बुध्दधर्म मानणाऱ्या इतर देशांत लोकशाही राजव्यवस्था अधिकारारूढ आहेत. त्याचप्रमाणें आफ्रिका व अमेरिका या खंडांची स्थिती आहे. पूर्व युरोप व रशिया या देशांत समाजसत्तावादी सरकारें राज्य करीत असून, कम्युनिझमच्या मार्गानें त्यांनी सामान्य जनतेचें सर्वच प्रश्न सोडविले आहेत. तर अमेरिका, इंग्लंड वगैरे देशांनी लोकशाहीच्या मार्गानें बहुसंख्य जनतेचे राहणीचें मान सुधारण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविला आहे. तात्पर्य या दोन प्रकारच्या तत्वप्रणालींनी धर्माच्या भिंती जमिनदोस्त केल्या आहेत. आज धर्म ही संस्था निर्माल्यवत् झाली असून, जुन्या काळाचा धर्माचा पगडा आतां धुळीस मिळाला आहे.

ही बाह्य जगाची स्थिती आहे. मात्र हिंदुस्थानांत ती अवस्था अद्यापि आलेली नाही. मात्र हिंदुस्थानांतहि लोकशाहीच्या मार्गानें भारताचे सर्व प्रश्न सोडविण्याचा जारीनें प्रयत्न सुरूं आहे. भारताच्या घटनेनें सर्व जनतेला मुलभूत हक्काची सनद दिली आहे. भारतीय घटनेप्रमाणें आज कोणी उच्च किंवा नीच नाही. कायद्यानें सर्व विषमता नष्ट केली आहे. हें जरी खरें असले तरी पांच हजार वर्षांपूर्वी वैदिक धर्मानें शूद्र वर्ण निर्माण करून त्याला बाकीच्या तीन वर्णांची सेवा करण्याचें काम दिलेलें आहे. ती परंपरा व्यवहारांतून नष्ट झालेली नाहीं. ती परंपरा कायम टिकविण्यासाठीं खोटी नाटी पोथ्या–पुराणे रचली आहेत. कर्मवाद, पुनर्जन्मवाद, दैववाद व अवतारवाद निर्माण करून आजपर्यंत या देशांतील एक तृतीयांश लोकांना बाकीच्या तीन वर्णांची सेवा करण्यांतच गुंतवून ठेवलें आहे. या अवस्थेमुळे राष्ट्रीय एकात्मतेचा मुद्दा पडला असून विषमता हाच हिंदुधर्माचा आधार-

भूत आत्मा मानला जात आहे. कारण चार्तुवर्ण्य हेंच मुळीं जन्मजात सेवक वर्ग निर्माण करण्यासाठीं जन्माला आले आहे आणि हें कार्य हजारों वर्ष अखंड चालूं आहे. यामुळें जनतेच्या मनांतील विषमतेचें बीज काढून टाकणें अत्यंत कठीण काम होऊन बसलें आहे. अद्यापहि घटनेनें निर्माण केलेली समता ही घटनेच्या बुकांत आहे, हिंदुधर्मांच्या चाकोऱ्यांत वाढलेली आणि चार हजार जातींमध्यें विभागलेली बहुसंख्य हिंदु जनता देशांत समतेच्या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करण्यास तयार नाहीं. कारण हें तत्त्वज्ञान त्यांच्या सनातन धर्माच्या अगदीं उलट आहे. अशा वेळीं श्री अंकुश यांच्या मताप्रमाणें या देशांत समता, समानता, मानवता, आणि पंचशीला या महान तत्त्वांवर अधिष्टीत झालेला आणि भगवान बुद्धाच्या महान तपश्चर्येतून दिव्य ज्ञानाच्या रूपानें भगवान बुद्धांनीं उपदेशिलेला ' बुद्धधर्म ' जर भारतानें स्विकारला तर भारताच्या आजच्या लोकशाहीला वरदानच ठरेल. कारण जातीयवादावर आधारलेली हिंदु संकृति ही लोकशाहीला केव्हांहि पोषक होऊं शकणार नाही. उच्चनीचतेवर आधारलेला जातीयवाद आणि लोकशाही या दोन गोष्टी परस्पर भिन्नच नव्हे तर त्या परस्पर विरोधी आहेत. लोकशाही म्हणजे जनतेनें जनतेच्या हितासाठीं निर्माण केलेली राज्यपध्दति आहे. अर्थात् या देशांत खरी लोकशाही नांदावयाची असल्यास या देशांतील जातिभेदाचें समूळ उच्चाटन झालेच पाहिजे. जातिभेदाचें उच्चाटन करण्याचें काम भारतीय हिंदु समाजानें बुध्दधर्म स्विकारल्यास साध्य होऊं शकेल यांत मुळीच शंका नाहीं. पण शूद्र समजल्या जाणाऱ्या सर्व जनतेवर हुकमत चालविणें आणि जन्मजात श्रेष्ठत्त्वाची तरफदारी करणें हाच ज्यांचा जन्मसिध्द हक्क आहे, तो वर्ग हिंदुस्थानांत बुध्दधर्म आणून तो हिंदुस्थानचा राष्ट्रधर्म मानण्यास मदत करील असें मला तरी वाटत नाहीं. तथापि भारतीय बौध्दांना हिंदुधर्मातील शूद्र समजल्या जाणाऱ्या सर्व जातींना बुध्द धर्माची दीक्षा देऊन त्यांना एकजात बुध्दधर्मिय बनविण्यास यश आले तर मला खात्री वाटते कीं, त्यामुळे अनंतकालच्या हिंदु गुलामगिरीच्या बेडचा तोडून टाकण्यास मोठी मदत होईल नि या भारताचे ते सन्मान्य नागरीक बनतील. तसेंच त्यांना शूद्र म्हणून कमी लेखण्याचें धाडस होणार नाहीं. आजच्या हिंदुस्थानच्या दृष्टीनें हजारों

वर्षे निर्माल्यवत झालेला हा वर्ग भारताचा अत्यंत प्रभावी घटक झाल्या-शिवाय रहाणार नाहीं.

शेवटी श्री अंकुश गुरुजी यांनी बुध्द तीर्थाटनाच्या निमित्तानें भारतीय बुध्द जनतेपुढें बुध्दतत्वज्ञान ठेवून त्यांच्या विचारास कलाटणी देण्याचा त्यांनी जो स्तुत्य प्रयत्न केला आहे, त्यावद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. श्री. अंकुश यांनी हें पुस्तक प्रसिध्द करुन, बुध्द धर्माबद्दलच्या आपल्या आशा आकांक्षा जनतेच्या मार्गदर्शनार्थ जनतेपुढें ठेवल्या आहेत. त्यांनी हें पुस्तक लिहिण्यास अत्यंत परिश्रम घेतले आहेत. आपली बुध्द धर्माबद्दलची मतें पुस्तकरुपानें जनतेपुढें ठेवण्याचा त्यांचा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें लोकांनी त्यांच्या या महान् कार्याचें कौतुक करुन, त्यांचा विचारांचा अभ्यास करावा असें मला मनापासून वाटते. धर्म ही गौण स्वरुपाची बाब मानण्याकडें माझ्या मनाचा जरी कल आहे; तथापि हिंदु धर्मानें पददलितांवर केलेल्या आमानुष आघातांची मला पूर्ण जाणीव आहे आणि म्हणूनच माझ्या लहानपणापासूनच हिंदु धर्माबद्दल बिलकुल आदर नाही. असो माझे मित्र श्री अंकुश यांनी आपल्या पुस्तकाबद्दल माझे विचार काय आहेत याबद्दल विचारल्या-वरुन मी त्यांच्या या पुस्तकासंबंधानें माझें विचार वाचकांपुढें ठेवीत आहे. शेवटी श्री. अंकुश गुरुजी यांच्या श्रमाचें नि त्यांनीं भारतीय जनतेपुढें मांडलेल्या वैचारिक साधनेचें कौतुक करून; बौध्दांनींच नव्हे तर इतर सर्व जनतेनेहि त्यांच्या विचाराचें चिंतन नि मनन करावें अशी अपेक्षा बाळगितो.

मुंबई दि. १४ एप्रिल १९६३.

# प्रस्तावना

अंगूत्तरनिकाय, निपात चार, सूत्र ११८ येथें भगवान् बुद्धांनीं सांगितलें आहे, 'भिक्षूंनो ! येथें तथागताचा जन्म झाला म्हणून हें स्थान श्रद्धावान् कुलपुत्रानें दर्शन घेण्याजोगें आणि मन उचंबळविणारे आहे. तेथें तथागताला अनुत्तर सम्यक् संबोधि प्राप्त झाली म्हणून हें स्थान तसेंच आहे. येथें तथागतानें अनुत्तर धर्मचक्र फिरविले म्हणून हें स्थान आणि येथें तथागत अनुपादिशेस निर्वाण धातूंत परिनिर्वृत झाला म्हणून हें स्थान श्रद्धावान् कुलपुत्रानें दर्शन घेण्याजोगें आणि मन उचंबळविणारे आहे.'

या प्रमाणे भगवंताशी निकट संबंध आलेली चार स्थानें बुद्धानुयायांच्या यात्रेचीं मुख्य स्थानें बनलेलीं आहेत. भगवंतांचा जन्म नेपाळांत लुंबिनी या गांवीं झाला. त्यांना हल्ली ज्या स्थानांस बुध्दगया असें म्हणतात तेथें संबोधि प्राप्त झाली. पुढें त्यांनी वाराणसीपासून दोन कोस अंतरावरील ऋषिपतन मृगदाय (सारनाथ) येथें त्यांनी आपल्या धर्माला गति दिली. शेवटी कुसीनारा अथवा कुशीनगर येथें त्यांनी पार्थिव देहाचें विसर्जन केलें. ही बौद्ध लोकांची चतुर्विध महायात्रा झालेली आहे.

श्री. ल. ना. अंकुश गुरुजी यांना वरील स्थानांपैकी बुध्दगया आणि ऋषिपतन ह्या दोन महास्थानांची तसेंच सांची ह्या बुध्दोत्तर निर्माण झालेल्या प्रचंड स्तूपाचें दर्शन घडलें. त्यांनी या महायात्रेचें वर्णन श्रद्धायुक्त अंत:करणानें केलेलें असल्याने त्यांत अमृताची गोडी येते. गुरुजींच्या अंत:-करणांत तशी श्रध्दा आहे व म्हणूनच त्यांचें पुस्तक वाचतांना आपण त्याच्या बरोबर यात्रेला गेल्यासारखे वाटतें.


महाराष्ट्रांतील बौध्दजनांना ह्या यात्रा लांबच्या वाटतील; परंतु त्यांच्या हिंदु बांधवांचा दर एकादशीला पंढरीला जाऊन विठ्ठलाचें दर्शन घेण्यांत एकंदर जितका पैसा व वेळ खर्च होत असेल तितक्यांच खर्चात सबंध आयुष्यांत एकतरी बौध्द यात्रा होईल. गुरुजीनीं फार मेहनत घेऊन हे प्रवासवर्णन लिहिले आहे. आपण काय पाहिले ? याचें धावतें वर्णन देऊन ते थांबले नाहीत तर माहिती देणाऱ्या ग्रंथांतून सर्व प्रकारची माहिती त्यांनी गोळा केली आहे.

भारतांत बुध्दाच्या या कालापासून अस्पृश्य वर्ग अस्तित्वांत आहे. या वर्गाच्या उध्दाराकरितां सनातनी शास्त्रकारांनी कोणताहि यत्न केला नाही, उलट त्यांच्यावर नवीन नवीन प्रतिबंध लादिले. मनुष्यांच्या समतेवरच काय पण किडामुंगीपासून परमात्म्यापर्यंत सर्वत्र एक ब्रह्म व्यापून राहिलें आहे असें तत्त्व चिन्तनापुरतें आहे, व्यवहारांत त्याला काडीइतकें स्थान नाहीं असें आमचा समाज समजत आला. परलोकांतील हिताहितापेक्षां इहलोकांतील जनहिताकडे विशेष ध्यान देणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाची शिकवण आत्मसात् करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या खाईत पडलेल्या आपल्या बांधवांना जागे करून बौध्द धर्माची दीक्षा घ्यावयास लाविलें यांत त्यांनी मोठे बुध्दीचातुर्य दाखविले. ख्रिस्ती व मुसलमानी धर्म भारतीयांच्या अजागळपणामुळे भारतांत फोफावत चालले आहेत परंतु त्यांचा स्विकार राष्ट्रीयत्व विघातक आहे. त्यांतल्या त्यांत मुसलमानी धर्म आपल्या अनुयायांस सर्व प्रकारचें स्वत्व विसरावयास लावतो. आपलें जन्म नाम व कुलनाम देखील तो पुसावयास व जन्मभूमीला परदेश मानावयास लावितो। बौध्द धर्म संपूर्णपणें भारतीय परंपरेंत उगम पावलेला आहे. बौध्द धर्म क्षेत्रें भारतांत आहेत. देश, वेश, भाषा, संस्कृति यांचा त्याग करण्याची आवश्यकता बौध्दांना नसते. उलट हिंदु धर्मांत अस्पृश्य उर्फ हरिजन वर्गांत रहाण्यानें जी लाचारी त्यांना पत्करावी लागत होती ती आतां नाहीशी झाली आहे. हिंदु समाजानें बौध्दांना परकीय न लेखतां जैनांप्रमाणें आपल्यांत मिसळून द्यावे यांत त्यांचे हित आहे.

श्री. अंकुश गुरुजीना लुंबिनी आणि कुसीनारा ह्या स्थळांचें दर्शन अजून घडलें नाही असें दिसतें. भगवंतांच्या आशीर्वादानें त्यांना ती स्थळें पहाण्याचा योग लवकर येवो असें इच्छितो. पुस्तकांतील माहिती आणि लेखकानें जागोजाग काढलेलें उद्गार यांच्या योगें पुस्तक सामान्य वाचकांस आणि विद्यार्थ्यांस फार उपयुक्त झालें आहे. शालेय वाचनासाठी हें पुस्तक शिक्षण खात्यानें मंजूर करावें अशी माझी शिफारस आहे.

२३ नातूबाग,
पुणें नं. २

चिंतामण विनायक जोशी,


उत्तर-पूर्व-मध्य भारत
दिल्ली
सहारनपुर
हरद्वार
आग्रा
लखनौ
अलाहाबाद
बनारस
पाटणा
गया
आसनसोल
कलकत्ता
पुरी
वाल्टेयर
विजयवाडा
हैदराबाद
सोलापूर
पंढरपूर
पूना
मुंबई
भोपाळ
सांची
झांसी
इटारसी

# माझें बौद्ध तीर्थाटन

## सांची, सारनाथ व बुद्धगया

### भाग पहिला

१३६०८

### प्रवासाच्या वाटेवर

गेल्या दोन तीन महिन्यांपासून मला एकप्रकारची हुरहूर नि कमालीची उत्सुकता लागून राहिली होती, ती म्हणजे उत्तर भारताची " शैक्षणिक सहल." आणि त्या सहलीला जाण्यासाठीं ज्या दिवसाची एकाद्या चातक पक्षाप्रमाणें मार्गप्रतिक्षा करीत होतों तो दिवस आज एकदांचा उगवला. तो म्हणजे सोमवार दिनांक १७।१०।१९६० हा होय.

सहल म्हटली कीं, ती आमच्या शिक्षक पेशाला एक प्रकारचें मोठें अत्यावश्यक खाद्यच होय. माझ्या २०-२२ वर्षांच्या व्यवसाय कार्यांत जगाचा इतिहास-भूगोल शिकवितांना चार फूट लांबी रुंदीच्या छापील नकाशावरील नांवाशिवाय एकाहि नांवागांवाची प्रत्यक्ष ओळख नसलेला ; एवढेंच कशाला मी ज्या भारतभूचा नागरिक, ज्याच्याबद्दल मला नितांत अभिमान त्या भारतांतील-नव्हें माझ्या महाराष्ट्रांतील सुद्धां चार दोन जिल्ह्यांपेक्षां अधिक कोणताहि प्रदेश मी कधी डोळयाखालून घातला नाहीं. अशा अवस्थेंत मला माझा अफाट भारत देश अंशत: तरी पहावयास मिळणार याचे औत्सुक्य कां बरें वाटणार नाहीं ?

केल्यानें देशाटन पंडित मैत्री सभेंत संचार ।
शास्त्र ग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ।।

ही वामन पंडितांची लहानपणीं वाचलेली कविता अद्याप मुखोद्गत

आहे, परंतु तिच्यांतील आशय प्रत्यक्षांत आणणें आजपर्यंत अनेक अडचणींमुळें कधींच शक्य झालें नाहीं. यावेळीं मात्र आमच्या मुंबई महापालिका प्राथमिक शिक्षकांनीं सर्व अडीअडचणींना निश्चयानें तोंड देऊन सहलीला जावयाचेच असा मनाचा हिय्या केला, नि त्यांत रेल्वे खात्यानें शिक्षकांना भाड्याच्या दरांत अल्पसें कां होईना सवलतीचें वरदान दिल्यानें आमचा उत्साह द्विगुणीत झाल्यास नवल तें काय?

माझा सहलीचा उद्देश याहीपेक्षां अधिक निराळा नि वैशिष्ठ्यपूर्ण होता. सहलीस जाण्याच्या स्थळांच्या नावांची यादी वाचतांच त्यांत माझ्या व्यवसायाला ज्ञानवृद्धीच्या दृष्टीनें पोषक अशी नांवें तर त्यांत होतीच. परंतु त्याहिपेक्षां अधिक आकर्षित करणारी "सांची, सारनाथ, बुद्धगया" हीं नांवें त्या यादींत असल्यानें माझ्या उत्सुकतेंत अधिक भर पडली. कारण नुकताच मी चातुर्वर्णावर आधारलेल्या हिंदु धर्माचा त्याग करून, समतेवर आधारलेल्या बौद्ध धर्माचा स्विकार केला होता. त्या बौद्ध धर्माच्या तीर्थस्थानाचें प्रत्यक्ष अवलोकन करून, त्या धर्माबद्दलचें अधिक ज्ञान पदरीं पाडून घ्यावें या आत्यंतिक तळमळीनें सदर महलीस जाण्यास मी दुप्पट उत्साहानें प्रवृत्त झालो.

अशा या उत्साहवर्धक सहलीस जाण्याचा दिवस आज उजाडला. नेहमीपेक्षां आज लवकर उठलों. सकाळपासूनच बरोबर न्यावयाच्यासामानाच्या जमवाजमवीची धांदल, प्रवासास जाण्याचें कुतुहल नि जिज्ञासा तद्वत्च आयुष्यांत प्रथमच एवढ्या दूरच्या प्रवासास जात असल्यानें हवापाणी यांच्या बदलानें आरोग्याच्या असुरक्षिततेबद्दल मनांत वाटणारी अंधुकशी भीति इत्यादि संमिश्र भावनेनें एकदांचा घरांतून निघालों, नि दुपारीं ठीक ३-२० वाजतां बोरीबंदर स्टेशन गांठले. तेथें आमच्या सहल चिटणीसांनीं आमच्या एकूण १८ दिवसांच्या प्रवासासाठीं एक बोगी (स्वतंत्र डबा) रिझर्व्ह केली होती. ती बोगी मुंबईला परत येईपर्यंत ती आम्हांला नि आम्ही तिला पारखें होणार नसल्यानें, मी त्या इराद्यानें योग्य स्थळीं जागा निश्चित केली, नि सामान लावले. आमच्या पंजाब मेलनें ठीक ३-३० वाजतां स्टेशन सोडलें नि आम्ही एकदाचे प्रवासाच्या वाटेला लागलो.

सहलीला निघालेले आमचे सहप्रवासी एकूण ८८ होते आणि आमच्या

बोगीचें आठ कंपार्टमेंट (विभाग) होते त्या हिशोबानें आम्हीं ११–११ जणांचा एक एक असें आठ गट पाडून त्या प्रत्येक गटांवर एकेक गट प्रमुखाची नियुक्ति केली. उद्देश हा कीं, त्या गट प्रमुखां-मार्फत सर्वांची व्यवस्था नि देखभाल नियंत्रित करतां यावी.

**मिश्रपंगत**

आमच्या पंजाब मेलनें संध्याकाळीं ७-४० वाजतां नासिक स्टेशन सोडलें नि आम्हीं सर्वजण घरून आणलेलें जेवणाचे डबे सोडून भोजनास बसलो. जागेच्या मर्यादित बंधनामुळें प्रत्येकांस एकमेकांस अगदीं घट्ट चिकटून बसावे लागले. प्रत्येक कंपार्टमेंटमधील अकरा जण व्यवसायाच्या दृष्टीनें व भाषेच्या दृष्टीनें जेवणाचे डबे उघडे होईपर्यंत समतेच्या भूमिकेंत होतो परंतु डबे उघडल्याबरोबरच परस्परांच्या जातीहि उघड्या झाल्या.

शाकाहारी ब्राह्मण, शेजाऱ्याच्या मटनाच्या कालवणाच्या नि तळलेल्या मासळीच्या वासाबरोबरच आपला शुद्ध शाकाहारी घास गिळत होता. जागेच्या मर्यादित बंधनामुळें इच्छा असूनहि त्याला चुळबूळ करतां येत नव्हती. सदर ते अभक्ष्य पदार्थ दृष्टिक्षेपांतच असल्यानें; स्वतःच्या दृष्टीवर बंधन घालणेंहि त्याच्या शक्तिबाहेरचे होते. असा हा औचित्यपूर्ण पण अपूर्व पंक्तीचा सोहळा एखाद्या प्राचीन सनातनी कर्मठ ब्राह्मणानें पाहिला असतां तर त्यानें दोन्हीं हातानें ठणाणा करून, तो बेशुद्धच झाला असता. परंतु ह्या प्रवासी समुहांत जरी ब्राह्मण होते, तरी ते विसाव्या शतकांतील होते. म्हणून त्यांनी आपल्या वागणुकींत कसल्याहि प्रकारचा तुसडेपणा भासूं दिला नाहीं. उलट जेवण इतकें खेळीमेळीनें नि हास्य विनोदांत पार पडलें कीं, जणूं एका कुटुंबांतील हें सर्व लोक आहेत, असेंच प्रत्येक स्टेशनवरील बाहेरून पाहणाऱ्या लोकांस वाटत होते.

अशा रीतीनें भोजनाच्या कार्यक्रमानंतर प्रत्येकानें आपापल्या गट-प्रमुखामार्फत आपल्या कंपार्टमेंटमध्यें झोंपण्याची व्यवस्था केली. परंतु त्या रात्रीं गर्दीमुळें कित्येकांना झोपण्याच्या बाबतींत गैरसोय सहन करावी लागली. ही उणीव उद्यां कशी भरून काढावयाची याच्या योजना आंखून सर्वजण झोंपले.

**भोपाळ** **मंगळवार दि. २८**

आज सकाळीं आमची गाडी भोपाळ हद्दींत बारखेडा स्टेशनवर आल्यावर सूर्योदय झाला होता. त्यामुळें बारखेडा ते भोपाळ दरम्यांतील भू-प्रदेश सकाळच्या सूर्य किरणांनीं उजाळून निघाला होता. चालत्या गाडीतूनच तें मनोहर सृष्टिसौंदर्य डोळ्यांनी जितकें टिपून घेतां येईल तेवढें घेतलें. त्या तंद्रींत आम्हीं तल्लीन असतांनाच आमची गाडी भोपाळ स्टेशनांत येऊन थडकली. आमची बोगी त्याच स्टेशनवर संध्याकाळीं ४ वाजेपर्यंत राहणार होती. व पंजाबमेल तिला तेथेंच सोडून पुढें जाणार होती. कारण आम्हांला भोपाळ शहर पाहून बौद्धतीर्थस्थान जे सांची तेथें जावयाचे होते. परंतु बोगी लावण्यास सांची स्टेशनवर जागा नसल्यानें रेल्वे अधिकाऱ्यानीच ती व्यवस्था केली होती. म्हणून आमचे सर्व सामान बोगींतच ठेवून नि बरोबर आणलेल्या तीन सैंपाक्यांना दुपारच्या जेवणाची तयारी करण्यासाठीं तेथें ठेवून; आम्ही सर्वजण शहर पाहण्यास निघालों. सर्वांनीं शहर पाहून ठीक १० वा. स्टेशनवर आलेच पाहिजे, या अटीवर कोणी टांग्यांतून कोणी टॅक्सींतून तर कोणी पायींच अशा तऱ्हेनें सर्वजण गेले.

आमच्या गटांतील सर्वजण पायींच निघालें. आम्ही सेंट्रल लायब्ररी, सरकारी बाग, म्युझियम, इलेक्ट्रीकल् कारखाना, कमला पार्क, अशियाबाग, फऱ्हात फजाबाग, जुना राजवाडा, मोतीमशीद, इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहत पाहत त्या शहरांतील विस्तीर्ण अशी जी जुम्मा मशीद ती पाहण्यास आलो.

**मशीदींत बुद्ध मूर्ति**

सदर मशिदींतील व्यवस्थापकांची परवानगी घेऊन आम्हीं आंत गेलो. मशीदीच्या चार कोपऱ्यावर चार मोठें मिनार असून त्यांचे कळस शुद्ध सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेलें आहेत असे समजले मशीदींतील आंतील सर्व विभाग फिरून पाहिला. मध्यभागीं एक मंदीराच्या धाटणीचा बांधकामाचा भाग दिसला. तेथें गेलों. ती मुसलमानांची सामुदायिक प्रार्थनेची जागा होती. मी त्या जागेच्या आकाराचे नि नक्षी बांधकामाचे निरीक्षण करीत असतांच

वरच्या भागास छताला कोरलेली मला बुद्धमूर्ति दिसली. ती पाहातांच माझ्या दृष्टीवर माझा विश्वासच बसेना. म्हणून मी इतरांचें लक्ष तिकडे वेधून ती वर कसली मूर्ति आहे ? म्हणून पृच्छा केली. त्या प्रत्येकानें ती बुद्धमूर्तीच असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. नंतर त्वरीत मी तेथील व्यवस्थापकांकडून माहिती मिळविली. त्यानें दिलेल्या माहितीवरून समजलें कीं, पूर्वीं या जागीं भले मोठे नि सुंदर असे बुद्धमंदिर होते. परंतु एका मुसलमान नबाबानें ते मंदिर विध्वंस करून त्यांतील सर्व मूर्ति नि शिलालेख स्तंभ यांचा नायनाट केला, परंतु हा मधला भाग बांधणीच्या दृष्टीनें उध्वस्त करणें प्रशस्त वाटलें नाहीं. शिवाय सदर मूर्ति डेऱ्याच्या मध्यभागीं उंच दगडावर कोरली असल्यानें संबंध डेरा उध्वस्त केल्याशिवाय मूर्तीचें अस्तित्व नष्ट करणें शक्य नव्हते. म्हणूनच तिचें अस्तित्व टिकलें.

त्या जागीं बुद्धमूर्ति नसती तर पूर्वीं या स्थळीं प्रशस्त बुद्धमंदिर होते नि मुसलमानांकडून उध्वस्त केले गेलें अशी ग्वाही कोणालाहि देतां आली नसती. यावरून भारताबाहेरील मुसलमान राजांनीं भारतांतील संपत्तीच्या अभिलाषेबरोबरच तेथील इतर धर्महि नष्ट करण्याची त्यांची प्रबळ इच्छा असल्याचा दृश्य इतिहास त्या स्थळीं आजहि पाहावयास मिळतो.

० ० ०

# बौद्ध तीर्थ क्रमांक १

## सांची

भोपाळ शहर पाहून आम्ही स्टेशनवर आलों. तेथें सकाळीं १०–२० ला इटारसी झांशी पॅसेंजरनें निघून सांची स्टेशनवर ठीक १२ वाजतां पोहोंचलों. तेथें स्नान वगैरे विधी आटोपून सांचीचा जगप्रसिद्ध स्तूप पाहण्यास पायीं निघालों. त्या सर्वांत आम्हा बौद्धधर्मीय शिक्षकांची उत्सुकता भरवेगांत खेचून आम्हांस पुढें रेटीत होती. एक लहानशी टेकडी चढून वर गेल्यावर सदर भव्य स्तूप आमच्या दृष्टीपथांत आला. या परिसरांत जाण्यापूर्वीं आमच्याकडून प्रत्येकीं २० न. पै. कर घेऊन पावती देण्यांत आली.

प्रथम आम्ही सर्वजण बुद्ध मंदीरांत गेलों. तेथील स्वच्छता, टापटीप नि सुचिर्भूतपणा अगदीं अवर्णनीय दिसली. आम्ही बौद्धधर्मीय शिक्षकांनीं सामुदायिक प्रार्थना घेतली व बाहेर आलों. हें मंदिर सिलोन सरकारनें बांधून दिलें आहे असें समजतें.

## सुप्रसिद्ध भव्य स्तूप

नंतर तेथून जवळच असलेल्या स्तुपाकडे वळलो. हा जागतिक कीर्तीचा भव्य स्तूप अंडाकृति असून त्याच्या चोहों बाजूस उत्तम मेघडंबरी आहे हा मेघडंबरी (ओटा) प्राचीन काळी प्रदक्षिणा पथाचे कार्य करीत असे. याच्या दक्षिण भागीं जिना आहे. चार बाजूला चार महाद्वारें आहेत, त्यावर विविध प्रकारच्या सुंदर आकृत्या कोरल्या आहेत. शिवाय त्यावर कलाकृति-संपन्न असें तोरण आहे. हा संपूर्ण स्तूप भडक लाल रंगाच्या दगडांचा बनविला आहे. आज जरी तो अंशत: भग्नावस्थेंत असला तरी पूर्वायुष्यांतील त्याची भव्यता नि सुंदरता पटण्याइतक्या अवस्थेंत तो आजहि अस्तित्वांत आहे.

या स्तूपाचें बांधकाम सम्राट आशोकानंतर झालें असावें असें कांही जणांचें मत आहे. अशोककाली तेथें फक्त विटांनीं बांधलेला स्तूप होता, असेंहि कांहीं लोक सांगतात. परंतु हा स्तूप इ. स. च्या २०० वर्षांपूर्वी सम्राट अशोक यांच्या कारकीर्दींतच बांधला गेला असें कॅनिंगहॅम यांचें मत आहे. शिवाय स्तूपाच्या पश्चिम द्वाराजवळ एक ४२ फूट उंचीचा तुटलेला शिलास्तंभ आहे. त्यावर सारनाथाप्रमाणेंच चार सिंहमूर्ति कोरल्या आहेत. या स्तंभावर सम्राट अशोकाचाहि एक शिलालेख आहे. यांवरून हा स्तूप अशोककालीनच असावा असा तर्क करण्यास पुरेसा पुरावा आहे

त्यानंतर आम्ही स्तुपाच्या उत्तरेस असलेल्या पुराणवस्तु संग्रहालयाकडे (म्युझियम) गेलों. तेथें छत्री, काठीं आदि वस्तू आंत नेण्यास मनाई आहे. आंत गेल्यावर तेथें भग्नावस्थेंत असलेल्या अनेक बुद्धमूर्ति त्या काळची कोरीव कामाची नि इतर हत्यारे, भांडी शस्त्रे नि शिल्पकलेच्या विविध वस्तू ठेवलेल्या आढळल्या. त्या म्युझियमच्या दारांवर सतत सरकारी पहारा असतो.

अशा रीतीनें स्तूपाच्या आसपासचा सृष्टिसौंदर्याचा भाग पहात ठीक ३ वाजतां सांची स्टेशनवर आलों. तेथे प्रवाशांच्या खास सोयीसाठीं स्नान गृहें उत्तम बांधलेली आहेत तेथें सर्वांनी स्नान करून, शिल्लक राहिलेलें अन्न सेवन केलें. आणि आमची मागे राहिलेली बोगी ज्या पठाणकोट एक्स्प्रेसने येणार होती, तिची वाट पाहत बसलों. सदर गाडी ठीक ४-३० वाजतां आली. आमची बोगी अगदीं शेवटी होती. तींत सर्वजण आपापल्या ठराविक जागेवर जाऊन बसलों. संपाक्यानें जेवण तयार करून आणले होतेच परंतु भोजनाची अपेक्षा कोणासच नव्हती. रात्री आठ वाजतां चालत्या गाडींतच जेवणाचा कार्यक्रम उरकला. गप्पागोष्टीं, करमणुकीनंतर आम्हीं झोपलों. या वेळीं मात्र आपल्या रात्रीच्या झोंपण्याच्या गैरसोयींच्या अनुभवावरून आज प्रत्येक गटप्रमुखानें जाड दोरानें वरचे दोन्ही स्टॅण्ड गुंफले नि वर एक माळा प्रत्येक कंपार्टमेंटमध्यें तयार केला गेल्यामुळें वर एकावेळीं चार जण, खालीं पांच आणि बाजूस दोन अशा अकरा जणांची एकदम झोंपण्याची आरामशीर व्यवस्था होऊं शकली.

**आग्रा :** **बुधवार दि. १९**

आज पहाटें ठीक २-२० वाजतां आमची गाडी आग्रा स्टेशनवर आली. आम्ही सर्वजण स्नानाचे साहित्य घेऊन स्टेशनवर उतरलों. आमची बोगी तेथेंच परंतु योग्य स्थळीं लावली गेली. आम्ही स्नानादि विधी आटोपून स्टेशन बाहेर आलों. तो तेथें अगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बस उभ्या होत्या. त्यांत बसून फत्तेपूर शिक्री येथील सुप्रसिद्ध किल्ला पाहण्यास गेलों तेथून दुपारी एक वाजतां येऊन बोगींत बसून भोजन केले. थोडक्या विश्रांती-नंतर परत त्याच बसमधून पुढील स्थळांना धावत्या भेटी दिल्या. जगप्रसिद्ध ताजमहाल, आग्र्याचा किल्ला, नूरजहानच्या वडिलांची कबर, चिनीका रोझा, दयाळबाग, जुम्मामशीद, अकबराची कबर, आणि रामबाग इत्यादि स्थळें पाहून रात्रीं ९ वाजतां स्टेशनवर आलों नि बोगींतच जेवणाचा कार्यक्रम उरकून, तेथें गप्पा गोष्टींत दंग होऊन गेलो रात्रीं ठीक १०-४० वाजतां आमची बोगी सेंट्रल रेल्वेच्या झांशी-दिल्ली पॅसेंजरला जोडली गेली नि आमच्या पुढील प्रवासास गति मिळाली

**नवी दिल्ली : गुरुवार दि. २०**

आमची गाडी सकाळीं ८–४५ वाजतां नवी दिल्ली स्टेशनांत आली. आम्हीं आवश्यक सामान घेऊन स्टेशनबाहेर पडलों तो तेथें अगाऊ रिझर्व्ह केलेल्या दोन एस्. टी. च्या बसेस आमची वाट पहातच उभ्या होत्या. त्यांत जाऊन बसलों.

प्रथम आम्ही महात्मा गांधीजींच्या समाधीकडें गेलों. शहरांतून जातांना हे शहर आमच्या स्वतंत्र भारताची राजधानी आहे म्हणून अभिमानानें सर्वांचे चेहरे खुलून दिसत होते. मात्र मुंबई शहरांत वास्तव्य करणाऱ्या आम्हा सारख्यांना शहर रचनेचें कुतुहल कितपत वाटणार ?

राजघाटावर गेलों, तेथें सर्वजण समाधिभोंवतीं मोठ्या गांभीर्यानें उभ राहून महात्माजींची आवडती प्रार्थना " रघुपतिराघव..." ही म्हटली. समाधीस पुष्पांञ्जली नि आदरांजली भक्तिभावानें अर्पण करून, यमुना घाटावर स्नानास गेलो. तेथें स्नान करून मग शहरांतील प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यास गेलों. अनुक्रमें नवी दिल्ली येथील दिल्ली दरवाजा, राष्ट्रपति भवन, पार्लमेंट हाऊस, जंतर मंतर ( वेधशाळा ) सचिवालय, बिर्लामंदिर, नॅशनल म्युझियम, लक्ष्मी नारायण मंदिर, सुरजकुंड, हुमायुनची कबर, आयर्न पिलर, कुतुबमिनार इत्यादि स्थळांना धांवत्या भेटी देऊन, दुपारीं २ वाजतां स्टेशनवर आलों. प्रत्येकाला ३ वाजेपर्यंत आपापले मर्जीप्रमाणें हॉटेलमध्यें जेवण आटोपून येण्याची सवलत चिटणीसांनीं दिली होती. त्याप्रमाणें प्रत्येकजण वैयक्तिकरित्या शहरांत फिरावयास गेले. रात्रीं ९ वाजतां सर्वजण स्टेशनवर येऊन आचाऱ्यानें तयार करून ठेवलेल्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेण्यांत गढून गेलों. रात्री बोगींतच सर्वजण झोपलों.

**जुनी दिल्ली : शुक्रवार दि. २१**

आज सकाळींच उठून आम्ही सर्वांनीं स्टेशनवरील स्नानगृहांत आंघोळी केल्या. जुनी दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं, स्थानिक एका खाजगी मोटारवाल्याकडून दोन बसेस भाड्यानें घेतल्या होत्या. त्या सकाळीं १० वाजतां येणार असल्यामुळें आम्हापैकीं कांहींजण डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांना गुरुस्थानी मानणारे बौद्धधर्मीय १०–१२ शिक्षक ते पूर्वी रहात असलेल्या नि जेथें शेवटीं त्यांचा देहांत झाला तो " राजगृह " बंगला पाहण्यासाठीं लखमणी नपूरोडवर गेलों. तेथून बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेस भेट दिली व स्टेशनवर आलों. नि ठरल्याप्रमाणें बसनें जुन्या दिल्लींतील अशोक पिलर ( स्तंभ ) लाल किल्ला, दिल्ली फोर्ट, म्युझियम, चांदणी चौक, जुम्मा मशीद इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहून आमच्या निवासस्थानीं (बोगींत) परत आलों रात्रीं आठ वाजतां आमची बोगी उत्तर रेल्वेच्या–मसुरी एक्सप्रेसला जोडली गेली नि राजधानीचा निरोप घेऊन आम्ही पुढील प्रवासाला लागलों.

**हरद्वार हृषिकेश** **शनिवार दि. २२**

रात्रीं आठ ते आज सकाळीं सात वाजेपर्यंत एकूण अकरा तासांचा गाडीनें अंधाऱ्या रात्रींतून प्रवास केल्यामुळें बाह्य प्रदेशाची कसलीच कल्पना येऊं शकली नाहीं. सकाळीं ७ वाजतां हरद्वार स्टेशनवर उतरून लगेच आगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बसनें हृषिकेशला जाण्यास रवाना झालों. आमच्या मोटारी घनदाट अरण्यांतून जात होत्या. सदर जंगलांत सिंह, वाघ आणि हत्तींचे मोठाले कळप फार असतात. असें ड्रायव्हरकडून समजलें. मध्यंतरी दोन ठिकाणीं जकात नाकें लागलें. तेथें आम्हांस प्रत्येकाला " यात्रेकरुं " नांवाचा कर भरावा लागला. सदर स्थळ हें हिंदूंचे पवित्र तीर्थस्थान असल्यानें दूरदूरचे यात्रेकरूं या स्थानाला भेटी देतात ; त्यामुळें सरकारला कराचे बरेंच मोठें उत्पन्न मिळते असें समजलें. हृषि-केशला पोंहचल्यावर प्रथम गंगानदी ओलांडण्यासाठीं " लक्ष्मणझुला " नांवाचा तरंगता पूल ओलांडावा लागला. हा पूल लोखंडाच्या दोरीचा नि सळयांचा बनविला आहे. त्यावरून जात असतांना तो हालत असतो म्हणून त्यास सदर नांव पडले आहे. हा पूल दानशूरशेठ सुरजमल यांनीं बांधला. आहे. यात्रेकरूंकडून त्याच्यावर कर घेऊं नये असा त्यांनीं निर्बंध घातला आहे. यापूर्वीं येथें गंगा ओलांडण्यासाठीं शिक्याचा पूल होता. एका शिक्या वरून दुसऱ्या शिक्यावर असें जातांना जीवाची जोखीम वाटत होती पण खालीं वेगानें वाहणाऱ्या प्रवाहाकडे पाहतांना कित्येक प्रसंगी चक्कर येऊन

धोका नसतांनासुद्धां कित्येक लोक खाली पडत असत. ही परिस्थिति ओळखूनच सदर शेठजींनीं स्तुत्य नि उपकृत अशी चिरस्मरणीय बाब करून. यात्रेकरूंसाठीं निर्धास्त मार्ग बनविला आहे. या पुलावरून गंगेची नि तिच्या कांठच्या घनदाट जंगलाची शोभा कांहीं औरच दिसते. त्या स्थळाचें वर्णन करण्यास जातीवंत कवि किंवा साहित्यिकच हवा. गंगेचा स्फटिकासम स्वच्छ थंडगार प्रवाह, कांठच्या पहाडावरील रंगीबेरंगी पर्णांची नि फुलांची लहान मोठीं झाडें नि टेकडया हें सर्व दृश्य पाहून कोण कोणाची शोभा वाढवीत आहे हें सांगणें निदान माझ्या तरी बुद्धीच्या आटोक्यावाहेरचें वाटलें असो. पुलाच्या पलीकडे जाऊन, तेथील अनेक मंदिरें, मठ यांचें निरीक्षण करून, होडींतून परत पूर्व तीराला आम्हीं सर्वजण आलों नि बसनें परत हरद्वारला आलों. स्टेशनवर येऊन, बोगींतच जेवणाचा कार्यक्रम आटोपून रात्रौं ८ वाजेपर्यंत इतस्ततः फिरण्यांत घालविला नि ठीक ८-३० वा. उत्तर रेल्वेच्या 'डेहराडून' एक्स्प्रेसला आमची बोगी जोडली जाऊन आमच्या पुढच्या प्रवासास सुरवात झाली.

## लखनौ — रविवार दि. २३

आज सकाळीं ठीक ८-२५ वा. आमची गाडी लखनौ स्टेशनवर आली गाडीनें आमच्या बोगीस तेथेंच सोडून ती पुढे गेली. आम्हीं स्टेशनमध्येच स्नानादि कार्यक्रम उरकून घेतला. सदर स्टेशनची रचना, स्वच्छता त्याचप्रमाणें प्रवाशांच्या सुखसोयींच्या दृष्टीनें सदर स्टेशन अति वाखणण्यासारखे खास आहे. त्याची रचना फत्तेपूर शिक्री येथील बांधकामाची आठवण करून देत होती. सदर बांधकामाची रचना मोंगलकालीन मशीदीची किंवा किल्ला-कबरीच्या धाटणीची वाटली लाल रंगाच्या दगडाची घुमटें नि त्यावरील नक्षीकाम दुरून पाहणारास हें स्टेशन आहे असें कधींच वाटणार नाहीं. असो, आम्हीं स्टेशनबाहेर आलों तों बाहेर आगाऊ रिझर्व केलेल्या दोन बसेस आमचीच मार्गप्रतिक्षा करीत उभ्या असलेल्या दिसल्या. त्यामध्यें बसून हुसेनाबाद इम्-ब्रा, रोमी दरवाजा, छत्तर मंझील, भुलभुलय्या (इमारत) विंगफिल्ड पार्क, इत्यादि प्रेक्षणीय स्थळांना भेटी देऊन, दुपारीं

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत
अनुक्रम ................ वि: ........११
क्रमांक ................ नोंदि: ........


३ वा. स्टेशनवर आलों. भोजनादि कार्यक्रम उरकून प्रत्येकजण अगर टोळी-टोळीनें शहर पाहण्यास पायी गेलें. आम्हीं कांहीं शहराच्या पूर्व भागाकडे गेलों. तेथें शहराला लागूनच गोमती नदी वाहते. त्या नदीला गेल्या आठ-वड्यांतच महापूर आल्यानें त्या नदीच्या आसपासच्या भागांतील शेतांची-पिकांची तर महाभयंकर हानी झाली होतीच, परंतु गांवेच्या गांवें वाहून गेल्याचे वृत्तपत्रांत वाचलें होते. म्हणून या शहराला त्या पुराची कितपत झळ पोंहचली हे प्रत्यक्ष पाहण्यासाठीं गेलों. तेथील कांहीं घरांचे तर पायांचे चौथ-रेच शिल्लक असलेले दिसले. हे पाहून आमच्या मनाला धक्काच बसला. शेंकडों कुटुंबांचें सर्वस्व वाहून गेल्यानें ते निराधार बनलें होतें अशा कांहीं कुटुंबांच्या आम्हीं प्रत्यक्ष भेटी घेतल्या तेव्हां हें समजलें. अशा संकटग्रस्त कुटुंबाना सरकारनें त्वरित मदत देणें आवश्यक असले तरी इतर प्रांतीय जन-तेनेंहि अशा नैसर्गिक आपत्तींत सांपडलेल्या आपल्या देशबांधवांस सढळ हातानें मदत जमा करून पाठविणें किती निकडीचे आहे याचा विचार करीत करीतच आम्हीं स्टेशनवर आलों. भोजन करून ठीक १० वा. च्या लखनौ मोगलसराई पॅसेंजरला आमची बोगी जोडली गेली आणि आम्हीं निद्रेच्या आधीन झालों.

**अलाहाबाद** : सोमवार दि. २४

आमची गाडी सकाळीं ठीक ६ वा. अलाहाबाद स्टेशनवर आली आम्हीं स्नानादि विधी आटोपून, अगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बसनें प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास निघालों. प्रथम आम्हीं-गंगा, यमुना, सरस्वती या त्रिवेणी संगमावर गेलो संगम गंगा नदीच्या मध्यभागीं असल्यानें, आम्हांस होडीनें त्या स्थळीं जावें लागले. तेथें आमच्यांतील कांहीं धर्मभोळ्या भावि-कानीं गंगास्नान करून, पुण्यपदरीं पाडून घेतलें. एक बाब मात्र ठळकपणें तेथें दृष्टीस पडली ती म्हणजे ब्राह्मण-पंडे यांचे थवेच्या थवे आमचा पाठपुरावा करीत होते. यावेळीं आम्हां सर्वांना पंढरींतील बडव्यांची आठवण झाली. परंतु बडव्यापेक्षां या पंड्यांचा लगट करण्याचा चिवटपणा अगदीं तिर-स्करणीय असा वाटला. होडीतून पूर्ववत् किनाऱ्यावर येऊन बसमध्यें बसे-पर्यन्त त्यांनीं आमचा पिच्छा पुरवला होता. आमच्यांतील कोणीहि या परमे

श्वरांच्या " मध्यस्थांना (वकिलांना) " दाद न दिल्यानें शापवाणी उच्चारूनच त्यांना निराश परतावें लागले.

त्यानंतर क्रमानें हनुमानमंदिर, आनंद भुवन, विश्वविद्यालय, खुश्रुबाग अशोक स्तंभ आणि स्वराज्यभुवन यांना भेटी दिल्या. स्वराज्यभुवन ही भव्य इमारत आपल्या पंतप्रधानांचे पिताजी कै. मोतीलाल नेहरू यांच्या मालकीची होती. परंतु त्यांनीं मोठ्या उदारतेने ही भव्य इमारत कॉंग्रेस पार्टीला कार्यालयासाठीं देणगी म्हणून दिली. तेथून जवळच असलेल्या एका भव्य पण सुसज्ज अशा इमारतीकडे वळलों. ज्या स्थळीं आपले पंतप्रधान प. जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला ती ही इमारत होय. मोठ्या कुतूहलानें आम्हीं त्या इमारतींत शिरलों. तेथील रक्षकांकडून सर्व इमारत धुंडाळून पाहिली. ज्या वेळीं पं नेहरू त्या प्रांतांत येतात, त्यावेळीं कोणत्याहि परिस्थितींत येथें येऊन वास्तव्य केल्याशिवाय राहात नाहींत. एवढा त्यांना आपल्या जन्मस्थळाबद्दल नितांत आदर आहे.

अशा रीतीनें मोटारीनेंच सर्व शहरभर फेरफटका करून नि लहान मोठीं प्रेक्षणीय स्थळें पाहून दुपारीं स्टेशनवर आलों. भोजनाचा विधी आटोपून सायं. ४–३० वा. आमची बोगी "अलाहाबाद जौनपूर" पॅसेंजरला जोडली गेली नि पुढील प्रवासाच्या मार्गाला लागलों. रात्रौ ९–२० वा. आमची गाडी जौनपूर स्टेशनवर आली व तिनें आमच्या बोगीला तेथेंच सोडून ती पुढें गेली. आमचा मार्ग भिन्न असल्यामुळें आमच्या इच्छित स्थळीं बोगीसह आम्हांस घेऊन जाण्याचें कार्य तिनें आमच्या मार्गानें जाणाऱ्या दुसऱ्या गाडीवर सोंपवून ती निघून गेली. आम्ही निर्धास्तपणें बोगीतच झोंपून राहिलों होतों. पहाटें ठीक ५–१० वा. उत्तर रेल्वेची बरेली आसनसोल पॅसेंजर गाडी आमच्या बोगीला पुढें घेऊन केव्हां गेली याची दाद आम्हांला झोपेतून उठेपर्यंत नव्हती.

# बौद्ध तीर्थ क्र. २

**सारनाथ :** **मंगळवार दि. २५**

पहाटें जौनपूरहून निघालेली गाडी वाराणशी स्टेशनवर सकाळीं ६–२० वाजतां आली. आम्ही स्टेशनवर उतरलों. स्नानादि विधि आटोपून तेथून ३ मैलांवर असलेल्या सारनाथ या सुप्रसिद्ध बौद्धतीर्थस्थानीं एस्. टी. बसनें जाण्यास निघालों. मोटारींत बसण्यापूर्वी मेणबत्त्या अगरबत्त्या आदि साहित्य घेण्यास विसरलों नाहीं. मोटार भरवेगानें निघाली. परंतु आमची मनाची ओढ त्या मोटारीच्या सहस्र पटीनें पुढें धांव घेत होती. एकदाचे आम्ही इच्छित स्थळीं पोहोंचलों.

**मंदिरांत**

गाडींतून उतरल्यावरोवर मी माझ्या बौद्धबंधूंसह प्रथम बुद्धमंदिरांत जाऊन, तेथील भिक्खू श्री. धर्मकीर्ती यांची भेट घेतली. आणि येथें मंदिरांत प्रार्थना म्हणण्यासाठीं त्यांची परवानगी मागितली.

परवानगी देण्यापूर्वी त्यांनी आम्हांस पुढील प्रश्न विचारले. आपण सर्व कोठून आलात ? आपण बौद्ध धर्मीय आहांत कां ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण मानतां कां ? इत्यादि त्यांच्या सर्व प्रश्नांना योग्य ती उत्तरें दिल्यानंतर शेवटच्या प्रश्नाचें स्पष्टीकरण करतांना मी म्हणालों, ' आम्ही महाराष्ट्रीय नवदीक्षित बौद्ध भगवान गौतम बुद्धाइतकेंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानतों इतकेंच नव्हे तर भगवान गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची अद्याप पूर्ण ओळख न झाल्यानें डॉ. बाबासाहेबांवरील आमची श्रद्धा भ. बुद्धापेक्षां अंशत: थोडी अधिकच भरेल.

हीं उत्तरें ऐकून भिक्खू-धर्मकीर्ती हर्षभरित अंत:करणानें बाबा-साहेबांच्या स्मृतीला मनातलें मनांत अभिवादन करून प्रार्थना घेण्यास सिद्ध झाले. आम्ही सर्वांनीं बुद्धवंदना म्हटली. आमच्याबरोबर इतर धर्मीय आमचे सहप्रवासीहि सामील झाले होते. प्रार्थना संपल्यानंतर भिक्खू धर्म-

कीर्ती यांनी या स्थळीं सर्वत्र फिरवून दीड दोन तास आम्हांस जी माहिती दिली ती पुढें देत आहे.

## मार्ग

सारनाथ हें क्षेत्र बौद्धधर्मीय चार प्रमुख तीर्थ क्षेत्रांपैकीं एक आहे. हें स्थळ वाराणसी स्टेशनपासून सुमारें तीन मैल असून वरुणा नदीच्याकांठी वसलेलें आहे. स्टेशनपासून एक विस्तीर्ण पक्की सडक असून प्रवाशांच्या सोयीसाठीं एस्. टी. बस, टॅक्सी, टांगे, एक्के, इत्यादि भरपूर वाहनें असून नी सर्व गाजीपूर रोडनें धांवतात.

## पूर्वेतिहास

सारनाथचें प्राचीन नांव " इसीपतन मिगदाय " असे होतें. परंतु सिहली लोक याला ' इसीपत नारायम ' म्हणतात. ब्रह्मी लोक ' मिगदाउ ' चिनी लोक ' लुयेवा ' तिबेटी व भूतानचे लोक ' वाराणसी ' आणि भारतीय लोक ' सारनाथ ' या नांवानें संबोधितात. परंतु सारनाथ हें नांव फार प्राचीन नाहीं. फार तर शंभर सव्वाशें वर्षांपासून हें नांव पडल्याचें सांगतात. सारंगनाथ या शब्दाच्या उत्पत्तीपासून हे नांव पडलें असावें असा तर्क आहे.

## स्थान महात्म्य

सारनाथ हें स्थळ बौद्धधर्मीयांच्या दृष्टीनें अत्यंत पवित्र नि महत्त्वाचें स्थान मानले जातें. कारण लुंबिनीबाग हें जरी भगवान बुद्धाचें जन्मस्थान असले, बुद्धगया ज्ञानप्राप्तीचें स्थान असलें आणि कुशीनगर हे महापरि निर्वाणाचें स्थान असलें तरी गौतम बुद्धाचें धर्मचक्र प्रवर्तनाचें महत्त्वपूर्ण कार्य या स्थळींच सुरवात झाल्यामुळें या स्थळाला बौद्ध जगांत आगळें असेंच महत्त्व आहे. भगवान बुद्ध हे बुद्धगया येथें बोधीवृक्षाखाली प्राप्त झालेलें ज्ञान आपले आरंभीचे दोन गुरु आडार कालाम आणि उद्रक याना सांगण्यासाठीं तेथून निघाले. त्यांचा शोध करीत करीत चालले असतां वाटेंतच त्यांना समजलें की, ते दोन्ही गुरु केव्हांच स्वर्गवासी झाले आहेत. म्हणून भ.

बुद्धानें तो मार्ग सोडला नि ते काशीक्षेत्राकडे वळले. भ. बुद्ध जेव्हां उरुवेल वनांत तपश्चर्या करीत होते त्यावेळीं जें पांच शिष्य त्यांच्याजवळ होते (कौंडिन्य, वप्प, भद्दिय, महानाम व अस्सजि) ते त्यावेळीं काशीजवळच्या वनांत अध्ययन करीत आहेत असे त्यांना समजल्यावरून ते तिकडे त्यांच्याकडे जाण्यास निघाले, उद्देश हा कीं, आपणांस जे ज्ञान प्राप्त झाले आहे किंवा मानवी सुखाची जी तत्त्वें उमगलीं आहेत ती प्रथम या पांच शिष्यांना सांगावीत.

ज्या वनांत ते शिष्य अध्ययन करीत होते ते काशीपासून सुमारे ३ मैलावर असून हल्ली जेथें सारनाथ आहे त्याच जागीं हे वन अगदी दाट आरण्यांनी वेढलेलें होते त्या ठिकाणीं भगवान गेले. भ. बुद्धाला येतांना लांबूनच ह्या पांचहि शिष्यांनीं पाहिलें नि आपसांत म्हणाले कीं, तो पहा गौतम येत आहे. यानेहि देह पवित्र होण्याचा मार्ग सोडला. आणि उपवास व देहदंड हे मार्ग सोडून हा आतां यत्किंचित मनुष्याप्रमाणें खाण्यापिण्यावर घसरला आहे, असें म्हणून गौतमबुद्धाकडे अगदीं तुच्छतेनें पाहूं लागले. भ. बुद्धाच्या लक्षांत ही गोष्ट आली. परंतु त्यांनीं तिकडे दुर्लक्ष करून, त्याच्या जवळ गेले, आणि आपल्या गोड नि रसाळ वाणीनें त्या पांच साधूंना बोधामृत पाजिलें, भगवान बुद्धांना बोधिवृक्षाखालीं जे ज्ञान प्राप्त झाले त्याचे स्पष्टीकरण करून ते साधूंना म्हाणाले कीं, 'या जगांत ईश्वर नाहीं. हे जग ईश्वरानें निर्माण केलें नाहीं, त्याचप्रमाणें इंद्रिय सुखाच्या मागें लागून ऐषारामांत राहणें किंवा जगांतील सौख्याचा त्याग करून, उपवास व देहदंड सोसून काल्पनिक ईश्वराच्या मागें लागणें हे दोन्हीं मार्ग चुकीचें नि मानव सुखाच्या दृष्टीनें हानिकारक आहेत.

अशा तऱ्हेचा उपदेश भगवंतांनी त्यांना सांगितल्यावर त्या साधूंनीं त्यांना अनेक प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक भगवंतांनीं दिल्यानंतर त्या साधूंचें मतांतर झाले. नि त्यांनी तपश्चर्येचा मार्ग सोडला व भ. बुद्धाचे ते शिष्य झाले. भगवंतांनीं त्या शिष्यांना योग्य तें ज्ञान पटवून त्या ज्ञानाचा प्रचार नि प्रसार होण्यासाठीं त्यांना निरनिराळ्या दिशेस जाण्यास सांगितलें. अशा रीतीनें सारनाथ या स्थानावरूनच बुद्धधर्माच्या प्रचाराची प्रथम सुरवात झाली. आणि या पवित्रस्थळींच प्रथम

अनावरणोत्सव मोठ्या प्रमाणांत साजरा करून बुद्धधर्माची जनतेस प्रथम ओळख करून दिली गेली.

भ. बुद्धानें धर्मप्रचारार्थ रवाना केलेल्या शिष्यांना जो उपदेश केला तो सर्वांनीं लक्षांत घेण्यासारखा आहे. ते म्हणाले, ' भिक्खू हो ! बहुजन हितासाठीं नि बहुजन सुखासाठीं हा तुमचा धर्म आहे, हें मूळ तत्व लक्षांत घेऊन तुम्हीं इतरांना पटवा. दुःखी पिडीत यावर दया करण्यासाठीं आरंभ मध्य नि शेवट या अवस्था लक्षांत घेऊन या कल्याणकारी धर्माची तुम्हीं सर्व संकट दूर करून आणि संयम पाळून उपदेश करा. हे करीत असतांना ब्रह्मचर्य व्रत कटाक्षानें पाळा नि लोकांच्या भावना लक्षांत घेऊन त्यांच्या भाषेंतच त्यांच्याशीं बोला.

यावरून हें स्पष्ट होतें कीं, सारनाथ हे देऊळ बौद्ध धर्माचें मुख्यस्थान तर आहेच. परंतु जागतिक बौद्धांचें पूज्य नि पवित्र क्षेत्र असून त्यांस विशेष प्रकारचें महत्व आहे.

ज्यावेळीं भ. बुद्ध यास्थळीं गेले त्यावेळीं या ठिकाणीं श्वापदें वास करीत असलेले दाट जंगल होतें. परंतु भ. बुद्धांनीं जेव्हांपासून यास्थळीं धर्म प्रचाराचें कार्य सुरूं केलें तेव्हांपासून थोडयाच दिवसांत त्या स्थळाचें उत्तरोत्तर महत्व वाढत गेलें. त्यानंतर अल्पावधीतच त्या ठिकाणीं अनेक विहार तयार करण्यांत आले. (हें अलीकडेच केलेल्या उत्खननावरून त्या ठिकाणच्या जमिनींत गाडलेले अनेक विहारांचें, मंदिरांचें नि चैत्यांचें सांपडलेल्या भग्नावशेषावरून सिद्ध झाले आहे. )


या ठिकाणचे गंधकुटि विहार, धर्मचक्र, जिन, विहार, धर्मराजिक आणि धर्मचक्रस्तूप इत्यादि प्रसिद्ध होती. परंतु या पवित्र स्थानांतील विहार, स्तूप, स्तंभ, मंदिरें आदि सर्व मोठ्या परिश्रमानें तयार केलेली ही प्रेक्षणीय बांधकामें इ. स. १३ व्या शतकांत मुसलमानांच्या स्वारींत त्यांनीं नष्ट करून टाकली. याचा उत्खननांत सांपडलेल्या अनेक जळक्या वस्तूंवरून स्पष्ट पुरावा सांपडतो कीं, हें विध्वंसककार्य इ. स. १३ व्या शतकांत मुसलमानांनी केलेलें असून त्यासाठीं त्यांनीं अग्नीचा नि हत्यारांचाहि उपयोग केलेला असावा.

# भ. गौतम बुद्ध



वयाच्या ३५ व्या वर्षापासून तो ८० व्या वर्षापर्यंत पूर्ण ४५ वर्षे केवळ भिक्षेवर जगून ज्यानें भारतभर पायी प्रवास केला नि आपल्या धर्माच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार नि प्रसार केला. ते बौद्ध धर्म संस्थापक 'भगवान बुद्ध.'


# सांची येथील भव्य स्तूप



हा स्तूप इ. स. च्या पांचशें वर्षांपूर्वी सम्राट अशोक याच्या कारकीर्दींत बांधला गेला आहे. हा जागतिक कीर्तीचा भव्य स्तूप अंडाकृति असून, त्याच्या चोहोंबाजूस उत्तम मेघडंबरी आहे. हा मेघडंबरी प्राचीन काळीं प्रदक्षिणापथाचे कार्य करीत असे. याच्या चारी बाजूस चार महाद्वारें आहेत. त्यावर विविध प्रकारच्या सुंदर आकृत्या कोरल्या असून, त्यावर कलाकृतिसंपन्न अशी तोरणें आहेत.

हा स्तूप भडक लाल रंगाच्या दगडांचा बांधला आहे.


# सारनाथ-मूलगंधकुटी मंदिर



बौद्धधर्मीय चार पवित्र तीर्थस्थानापैकीं सारनाथ हें एक पवित्र स्थान असून तेथील हें सुप्रसिद्ध 'मूलगंध कुटी' नांवाचे मंदिर आहे. हें मंदिर अनागारिक धम्मपाल यांच्या सत्प्रयत्नानें सन १९३१ सालीं बांधले गेले.

# अनागारिक देवमित्र धर्मपालजी यांचा पुतळा

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बुद्धगया मंदिर नि त्याच्या आसपासचा भूभाग हिन्दू महंतांनी अनेक क्लुप्त्या करून जबरदस्तीनें हस्तगत केला होता. तो त्यांच्याकडून काढून घेण्यासाठीं अनागारिक धर्मपालजी यांनीं इ.१८९१ च्या आक्टोबरमध्यें जागतिक बौद्ध सम्मेलन भरवून सदर अन्यायास वाचा फोडली. नि सुमारें ६८ वर्षें अहिंसामय सनदशीर मार्गानें लढा देऊन अखेर यश मिळविलें. या त्यांच्या कामगिरीच्या स्मरणार्थ दि. २३।१२।५६ रोजीं सारनाथ या पवित्र स्थळीं तिबेटचे दलाई लामा यांच्या शुभ हस्ते उपरोक्त पुतळयाचा अनावरण समारंभ झाला.



यावरून परकीय मुसलमानांचा भारतावर स्वाऱ्या करण्यापाठीमागचा हेतू निव्वळ संपत्ती लुटून नेण्याचाच नसून भारतांतील इतर धर्महि भ्रष्ट करून आपल्या इस्लामी धर्माचा प्रसार करण्याचा त्यांचा प्रधान हेतू होता हें सिद्ध होतें.

त्यांनी ज्याप्रमाणें बुद्धमंदिरें आदींचा विध्वंस केला, त्याचप्रमाणें वाराणसी, काशी, इत्यादि क्षेत्रांतील हिंदू देवळांचाहि विध्वंस केला होता. या सर्व विध्वंसन कार्यात त्यांनी जी संपत्ति जमा केली, ती सुमारे १४ हजार उंटावरून वहात नेल्याचा इतिहासांत उल्लेख आहे.

सारनाथ येथींल सर्व विहार–स्तूप आदींचे बांधकाम सम्राट अशोक कनिष्क, कुमारगुप्त, महिपाल, कुमारदेवी, आदि राजांच्याद्वारे झाले होतें, हें उत्खननांत सांपडलेल्या शीलालेखांतून निदर्शनास आलेले आहे. त्याचप्रमाणें फाहियान, ह्युएनत्सँग, तायीन्त्सँग, इत्यादि चिनी प्रवाशांच्या प्रवास वर्णनावरूनहि वाचण्यास मिळते.

या ठिकाणीं ज्या मूर्ति दिसतात, जें बांधकाम नि त्यावरील कोरीव नक्षीकाम दिसतें त्यावरून त्याकाळची स्थापत्य कला किती पराकोटीला गेली होती याचा अचंबा वाटल्याशिवाय रहात नाहीं. सारनाथ येथील विहार, मंदिरें, स्तूप इत्यादि उध्वस्त झाल्यानंतर पूर्ववत् त्या ठिकाणीं घनदाट झाडी वाढली. पुढें त्या स्थळांचें जंगलांत इतकें रूपांतर झालें कीं, त्या नावाचा वा स्थळांचा मागमूसहि राहिला नाहीं. त्या ठिकाणचा सारा विभाग काट्याकुट्यांनीं नि जंगलांनी इतका वेढून गेला कीं, तेथें वाघ, तरस, लांडगे इत्यादि वनचरांचें नि श्वापदांचे भरपूर वास्तव्य वाढले. पुढें कित्येक वर्षानंतर भारतीय भिक्खु निर्वाणवासीभदंत महावीर महास्थविर यांनी आणि अनागारीक धर्मपालजींच्या " सांस्कृतिक संवर्धक संस्थेच्या " मदतीनें परत त्या स्थळांचे उत्खनन करून सापडलेल्या अवशेषांचें मोठ्या आस्थेनें जतन केले गेले आहे. त्याचप्रमाणें अलिकडील भारत सरकारच्या मदतीनें तर सारनाथ हें स्थान परत सांस्कृतिक उत्कर्षाचें नि मानवी धर्माचें

..२..

पवित्र स्थान बनत चाललें आहे. यावरून उत्तरोत्तर सारनाथ हें क्षेत्र आपले पूर्वींचें वैभव लवकरच प्राप्त करील अशी आशा वाटू लागली आहे.

या जागेंतच एक भव्य म्युझियम असून, या भव्य इमारतींत उत्खननांत सांपडलेले अनेक भग्नावशेष सुव्यवस्थित ठेवत आहेत. त्यांतील एका प्रस्तर स्तंभावर चार सिंह एकमेकांकडे पाठ करून बसलेले दाखविले आहेत. त्यावरील नक्षीकाम उत्कृष्ट दर्जाचे आहे. कलेच्या दृष्टीनें या सिंहाला फार महत्व आहे. पुर्वी सिंहाच्या नेत्रांत मौल्यवान माणके बसविली असल्याची निशाणी अद्याप स्पष्ट दिसते. सिंहाच्याखाली चार चक्रे आहेत व त्या चक्रांत हत्ती, बैल, अश्व नि सिंह यांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. त्यावर वज्रलेप लावला असून अडीच हजार वर्षानंतरही आजतागायत त्या अत्यंत चमकदार दिसतात.

म्युझियममध्यें एक अखंड दगडाचे विस्तीर्ण असे रेलींग (परकोट) आहे. त्यावर "**सबहिका**" असें नांव कोरलेले आहे. चौकशीअंती समजले कीं, सबहिका नांवाच्या एका दानशूरानें स्वखर्चानें हा तयार करून घेतला. म्हणून त्याचे नांव त्यावर कोरलें गेलें आहे. या शिवाय पक्या विटांचा एक भव्य असा स्तुप मुख्य मंदिराच्या (मूलगंधकुटीच्या) पश्चिमेस असून तो अद्याप बऱ्या स्थितींत अस्तित्वांत आहे. मंदिराच्या समोर एक पाठशाळा व अतिथीगृह असून त्याचा सर्व बांधकामाचा खर्च श्री. **बिर्ला शेठजी यांनीं** केला आहे. सदर अतिथीगृहांत कोणाहि यात्रेकरूस अगदीं अल्प भाड्यांत राहण्याची व्यवस्था केली असून, सर्व प्रकारच्या सुखसोयींनी युक्त असें तें आहे.

## मूलगंधकुटी

मंदीराच्या आसपासच्या सर्व भूभागाचें धांवतें निरीक्षण करून आम्हीं परत मंदिरांत आलों. या मंदिराचें नांव "मूलगंधकुटि" असें असून त्याचा भव्यपणा बाह्य आकारावरून चटकन् डोळ्यांत भरतो. शिवाय बांधकामातील कलाकौशल्य, आकार व नक्षीदारपणा इतका आकर्षक आहे कीं,

कोणत्याहि यात्रेकरूचे तिकडे सहजगत्या पाय ओढल्याशिवाय रहात नाहींत. आंत प्रवेश करतांच मन पावित्र्यानें नि शांत वातावरणानें भारून जातें. हें मंदिर सुप्रसिद्ध अनागारिक धम्मपाल यांच्या सत्प्रयत्नानें सन १९३१ सालीं बांधले गेले व त्यांस मूलबंधकुटि हें नांव ठेवण्यांत आलें.

आंत प्रवेश करतांच अगदीं समोरच एक भव्य धर्मचक्र मुद्रामध्यें भ. बुद्धाची दगडाची मूर्ति दृष्टोत्पत्तीस पडते. ही मूर्ति जयपूरच्या एका सुप्रसिद्ध शिल्पकारानें तयार केली आहे. या मूर्तिच्या आसपास अनेक लहानमोठ्या मूर्ति असून बाजूलाच एक भला मोठा जपानी नगारा आहे.

भव्य मूर्ति ज्या ओट्यावर बसविलेली आहे. त्या ओट्याखालीं पोकळ भाग असून भ. बुद्धाची रक्षा एका रुपेरी पात्रांत सुरक्षित ठेवली आहे. ती रक्षा प्रतिवर्षी कार्तिक मासांतील पौर्णिमेस बाहेर काढतात व तिची सवाद्य मिरवणूक काढतात. त्यावेळीं येथें यात्रेचें स्वरूप प्राप्त होत असते.

## भितीवरील तैलचित्रें

मंदिराच्या चारी भिंतीवर तळापासून तक्तपोशीपर्यंत भ. बुद्धाच्या चरित्रावर आधारलेली तैलचित्रें काढली आहेत. ही चित्रें सुप्रसिद्ध जपानी चित्रकार श्री. कोसेत्सुनोसु यांनीं काढली असून त्यांनीं आपल्या कलेचे कौशल्य दाखवून दिलें आहे. त्यांनीं ही चित्रें काढण्यास सन १९३२ पासून सुरवात करून १९३६ सालीं तें कार्य पूर्ण केलें.

या कार्याच्या खर्चासाठीं इंग्लंडचे प्रसिद्ध उपासक श्री. बी. एल. ब्राऊंटन एम्. ए. यांनीं सुमारें १०,००० रु. देणगी देऊन आपलें औदार्य नि बौद्ध धर्मावरील श्रद्धा व्यक्त केली आहे.

## चित्रांचा परिचय

मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीवरील चित्रें :—

१) इंद्रसभेंत सर्व देव जमले असून, बोधिसत्त्वाला ते प्रार्थना

करतात कीं, मृत्यु लोकांत फार हिंसा व पाप वाढलें आहे. म्हणून आपण तेथ जन्म घ्या अशा आशयाची ते सर्वजण प्रार्थना करीत असलेले दर्शविले आहे.

२) राणी महामायेला पडलेले स्वप्न.

३) लुम्बिनी बागेंतील सिद्धार्थाचा जन्म.

४) सिद्धार्थाच्या जन्माच्या आनंदाप्रीत्यर्थ दानवांटप.

५) अशीतऋषी सिद्धार्थाला मांडीवर घेऊन त्याचे सूक्ष्म निरीक्षण करीत आहेत.

६) बाल सिद्धार्थ जंबुवृक्षाखालीं ध्यानस्थ बसलेला असून त्यांचा पिता शुद्धोधन यांच्या मनांत त्यामुळें चलबिचल होत असलेली दर्शविली आहे.

(७) सिद्धार्थाचा गृहत्याग व जातेसमयीं पत्नी यशोधरा व पुत्र राहूल यांचे दर्शन घेत असलेलें दिसत आहे.

## पश्चिम बाजूच्या भिंतीवरील चित्रपरिचयः—

(१) सिद्धार्थ सत्याच्या शोधार्थ ध्यानमग्न असून तो आडारकालाम सह चर्चा करीत असलेला दिसत आहे.

(२) सिद्धार्थाबरोबर तपश्चर्या करीत असलेले पांच ऋषि बसलेले दिसतात.

(३) सुजाता ही सिद्धार्थाला खीर अर्पण करीत आहे.

(४) मारांचा ( शत्रूंचा ) पराजय करून सिद्धार्थाला यथार्थ ज्ञान झालेलें दर्शविले आहे.

(५) वरच्या भागांत धर्मचक्रपरिवर्तनाचा भाग असून खालच्या भागांत राजा बिंबीसार याला सिद्धार्थ उपदेश करीत असलेला दिसत आहे..

(६) जेतवन विहाराचें दृश्य दिसत आहे.

## पूर्व दिशेकडील भिंतीवरील चित्रपरिचयः–

(१) भगवान बुद्ध एका रोगी भिक्खूची सेवा करीत असलेले दिसत आहेत.

(२) नदीच्या पाण्यावरून शाक्य व कोलिओ या दोन वंशांच्या जमाती युद्धास प्रवृत्त झालेल्या दिसत असून, भगवान बुद्ध त्यांना युद्ध न करण्याचा उपदेश करीत आहेत.

(३) भिक्षुसंघासमवेत भगवान बुद्ध कपिलवस्तु नगरांत दिसत आहेत. त्याचबरोबर शुद्धोधन आणि कु. राहूलहि दिसत आहेत.

(४) देवदत्ताबरोबर बिंबीसारचा पुत्र अजातशत्रू हा तथागत भगवान बुद्धाविरुद्ध कानगोष्टी करीत आहे.

(५) अस्पृश्यांची मुलगी अयुष्यमान ही भगवंताचा पट्टशिष्य आनंद यांस पाणी देत आहे.

(६) भगवान बुद्ध तावतीस भवनमधून उतरतांना दिसतात.

(७) अंगुलीमाल या दरोडेखोरास भगवंत उपदेश करीत असून, अंगुलीमालाची आईहि चित्रांत दिसते.

(८) कुशीनगरांत भ. बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचे दृष्य उपरोक्त चित्रांचें निरीक्षण करताना भ. बुद्धाच्या जन्मापासून तो आतापर्यंतचा संपूर्ण जीवनपट आमचे मनःचक्षूसमोर उभा राहिला. चित्रांचे निरीक्षण संपल्यावर आम्हीं मंदिराचे बाहेर आलों. समोरच आम्हांस एक भव्य स्तूप दृष्टीस पडला म्हणून तिकडे वळलो सदर स्तुपाचे नांव चौखंडी स्तूप असून सारनाथाच्या दींडीदरवाज्यांतून आंत प्रवेश करतांच डाव्या हातास तो लागतो. या स्तुपाचा खालचा भाग प्राचीन स्तुपाचा भग्नावशेष आहे. याची आरंभीची उंची २०० फूट होती. परंतु हल्ली उंची ९४ फूट आहे.

हा स्तूप सन १९३५ मध्यें ( जनरल कॅनिंगच्या ) वेळीं त्या स्थळीं असलेल्या अष्टकोनी घराचें खोदकाम करून त्यांतून हा उपलब्ध झाला

आहे. या अष्टकोनी घरांतून आणखी कांहीं वस्तू निघतील असा तर्क होता. परंतु ती आशा फोल ठरली.

या स्तूपाच्या जागींच भगवान बुद्धाला पांच भिक्षू पहिल्या प्रथम भेटले व त्यांच जागीं त्यांना नवीन धर्माचा उपदेश केला. या स्तूपाच्या जागीं असलेले अष्टकोनी घर सन १५८८ सालीं अकबर बादशहानें आपला पिता हुमायून याचे सारनाथला आगमन झालें होतें त्याप्रीत्यर्थ बांधलें गेलें होतें. याबाबतचा एक लेखहि फारशी भाषेंत कोरलेला त्या स्थळीं अद्याप उपलब्ध आहे तो असा :—

" सात देशाचा भूपाल स्वर्गवासी हुमायून हे एक दिवस या पवित्र भूमींत येऊन बसले होते. नि त्यांनीं एक दिवस सूर्य प्रकाशाची वृद्धी केली होती. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचा आज्ञाधारक पितृभक्त पुत्र अकबर यानें आकाशाला गवसणी घालणारें उंच स्थान बनविलें आहे. हिजरी ९९६ "

या चौखंड स्तूपावर जाण्यासाठीं एक जिना असून त्यायोगें या अष्टकोनी घरांवर जातां येते. या घरावरून वाराणसीच्या आसपासच्या भूभागाचें सिंहावलोकन करतां येतें. त्यानंतर आम्हीं तेथून जवळच असलेल्या धर्मराजिक स्तूपाकडे वळलों. हा स्तूप सम्राट अशोकानें बांधला आहे. या स्तूपाचा एकूण सात वेळां जीर्णोध्दार झाला शेवटचा जीर्णोध्दार अकराव्या शतकांत झाला.

हा स्तूप आरंभी फारच भव्य होता. परंतु सन १७५१ मध्यें महाराज चेतसिंहाचें दिवाण बाबू जगतसिंह यांनीं तेथील विटा नेऊन वाराणशीला **जगतगंजचें** बांधकाम केलें. या स्तूपांत हिरव्या रंगाच्या दगडाची छोटी मंजूषा मिळाली होती. तिच्यांत थोड्या अस्थि, मोतीं, सुवर्णपात्र इत्यादि वस्तू सांपडल्या होत्या. त्या वस्तू जगतसिंहानें धार्मिक भावना दुखावल्यानें येणारे संकट टाळण्यासाठीं म्हणून त्या गंगेच्या प्रवाहांत विधिपूर्वक सोडून दिल्या. त्या अस्थि भगवान बुद्धाच्याच असाव्यात असा दाट संशय व्यक्त केला जातो.

सन १९०८ सालीं श्री. मार्शल यांनीं या स्तूपाची पूर्ण खोदाई करून हें सिध्द केलें कीं, सारनाथ येथील सर्वात मोठा नि पवित्र स्तूप हाच असला पाहिजे या स्तूपाच्या आसपास चोहोंबाजूस लहान मोठे परंतु भग्नावस्थेंत असलेले अनेक स्तूप आम्हांस आढळले.

## प्रधानमंदीर

धर्मराजिक स्तूपाच्या उत्तरेस प्रधान मंदिर नांवाचे एक मंदिर आहे. हे मंदिर चौसष्ट चौरस फूट असून हल्लीं तें भगनावस्थेंत आहे. याच्या चारी बाजूस दरवाजे असून आंत लहान लहान खोल्या आहेत. याचा मुख्य दरवाजा पूर्वेस आहे. याच्या भिंतीच्या जाडीवरून उंचीची कल्पना सहज करतां येते. याच मंदिरांत बसून तथागतानें जो धर्माचा उपदेश दिला तो प्रथम येथेंच असें सांगण्यांत येते. शिवाय भगवान बुद्ध या स्थळीं एक वर्ष वास्तव्य करून गेल्यानें या स्थळाला वेगळेच महत्व प्राप्त झालें आहे. म्हणून सम्राट अशोकादि राजा महाराजांनीं या पवित्र स्थळाची काळजीपूर्वक सुरक्षितता ठेवण्याची दक्षता घेतली होती.

या मंदिरांतील दक्षिणेकडील कोठडींत एक खंडीत अवस्थेत वेस्टनी ( रेलींग ) आहे. ती पाहिल्यानंतर असा भास होतो कीं, ती एकच दगड कापून व कोरून तयार केली आहे. कांहीं लोकांचा असा तर्क आहे कीं, ही वेस्टनी पूर्वीं अशोक स्तंभाच्या संरक्षणासाठीं व शोभेसाठी खास तयार करण्यांत आली असावी. हिच्या कलाकृतीचे सांची येथील कलाकृतीशीं साम्य जुळतें, या वेस्टनीवर ' सवाहिका ' अशी अक्षरे आहेत. या नांवावरून ही वेस्टनी कोणीतरी त्या नांवाच्या उपासिकेनें ही तयार करवून घेतली असावी, असा तर्क बळावतो.

## अशोकस्तंभ

प्रथम मंदिराच्या पश्चिमेस एका दगडी छताखालीं लोखंडी कंपाउडनें वेष्टिलेल्या जागेंत अशोक स्तंभाच्या वरच्या भागांतील फक्त तीन तुकडे तेथें ठेवलेलें आहेत. त्याच्या अगदीं वरचा चार सिंह असलेला भाग तेथील

वस्तुसंग्रहालयांत सुरक्षित ठेवलेला आहे. भारतांतील उत्कृष्ट स्थापत्य कलेची साक्ष पटविणाऱ्या कलाकृतियुक्त अशा या अशोक स्तंभाची जी खंडित अवस्था दिसते ती मुसलमानी आक्रमण प्रसंगींच झाली असावी, यांत मुळींच संशय नाही. या तीन खंडित तुकड्यांवर ब्रह्मी भाषेंत सम्राट अशोकाचा संदेश कोरलेला आहे. त्याचा भावार्थ पुढीलप्रमाणें आहे.

"देवतांचा प्रियदर्शी सम्राट अशोक असा संदेश देत आहे कीं, पाटलीपुत्र शहरांत वा प्रांतांत कोणीहि संघांत फूट पाडण्याचा प्रयत्न करूं नये. जो कोणी भिक्षू किंवा भिक्षुणी संघांत फूट पाडील त्याला किंवा तिला पांढरे कपडे परिधान करून भिक्षु संघांतून बहिष्कृत करण्यांत यावें. अशा प्रकारची ही माझी आज्ञा सर्व भिक्षु गणांना सांगावी अशा प्रकारचा लेख ज्यांना मिळेल त्यांनी जवळपासच्या उपासकांना व प्रत्येक महात्म्यांना देऊन सर्वत्र प्रचार करावा."

या लेखावरून सम्राट अशोकाची बौद्ध धर्माबद्दल नि बौद्ध संघटनेबद्दल किती तळमळ नि आस्था होती हें दिसून येतें.

## आर्य संघराम विहार

अशोक स्तंभाच्या पश्चिमेस एक ब्रह्मी बौद्धविहार आहे. त्याला आर्य संघराम विहार असें नांव आहे. याची स्थापना भदन्त महावीरानें केली होती. त्यानंतर ते चालविण्याचें कार्य महास्थविर चंद्रमणी यांनीं केलें. हल्ली सर्व प्रकारची व्यवस्था पाहण्याचें कार्य भदन्त **उ कित्तिमाजी** करीत आहेत. त्यांच्या बौद्धधर्माच्या गाढ व्यासंगामुळे नि चिकाटीच्या प्रयत्नामुळें तेथील आकर्षण अधिकच वाढलें आहे. सदर विहारांत एक ग्रंथालय, एक सुदर नि टुमदार मंदिर आणि यात्रेकरूंना रहाण्यासाठीं सुव्यवस्थित धर्मशाळा ही तेथील विशेष आकर्षणें होत.

## धर्मचक्र जिन

त्यानंतर आम्ही उत्तरेकडे वळालो. जातांना वाटेंत अनेक स्तूपांचें नि विहारांचें भग्नावशेष जागोजागीं पडलेलें आढळलें. थोडें पुढें गेल्यावर

"धर्मचक्र जिन" नांवाचा विहार लागला. तो वाराणसीची बौद्ध महाराणी कुमार देवीने अकराव्या शतकांत बांधून घेतला, या विहाराचे अंगण फारच विस्तृत आहे. त्या अंगणाच्या एका कोपऱ्यांत एक विहीर असून तींत स्नान केल्यानंतर चीजवस्तु ठेवण्यासाठीं दोन्हीं बाजूला दगडी खांब आहेत. विहाराच्या भिंतींचें बांधकाम त्यांतील स्थापत्यकला नि विटांच्या बांधकामांत वेलबुट्टीच्या कौशल्यपूर्ण रचना फारच मनोवेधक वाटतात.

हा विहार पाहून थोडें पुढें गेल्यानंतर आम्हांस एक दगडी जिना लागला. जिना उतरून खाली गेलों. तो आंत विहार नं ३ लागला. या विहाराचे उत्खनन १९०८ सालीं झालें. या विहाराच्या दरवाजावरील दोन खांबावर पूर्वीच्या सडलेल्या लांकडाखालीं नवीन लांकडी खांब आडवा टाकला आहे. व त्यावर लिहिलेले आहे कीं, या विहाराची निर्मिती कुशान कालांत झाली आहे.

## धम्मेक स्तूप

त्यानंतर पूर्वेकडील बाजूला एक विशाल नि भव्य स्तूप आमच्या दृष्टीपथांत आला, त्याकडे आम्हीं वळलों. या स्तूपाची उंची १०४ फूट असून खालीं दगडांचें नि वरच्या भागांत विटाचें बांधकाम केलेलें आहें.

या स्तूपाची निर्मिती सातव्या शतकांत झाली. बांधकामाच्या दगडावर कोरलेली चित्रें, नक्षीकाम पाहून प्राचीन भारतीयांची शिल्पकला किती उत्कृष्ट दर्जाची होती याचा अंदाज मनाला सहज पटतो.

सन १८३५ सालीं ज. कॅनिंगनें या स्तूपाच्या अगदीं मध्यभागीं स्तूपाचें आंतील भागाचे निरीक्षण करण्याच्या उद्देशानें एक आरपार छेद पाडला. परंतु त्यांत एका कोरलेल्या लेखाशिवाय दुसरें कांहींच सांपडले नाहीं त्यालेखांत पाली भाषेंतील पुढील मजकूर आहे.

ये धम्मा हेतू प्रभवा हेतु तेब्यान् तथागताहृच।
वदत वंचञ्चयो निरोधः एवं वादी महाश्रणा ॥

हा स्तूप प्राचीनकाळीं ज्या तऱ्हेनें सारनाथ या स्थळाची शोभा

वृद्धिंगत करीत असेल, तद्वतच आतांही तेथें जाणाऱ्या सर्व प्रवाशांचें मन आकर्षित करून घेतल्याशिवाय राहत नाहीं, याचा अनुभव आम्हांस लाभला

## सारनाथ–पूर्व वैभवाच्या वाटेवर

भगवान बुद्धाचा धर्म या देशांतून ज्यावेळीं बहुतांशी लुप्त झाला, स्वाभाविकच तेव्हांपासून इतर बौद्धतीर्थस्थानांबरोबरच सारनाथ या स्थळाचेही महत्त्व आपोआप कमी झालें. इतकें कीं, अगदीं अल्पावधीतच तो भाग दाट जगलांनी व श्वापदांनीं इतका व्यापला कीं, त्या स्थळाचें अस्तित्वच एकदम नष्ट होऊन गेलें.

परंतु सत्य हें जसें कायमचे नष्ट होऊं शकत नाहीं, तद्वतच उज्वल तत्त्वज्ञान हें फार काल अज्ञानांत राहूं शकत नाहीं. हेतुपुरस्सर आघाताने दडपलेल्या सत्य–तत्त्वज्ञानाचा उशीरां कां होईना भ्रमनिरस हा होतोच. तद्वत् भ. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा भ्रमनिरस जगाबरोबरच आपल्यालाहि भारत सरकारचा नि भारतीय जनतेचा होत आहे ही त्यांतले त्यांत आनंदाची नि आशेची बाब आहे. म्हणूनच भारत सरकारनें स्वत: पुढाकार घेऊन अलिकडेच म्हणजे २४ मे सन १९५६ रोजीं भ. बुद्धांची २५०० वी जयंती मोठ्या प्रमाणांत साजरी केली त्या प्रसंगीं व्यासपीठावरून आपले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले कीं, "**भ. बुद्ध नि त्यांचें उज्वल तत्त्वज्ञान यांना कांहीं हितसंबंधियांनीं हेतुपूर्वक या देशांतून कांहीं काळ हद्दपार केलें होतें. परंतु ती परिस्थिति आज पालटलेली आहे. तो दोष आमच्या लक्षांत येण्यास फार काळ लागला हें आमचें दुर्दैव म्हणूनच आतां भ. बुद्धाला नि त्याच्या तत्त्वज्ञानाला सन्मानपूर्वक येथें मूळ ठिकाणीं आपण आणीत आहोत. ही घटना आपल्या भारतवासीयांच्या दृष्टीनें भाग्याची समजली पाहिजे.**"

या जयतीच्या शुभ प्रसंगीं भारत सरकारनें नि प्रांतिक सरकारनें मिळून सारनाथ या स्थळाची सुधारणा करण्यासाठीं एकूण ३४ लक्ष २०

हजार रुपयांची उदार देणगी देऊन, बुद्ध धर्मावरील आपली निष्ठा व्यक्त केली आहे शिवाय त्या जयंतीच्या निमित्तानें तीन लक्ष रुपये खर्च करून 'सारनाथ' हें नवीन रेल्वेस्टेशन बांधलें आहे. या स्टेशनच्या बांधकामाची ठेवण, आकार नि कलाकृति ही सांची येथील कलाकृतिबरहुकूम केली आहे.

तसेंच उपरोक्त सरकारी देणगींतून सारनाथ येथील रस्ते, विजेची व्यवस्था, मंदिराचा जीर्णोद्धार, पुस्तकालय, धर्मशाळांची व्यवस्था इत्यादिसाठीं सदर रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. आणि त्याप्रमाणें आजपर्यंत तसा विनियोग होत असल्याचें प्रत्ययास आलें आहे.

शिवाय हल्ली तेथें नुकतीच एक सुंदर बाग तयार करण्यांत आली आहे तिच्या एका बाजूस लोखंडी जाळीच्या आंत १०० हरणें ठेवलीं असून त्यांची जोपासना यांच खर्चांतून केली जाते. त्यामुळें या भागाच्या सौंदर्यांत अधिकच भर पडण्यास मदत झाली आहे.

ह्या उपक्रमावरून आणि या चार वर्षांतील उत्तरोत्तर सुधारणेच्या टप्प्यावरून सारनाथ हें स्थळ पूर्व वैभवाची वाटचाल करूं लागलें आहे यांत बिलकूल संदेह नाहीं. म्हणून प्रत्येक बौद्ध धर्मीयानें या स्थळाला एकदां तरी भेट देऊन कृतार्थ होण्याची संधी दवडू नये अशी इच्छा व्यक्त करतो.

## इतर प्रेक्षणीय स्थळे

यानंतर आम्हीं परत फिरण्याचे उद्देशानें निघालों. वाटेत मूलगंध कुटी जवळ सुप्रसिद्ध भदन्त अनागारिक धर्मपालजींचा एक भव्य नि शुद्ध मार्बल दगडाचा पुतळा दिसला. या पुतळ्याची स्थापना दि. २३ डिसेंबर १९५६ सालीं तिबेटचे दलाईलामा यांचें हस्ते झाली. सदर भदन्त आनागारिक धर्मपालजींनी बौद्ध गया मंदिर हिंदु महंतांनीं जबरीनें बळकाविलें होते. ते त्यांच्यापासून परत बौद्धांच्या ताब्यांत मिळविण्यासाठं दीर्घ काळ म्हणजे ६८ वर्षे आंदोलन करून यश मिळविले ही त्यांची ऐतिहासिक

कामगिरी चिरस्मरणीय झाली आहे. सदर त्यांच्या कार्याची माहिती ओघानें पुढें " बौद्धगया " या प्रकरणांत वाचावयास मिळेलच.

थोडे पुढें आल्यावर बिर्ला धर्मशाळा लागली. ही धर्मशाळा सन १९३६ सालीं बांधली असून ती दोन मजली आहे. यांत प्रवाशांची सर्व प्रकारची सोय केली जाते. त्यानंतर वाटेंत चिनी मंदिर, बोधीसत्व मंदिर, महाबोधी कॉलेज, अतिथीनिवास, महाबोधी दातव्य औषधालय, शिव-मंदिर, महासभेचें कार्यालय धर्मदूत मासिकाचें कार्यालय, जैन धर्मशाळा सारनाथ पोस्ट ऑफिस इत्यादि स्थळांवर फक्त दृष्टिक्षेप टाकून आम्हांस परतावें लागलें. इच्छा असूनहि वेळेच्या अभावी सदर स्थळें जवळून निरीक्षण करतां आली नाहींत याबद्दल खेद वाटतो. परंतु जें पाहिलें त्यांत अल्प संतुष्ट वृत्तीनें कां होईना, परंतु बरीचशी माहिती मिळाल्याचें समाधान झालें, आणि प्रसन्न चित्तानें फाटकापाशीं आलों, तेव्हां मागें वळून पहातांच न कळत तोंडून उद्‌गार बाहेर पडले. बुद्धं सरणं गच्छामि धम्मं सरणं गच्छामि । संघं सरणं गच्छामि। हे गुणगुणतच आम्ही मोटारींत बसलों. त्यावेळीं आमच्या मोटारींतील सर्वांनीं आम्हांस सदर त्रिचरण म्हणण्यांत साथ दिली.

अशा प्रकारें सारनाथ या बौद्धतीर्थाचें धांवतें निरीक्षण करून आम्हीं वाराणसी स्टेशन, काशी शहर, काशी विश्वनाथ मंदिर, काशी विश्वविद्यालय इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहून सुप्रसिद्ध गंगा घाटावर गेलों.

तेथें स्नान करून स्टेशनवर आलों. भोजनाचा कार्यक्रम करून, प्रत्येकजण वैयक्तिकरित्या काशी शहरांत फिरण्यास गेले. संध्याकाळीं ठीक ७-५० वाजतां आमची बोगी उत्तर रेल्वेच्या 'वाराणसी हावरा एक्सप्रेसला' जोडली गेलीं. चालत्या गाडींतच आमचें करमणुकीचे कार्यक्रम सुरू झाले रात्रीं ८-३० वा. आमची गाडी मोंगलसराई स्टेशनवर आली. तिनें आमच्या बोगीचा तेथच त्याग करून ती पुढें गेली. तिला घेऊन जाणारी दुसरी गाडी येईपर्यंत आमची चिरसहयोगिनी (बोगी) आमचाच सांभाळ

करीत तेथेंच स्टेशनमध्यें उभी राहिली. आम्हीहि निर्धास्तपणें झोपेच्या अधीन झालो होतो. पहाटें ३ वाजतां पूर्व रेल्वेची तुफान एक्सप्रेस आली व तिनें आमच्यासह बोगीला घेऊन निर्वेधपणें पुढील प्रवासाच्या मार्गास लागली.

**पाटणा :** **: बुधवार दि. २६**

सकाळीं ठीक ७ वा. पाटणा स्टेशनवर उतरून स्नानादि प्रातर्विधि तेथें उरकून घेतला. आगाऊ रिझर्व्ह केलेल्या बसेस बाहेर आमची वाटच पहात उभ्या होत्या. ठरल्याप्रमाणें मोटारीनें-राजभवन, सचिवालय, म्युझियम गंगा-घोगरा-शोण या नद्यांचा संगम, हारमंदिर आणि रेडिओ केंद्र इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहून सकाळीं ११ वा. च्या पूर्व रेल्वेच्या "पाटणा-गया" पॅसेंजरनें पुढील प्रवासास निघालो. दुपारीं ठीक १-४० वा. गया स्टेशनवर उतरलों आणि लगेच अगाऊ रिझर्व्ह केलेल्या बसनें बौद्धधर्माचे सुप्रसिद्ध तीर्थ बुध्दगया पाहण्यास निघालों.

---

# बुद्धगया ( बौद्ध तीर्थ क्र. ३ )

**स्थानमहात्म्य**

बौद्धधर्मीयांची जी चार पवित्र तीर्थस्थानें आहेत, त्यापैकीं बुध्दगया हें त्यांतील महातीर्थ समजलें जातें. ज्याप्रमाणें ख्रिश्चन धर्माचें जेरुसलेम, मुसलमानांचे मक्का-मदिना आणि हिंदूंचे काशी-वृंदावन त्याप्रमाणें बौध्दांचें हें पवित्र स्थान आहे. एवढेंच नव्हें तर बुध्दगया हें जगांतील अखिल पद-दलित मानवांचें स्फूर्तिस्थान आहे.

भगवान वुध्दानें, मानवाला सुखी नि सुसंस्कृत वनविण्याचें ज्ञान, याच स्थळांतील बोधिवृक्षाखालीं झालें होतें. जगाला शांति, मैत्री नि अहिंसा या

त्रयींचा महामंत्र त्यांनीं याच स्थळावरून उद्घोषित केला होता. त्याचप्रमाणें विश्वबंधुत्व, एकता नि समानता यांचा दिव्यसंदेश जगाला याच स्थानावरून दिला होता आणि तो संदेश अद्याप जगाच्या दाहीं दिशास दुमदुमतो आहे.

अशा रीतीनें शाक्यमुनि गौतमाच्या ज्ञानप्राप्तीच्या या तपोभूमीनें भारताच्याच नव्हें तर जगाच्या संस्कृतीचा एक नवा अध्याय निर्माण करून अज्ञानअंधःकारांत पिचत पडलेल्या पिडीतांवर नवप्रकाश टाकण्याचें महत् कार्य साधलें आहे, यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. म्हणूनच बुद्धगया, हें विश्वसंस्कृतीचें हृदयकेंद्र बनलें आहे.

अर्ध्या अधिक जगांतील लोक भारतभूमीला पुण्यतीर्थ मानतात, त्याचें कारण भ. बुद्धाचा या स्थळीं पद-स्पर्श झाला म्हणून तर आहेच, परंतु ज्या स्थळाच्या दर्शनानें चीन, जपान, तिबेट, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, लंका, नेपाळ, सिक्कीम, भूतान आदि किंवा भारतांतील बौद्ध जनता आपणांस विनम्रभावे कृतार्थ मानीत असते, त्याचें प्रमुख कारण म्हणजे बुद्धगया हें स्थळ भ. बुद्धाचीं तपोभूमि होती म्हणूनच.

## स्थळभेटीची उत्सुकता

अशा या जगविख्यात तीर्थस्थानाला भेटण्यासाठीं आमची उत्सुकता पराकोटीला पोहोंचली असल्यास नवल तें काय? सांची आणि सारनाथ या स्थळास भेटी देतांना जो आनंद नि जी उत्सुकता वाटत होती त्यापेक्षां अनंतपटीनें यावेळीं बुद्धगया पाहण्यास उत्सुकता निर्माण झाली होती. कारण बुद्धगया हें प्रत्येक बौद्धधर्मीयाचे पूज्य नि पवित्र स्थान आहे. कारण ज्या स्थळीं भ. गौतमबुद्धाला खऱ्याखुऱ्या मानवी धर्माचें ज्ञान प्राप्त झालें; तें स्थळ पाहण्यासाठीं मनाची चंचलता वाढल्याशिवाय कशी राहील? ज्या स्थळाला जगांतील कानाकोपऱ्यांतून लोक येऊन, या पुण्यभूला भेट देतात, त्या स्थळाचें महत्त्व कमी आहे असे म्हणण्याचें धाष्टर्य कोण करील? अशा तऱ्हेनें ज्या स्थळामुळें आशिया खंडांतील लाखो बौद्धधर्मीय भारत-भूमीला पुण्यभूमी मानतात—त्या पवित्र स्थळाला भेट देण्याची सुवर्णसंधि

आम्हांस लाभल्यामुळें आम्हीं स्वत:ला धन्य समजत असल्यास त्यांत नवल तें काय ?

## उत्सुकता कोणाला ?

परंतु आमची ही धन्यता नि अत्यानंद आमचे सहप्रवासी ८०–९० जणांपैकीं फक्त माझ्यासारख्या नूतनबौद्धधर्मीय १५–२० जणांना वाटत होती. इतरांचा या स्थळाला भेट देण्याचा नि पाहण्याचा चष्मा वेगळा होता नि आमचा वेगळा होता. परंतु त्या इतरांचा तरी त्यांत काय दोप ?

कारण भारतीय जनतेला या मानवी धर्मापासून आणि त्या धर्माचा संस्थापक भ. गौतमबुद्ध यांच्या चरित्रापासून बुद्धिपुरस्सर वंचित ठेवले गेले आहे. आश्चर्य हें कीं, या देशांतील साधुसंतांचीं चरित्रें, त्यांचे अभंग साक्या, ओंव्या यांचा सर्रास प्रचार करण्यांत आणि त्यांचे ठायीं अतिशयोक्तिपूर्ण चमत्कार चिकटवून ते ईश्वरी अंश असल्याचे सामान्य जनतेच्या मनीं बिंबविण्यात सर्व लेखक कवींनीं आपली शक्ति वेंचली. परंतु एवढे उपद्व्याप करूनहि त्यांचीं नांवें या देशाच्या सीमेपलिकडे कोणालाच परिचयाची होऊं शकली नाहीत, हें सत्य कोणालाच नाकबूल करतां येणार नाहीं.

परंतु ज्यांची वाणी नि उपदेश जगांतील कानाकोपऱ्यांत दुमदुमून राहिली आहे. आणि जवळजवळ साऱ्या जगानें ज्यांचें तत्त्वज्ञान शिरोधार्य मानले आहे, त्या भ. गौतमबुद्धाचें नांव या देशांतील बहुसंख्य लोकांस " एक धर्म संस्थापक " या सर्वसामान्य अर्थानेंच माहीत असावें, याचा अचंबा वाटल्याशिवाय रहात नाहीं.

## हा सत्यधर्म उखडल्याचा कट

बौद्धधर्म नि त्याची तत्त्वे ही ' बहुजन हिताय, बहुजन सुखाय ' यावरच आधारलेली असल्यानें कांहीं मूठभर हितसंबंधियांना या धर्माचें वैषम्य वाटणें साहजिकच आहे. अशोकानंतरच्या सनातनी हिंदु राजांनीं या धर्माचें उच्चाटन करण्याचा पद्धतशीर कट करून ह्या धर्माचे वाङ्मय,

मंदिरें, विहारे आदि विध्वंस केली आणि भ. गौतमबुद्ध हा निरीश्वरवादी म्हणून त्याचा जेवढा अपप्रचार करतां येईल तेवढा केला.

त्याचप्रमाणें इ. स. ६ व्या शतकापासून तो १५ व्या शतकापर्यंत ज्या परकीय मुसलमानांनीं भारतावर स्वाऱ्या केल्या, त्यांत हिंदू मंदिरांबरोबरच बौद्ध मंदिरें लुटून विध्वंस केली. एवढेंच नव्हें तर लक्षावधि भिक्खूना ठार मारून त्यांची सर्रास कत्तल केली गेली. अशा तऱ्हेनें हिंदु आणि मुसलमान या दोन्हीं धर्मांकडून मोठ्या प्रमाणांत आघात झाल्यानें या धर्माचें उच्चाटन या देशांतून झालें असल्यास त्यांत नवल तें काय ?

## सत्य तत्त्वज्ञानाचा उषःकाल

उपरोक्त विवेचनावरून हें सिद्ध होतें कीं, या देशांतील कांहीं हितसंबंधियांनीं बुद्धिपुरस्सर या धर्माला नि त्याच्या तत्त्वज्ञानाला अंधारांत नेऊन लुप्त करण्याचा पद्धतशीर जरी कट केला होता आणि त्यांत त्यांना कांही काळ यश जरी आले असलें, तरी सत्य हें किती काळ लपून राहणार ?

त्या सत्यधर्माचा उषःकाल भारतांत अलीकडेच भासमान होऊं लागला आहे. त्याच्या तत्त्वज्ञानाची उमग हळू हळू अनुभवाने बहुजन समाजाला होऊं लागली आहे. आणि त्याचें श्रेय पाश्चात्य साहित्यिकांना देणें क्रमप्राप्त आहे. कारण त्यांनीच मोठ्या परिश्रमानें पाली नि संस्कृत भाषेतून या धर्माच्या तत्त्वज्ञानाची भाषांतरें करून ग्रंथ तयार केलें. त्यामुळें या देशांतून जरी बौद्ध वाङमय नष्ट झालेलें होतें तरी पाश्चात्य देशांत तें तग धरून अस्तित्वांत होते. तें वाङमय हुडकून काढणें, त्याचें वाचन नि मनन करण्याचें महत्प्रयासी कार्य जर कोणी केलें असेल तर ते म्हणजे याच देशाचे सुपुत्र नि महान् विद्वान् डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. म्हणून या देशांत या सत्यधर्माचे पुनर्जीवन करण्याचे श्रेय प्रथम त्यानाच देणें क्रमप्राप्त आहे, यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनावर या बौद्धतत्वज्ञानाचा सखोल अभ्यासामुळें इतका पगडा बसला कीं, त्यांच्या त्या तात्त्विक चिकित्सक


## बुद्धगया मंदिरांतील भव्य मूर्ति

मराठा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नों दि: ........




ही पीतवस्त्रधारी भव्य मूर्ति ५ फूट ३ इंच उंच, ६ फूट ६ इंच रुंद नि २ फूट ४ इंच जाडीची असून तो कमलासनावर आहे. तिच्या चोहों बाजूस बौद्ध तत्वज्ञानावर आधारलेलीं निरनिराळीं चित्रें कोरलेलीं आहेत. शिवाय मूळ मूर्तीचा आकार नि ठेवण ही सुद्धां सौंदर्यासाठीं वा शोभेखातर नसून तींत बौद्ध धर्माचें तत्वज्ञान रेखाटलेलें आहे, हें सूक्ष्म निरीक्षणानेंच उमगूं शकेल.

# महाबोधि मंदिर



भारतावर मुसलमानांचें आक्रमण झालें तेव्हां जी अनेक हिंदू बौद्धांची मंदिरें नष्ट झालीं. त्यांतून गया येथील हें महाबोधि मंदिर मातीच्या ढिगाऱ्यांत गाडून ठेवले असल्यामुळें तें वाचलें. हें मंदिर म्हणजे प्राचीन भारताच्या स्थापत्यकलेचें उत्कृष्ट स्मृतिचिन्ह होय.

# बोधिवृक्ष



सहा वर्षाच्या तपश्चर्येनंतर हवे असलेल्या ज्ञानाची प्राप्ति न झाल्यानें भ. गौतम बुद्ध निराश होऊन फल्गु नदीच्या कांठीं असलेल्या पिंपळाच्या भव्य वृक्षाखालीं येऊन ध्यानस्थ बसला नि त्याच्या छायेंतच त्यास मानवी उद्धाराचें दिव्य ज्ञान वा बोध झाला म्हणूनच त्यास 'बोधिवृक्ष' हें नामाभिधान प्राप्त झालें.

## तपस्वी सिद्धार्थ गौतम



जगांतील दुःख नि विषमतेच्या अस्तित्वाचें कारण शोधण्यासाठीं ईश्वरास प्रसन्न करून घ्यावें, म्हणून सिद्धार्थ गौतमानें बिहार प्रांतांतील उरुवेला जंगलांत अन्नपाण्याशिवाय निराहार राहून पूर्ण सहा वर्षें घोर तपश्चर्या केली. त्यावेळीं त्याची झालेली स्थिति.

बुद्धीला कळून चुकले कीं, जगांतील बहुसंख्य पददलित जनतेला या तत्त्व-ज्ञानाशिवाय तरुणोपाय नाहीं, नि म्हणून 'त्यांनीं' सर्व जगाला उद्देशून सांगितलें कीं, बौद्धतत्वज्ञानाचा सर्व जगानें अंगिकार करावा त्यांतच बुद्धजन समाजाची आत्मोन्नति सामावलेली आहे. असे कळवळून आवाहन केले. एव-ढेंच बोलून ते थांबले नाहींत तर 'आधीं केलें नि मग सांगितलें' या उक्ति-नुसार दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ सालीं स्वतःच बौद्ध धर्माची दिक्षा घेऊन आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या लाखों अनुयायांनीं त्यांचे अनुकरण करून, नागपूर मुक्कामी सदर धर्माची पताका रोवण्यांत पुढाकार घेतला। त्याचप्रमाणें त्यांनीं भारताची घटना तयार केली, त्यावेळींहि देशाच्य-राष्ट्रध्वजावर, बौद्धधर्म निदर्शक अशोक कालीन 'धर्मचक्र' अट्टाहासानें ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याचप्रमाणें राजचिन्ह म्हणून सारनाथ यथें सांपडलेल्या अशोक स्तंभावरील चार सिंहांची मुद्रा मान्य करण्यास भाग पाडलें आणि बौद्धतत्वज्ञानाची छाप संसदेतील बहुसंख्य सदस्यांच्या मनावर बिंबविली. याचाच परिणाम म्हणून कीं काय आपले भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू जगाच्या व्यासपीठांवर बोलतांना ते वेद वाङमयांतील किंवा गीतेतील तत्वज्ञान न सांगतां बौद्ध धर्माचे आद्य तत्व-ज्ञान जे 'पंचशील' त्याचाच पुकारा करून शांतताप्रिय मुत्सद्यांच्या टाळ्या मिळवितात.

यावरूनच भारतांतीलच नव्हे तर जगांतील राजधुरंधर, मुत्सद्दी नि महान् तत्ववेत्ते आज बौद्ध धर्माच्या उज्वल तत्वज्ञानाची वाटचाल करू लागले आहेत यांत मुळींच शंका नाहीं आणि ही बाब जगांतील पददलि-तांच्या उध्दाराच्या दृष्टीनें गौरवशाली नि अभिमानाची नाहीं, असें कोण म्हणेल? आज हजारों वर्षे या धर्माच्या तत्वज्ञानावर सांचलेली रक्षाधूळ साफ करण्याचें कार्य प्रथम डॉ. आंबेडकरांनीच केल्यानें त्या तत्वज्ञानाचा दैदीप्यमान प्रकाश भासमान झाला आहे नि त्या प्रकाशाची प्रखरता आस्ते आस्ते अखिल जगावर आरूढ झाल्याचें दृश्य लवकरच सर्वांस पहावयास मिळेल.

.. ३...

नव्हे अनुभवानें शहाणी झालेली पददलित जनता झपाट्यानें त्याकडे आकर्षिली जाईल यांत बिलकूल संदेह नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या संशोधनामुळेंच नि त्यांच्या अविश्रांत प्रयत्नांमुळेंच बौध्दधर्माचा उष:काल दृष्टीपथात आला असून, त्यांनीं नागपूर मुक्कामीं सन १९५६ सालीं वर्तविलेली भविष्यवाणी "मी लौकरच संबंध भारत बुध्दमय करून टाकीन" या त्यांच्या उद्‍गारांची सत्यता, त्याच्या विद्वत्तेच्या द्रष्टेपणाची जाणीव असलेला कोणीहि कबूल करील यांत मुळींच शंका नाहीं.

## महाबोधि मंदीरात

असें विचारचक्र चालू असतानांच आमची मोटार बुद्धगयाजवळ येऊन थडकली. आम्हीं सर्वजण उतरून महाबोधी मंदिरांत गेलों. तेथें प्रथम सामुदायिक प्रार्थना घेतली व आंतील माहिती मोठ्या अधिरतेनें विचारण्यास सुरुवात केली. तेथील भिक्खुनीही आमची जिज्ञासा पाहून बिलकूल आळस न करतां आनंदानें माहिती देण्याची तत्परता दर्शविली.

## भव्य बुद्ध मूर्ति

आम्हीं ज्या मूर्ति समोर प्रार्थना म्हटली ती मूर्ति ५'–३" उंच ६'–६" रुंद व २'–४" जाड असून कमलासनावर विराजमान झालेली आहे. तिच्या दोन्हीं बाजूस दोन सिंह, दोन्ही बाजूस दोन हत्ती आणि खालच्या भागांत मध्यभागीं एक स्त्री उभी असलेली अशा अनेक मूर्ति सभोवार कोरलेल्या आहेत.

मूर्तीतील भगवान् बुद्धानें पीतवस्त्र परिधान केलेलें असून, डाव्या हाताचा तळवा पसरला आहे. आणि उजव्या हाताचे एक बोट जमिनीकडे दाखविले आहे. त्या अंगुलीनिर्देशाचा अर्थ विचारला असतां एकानें भ. बुध्दाला प्रश्न विचारला कीं, सुख कोठें मिळेल ? या प्रश्नाचें उत्तर देतांना भ. बुध्दानें अंगुली निर्देश करून सांगितलें कीं सर्व प्रकारचें सुख व दु:ख येथें जमिनीवर–पृथ्वीवरच आहे. आणि तें प्रत्येक जण आपल्या

कर्मानें निर्माण करतो. त्याच प्रमाणें मानव प्राण्यांच्या सर्व जीवनावश्यक वस्तु जमिनींतच निर्माण होतात, त्यावर सर्वांचा सारखा हक्क आहे. हक्काची योग्य प्रमाणांत अंमलबजावणी झाल्यास सर्वांचें समप्रमाणांत पोषण होईल. एक अजीर्ण होईतों खातों नि एक पोटांत भूकेची आग सहन करून वावरतों ही विषमता जेव्हां नष्ट होईल, त्याचवेळीं सर्वांस सुख लाभेल. त्याचप्रमाणें चांगल्या कृत्याचें फळ चांगले नि वाईट कृत्याचें वाईट हें येथेंच पृथ्वीवर भोगावें लागतें. स्वर्ग, नरक, ईश्वर इत्यादि कल्पना झूट नि भ्रम निर्माण करणाऱ्या आहेत. या भ्रामक कल्पनांपासून दूर रहाणारानेंच सुखाची आपेक्षा बाळगावी.

ही माहिती ऐकतांच आम्हांस अधिकच जिज्ञासा निर्माण झाली नि मग आम्ही सदर मूर्तीच्या भिन्न भिन्न कलाकृतींवर प्रश्न विचारण्यास उत्सुक झालों. मूर्तीच्या दोन बाजूस सिंह कां ? हत्ती कां ? तळवा कां पसरला आहे ? खालच्या वाजूस स्त्री कां ? ती कोण ? मूर्ति कमलासनावरच कां ? पीतवस्त्रच कां ? या सर्व प्रश्नांची उत्तरें सदर मार्गदर्शकानें इतकीं समर्पक नि उद्‌बोधकरीत्या दिली कीं त्यामुळें बौध्द धर्माचें खरे खुरें तत्वज्ञान समजण्यास आम्हांस फार मदत झाली. विस्तारभयास्तव त्या सर्वांचें वर्णन करणें शक्य नसलें तरी एवढें मात्र खरें कीं भगवान बुध्दाच्या मूर्तीत जें भिन्न भिन्न आकार नि कलाकृति दिसतें ती शोभेसाठीं नसून त्यांत धर्म तत्वज्ञान दर्शविलेलें असतें.

मंदिराचा सर्व अंतर्भाग फिरून पाहिल्यानंतर मार्गदर्शकानें मंदिराचा पूर्वेतिहास आम्हांस कथन केला. सदर इतिहास जितका मनोरंजक आहे. तितकांच तो हृदयद्रावक असल्यानें तो आपल्या नवदीक्षित बौद्धांना माहितीच्या दृष्टीनें उद्‌बोधक होईल म्हणून जितका ऐकला, वाचला तितका देण्याचा प्रयत्न केला आहे.

## मंदीराचा पूर्वेतिहास

या मंदीराच्या पूर्वी या स्थळीं बौद्धधर्माचा महान प्रचारक प्रियदर्शी

सम्राट अशोकानें एक लक्ष मुद्रा खर्च करून एक विहार बांधला होता. त्यावेळीं त्याचें नांव "वज्रासन-गंधकुटी विहार" असें होतें.

त्यानंतर चीन, ब्रह्मदेश, सिंहलीद्वीप आदि देशांच्या बौद्ध राजांनीं या स्थळीं ठिकठिकाणीं अनेक मंदिरें बांधिली होती. ( हे अनेक शिला लेखांवरून नि चिनी प्रवाशांच्या प्रवासवर्णनावरून ज्ञात झालेलें आहे. )

सातव्या शतकांत ज्या वेळीं 'ह्युएनत्संग' हा चिनी प्रवासी भारतांत आला त्यावेळीं त्याला अशोकानें बांधलेल्या विहाराच्या जागी एकशेऐंशीं फूट उंचीचे एक बुद्ध मंदिर बांधलेलें दिसलें. हें मंदिर एका बौद्ध उपासकाकडून विहाराच्या भग्नावशेषावर बांधलें गेलें होतें. त्या मंदीरांत चांदीच्या दोन भव्य मूर्ति होत्या. एक बोधिसत्व अवलोकितेश्वर किंवा बोधिसत्व मैत्रेयाची असावी असा त्यानें तर्क केला. हल्लीचें जें प्रचलित मंदिर आहे, तें हेंच मंदिर ह्युएनत्संगनें पाहिलें असावें असा तर्क पुराण संशोधक श्री. कॅनिंग यांनीं केला आहे. शिला लेखाच्या आधारें असें स्पष्ट झालें आहे. कीं, हें मंदिर इ. स. दुसऱ्या शतकांत बांधलेलें असावें.

## मंदीराचें बाह्य स्वरूप

महा बौद्ध मंदिर हें जगाच्या इतिहासांत ज्याप्रमाणें पुरातन नि अद्वितीय असें स्मारक आहे, त्याचप्रमाणें तें जगाचें आदरणीय पवित्र नि पूज्य असें स्थानहि आहे.

मानवाच्या हातून कलाकौशल्याची जी कांहीं स्मृतीचिन्हें तयार झाली आहेत, त्यापैकीं कलाकौशल्ययुक्त असें हें एक मंदिर असून प्राचीन कलांचें तें उत्कृष्ट असें स्मृतिचिन्ह आहे. या मंदीराच्या पूर्वी जगांत एकहि मंदिर याच्या तोडीचें दाखविण्यासारखें नव्हतें.

हें मंदिर जितकें असाधारण आहे तितकेंच तें अतिप्राचीनहि आहे. स्थापत्य कलेच्या दृष्टीनेंहि त्याचें विशेष महत्त्व आहे. कलाकौशल्य अप्रतिम म्हणूनच या मंदीराचें अनुकरण करून जगांतील अन्य स्थळीं या नमुन्यांची मंदिरें बांधली गेली आहेत.

## मंदीराचा व्याप

या सुप्रसिद्ध मंदिराच्या सौंदर्याबरोबरच त्याचा विस्तारहि डोळ्यांत भरण्यासारखा व्यापक आहे. त्याची उंची सुमारें १८० फूट आणि गोलाकार भागाचा व्यास सुमारें चाळीस फुटाचा आहे. वरचा भाग गोलाकार निमुळता होत गेला असून कळस सुवर्ण पत्र्यानें मढविलेला आहे.

मंदीराच्या चारी कोपऱ्यांवर चार लहान मंदिरें असून, मूळ मंदीराच्या शोभेंत त्यांनीं अधिकच भर घातली आहे. त्यापैकीं समोरच्या कोपऱ्यांवर असलेल्या दोन्ही मंदीराच्या मध्यभागांतून वरच्या मजल्यावर जाण्यासाठीं दोन जिनें आहेत. वर चढतांना जिना ज्या ठिकाणीं वळतो, त्या ठिकाणीं दोन्ही जिन्याच्या मध्यभागीं वळणावर बोधिसत्व पद्मपाणीच्या दोन समान मूर्ति आहेत.

वरच्या मजल्यावर मंदीरांत मध्यभागीं बोधिसत्व अवलोकितेश्वरांची एक उभी मूर्ति आहे. या मूर्तीच्या मस्तकावर दोन्ही बाजूस धर्मचक्रमुद्रांमध्यें दोन बुध्द मूर्ति आहेत. त्याच्या खालीं दोन्ही बाजूस अभयमुद्रांमध्यें दोन बुध्द मूर्ति दिसतात. कमरेच्या दोन्ही बाजूस भूमीस्पर्श मुद्रांमध्यें दोन बुध्द मूर्ति आहेत. आणि पायाजवळ दोन्ही बाजूस दोन देव मूर्ति आहेत. अशा रीतीनें या मूळ भव्य मूर्तीच्या चोहोंबाजूच्या चौकटींत अनेक सार्थ अशा मूर्ति कोरलेल्या असल्यानें मूळ मूर्तीच्या सौंदर्यांत नि पावित्र्यांत अधिकच भर पडली आहे.

## मंदीराच्या प्रांगणांत

मंदीरांतून बाहेर पडल्यावर सभोंवार दृष्टिक्षेप टाकतांच जिकडे तिकडे लहानमोठीं मंदिरें दिसतात. त्यांतील कांहीं अगदींच भग्नावस्थेंत दिसतात. त्या मंदीरांत मूर्ति असाव्यात असा त्या खालच्या बैठकांच्या अस्तित्वावरून तर्क बळावतो, त्याचप्रमाणें त्या विभागांतील परिसरांत अनेक लहानमोठ्या वृक्षांनीं तेथील सौंदर्यांत नि पावित्र्यांत अधिकच भर घातली आहे. त्यामुळें लांबूनच या विभागांत नजर जातांच श्रध्दाळू यात्रेकरूंच्या मनांत अधिकच श्रद्धा निर्माण होऊन त्यांचे पाय तिकडे सहजगत्या ओढावले जातात.

अशा या विश्वविख्यात आदरणीय नि पवित्र मंदीराच्या दर्शनास कोण व्याकुळ होणार नाहीं? एवढेंच नव्हे तर या स्थळांना अनक वेळां भेटी देऊनहि दर्शकाचें कदापीहि समाधान होऊं शकणार नाहीं. या चित्ताकर्षक क्षेत्राला भेटी देऊन आलेला प्रत्येक जण हे कबूल करील. यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

## महाबोधि मंदीराचा जीर्णोद्धार

मागें एका ठिकाणी सांगितल्याप्रमाणें बौद्ध धर्मावर अनेक संकटें आल्यावरून त्याच्या भरभराटीस जी उतरती कळा येत चालली, त्याचा परिणाम त्या धर्माच्या पवित्र स्थळांवर नि तेथील मंदीरांचें अस्तित्वावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्यांतलेत्यांत या देशांतील राजाश्रय जसा अनुकूल वा प्रतिकूल मिळत गेला, त्या प्रमाणांत या पवित्र स्थळांची उन्नति वा अवनीति होत गेली.

याची ठळक उदाहरणें म्हणजे बौद्ध राजा हर्षवर्धन याच्या मृत्यूनंतर इ. स. ६४८ सालीं शैव राजा पुन्हां शक्तिशाली होऊन, राज्यकारभाराची सूत्रें त्याच्या हाती गेली. तो बौद्धधर्माचा पक्का द्वेष्टा असल्यानें त्यानें बौद्धगया मंदिराचा राजाश्रय नष्ट केला. व त्या मंदीराच्या व्यवस्थेकरितां सरकारी तिजोरींतून देणगीरूपानें मिळणारी मदत त्यानें बंद केली. त्यामुळ मंदीराची व्यवस्था संपूर्ण मोडकळीस आली. त्याच्यानंतर पालवंशीय राजे राज्यावर आले. त्यांनीं इ. स. ८१२ ते ११०१ पर्यंत राज्य केलें. ते बौद्ध धर्माचे सहानुभूतीदार असल्यानें त्यांनीं वेळोवेळीं बाहेरच्या देशांतून जे बौद्धधर्मीय यात्रेकरू येथें आले, त्यांना सहानुभूतिपूर्वक योग्य ती मदत करून त्यांच्याकरवी मोडकळीस आलेल्या मंदीराचा जीर्णोद्धार करविला.

इ. स. च्या अकराव्या शतकांत ब्रह्मदेशचा राजा **थादोमे** यानें **थाकिन पेंदोगुजी** नांवाच्या भिक्खूच्या नेतृत्वाखालीं धर्मदूतांचीं दोन दलें पाठविलीं. पहिल्या दलानें इ. स. १००८ सालीं मंदीराचें नक्षीदार नि कलात्मक असें कुंपण तयार केले व दुसऱ्या दलानें सन १०७९ मध्यें मूळ मंदीराची योग्य ती दुरुस्ती केली.

बुद्धगया येथें सांपडलेल्या दुसऱ्या एका शीलालेखांवरून असे ज्ञात झालें की इ. स. ११०६ सालीं ब्रह्मदेशाचा राजा '**सेमप्यू थानिक तथा मेनजिने**' सदर मंदीराचा जिर्णोद्धार करण्यासाठी श्री. धर्मराज गुरु **काश्यप** यांच्या नेतृत्वाखालीं धर्मदूतांचे एक दल पाठविलें होते. त्यानीं सुमारें १० महिनें येथें राहून आराकानचा राजा **मंडया** याच्या सल्ल्यानें जीर्णोद्धाराचें कार्य केले. दुसऱ्या एका शीलालेखावरून माहिती मिळाली कीं चीनच्या सम्राटाच्या आदेशांवरून बुद्धगया मंदीराच्याजवळ एक दुसरें मंदिर बांधले होते. परंतु त्याचे अस्तित्त्व तेथे कोठेंच भासत नाहीं.

आणखी एका शिलालेखावरून माहिती मिळाली कीं, इ. स. १२ व्या शतकांत कनोजचा राजा जयचंद यानें महाबोधि मंदीराचा जीर्णोद्धार करून मंदीराच्या व्यवस्थेच्या खर्चाकरितां थोडी जमीनहि दान केली होती. त्याचप्रमाणें कौशिक, इंद्रजित, ब्रह्ममित्र इत्यादि राजांनी सदर मंदीराच्या जीर्णोद्धाराचें कार्य केल्याच्या नोंदीचे शिलालेख उपलब्ध आहेत. तसेंच आणखी कांहीं शिलालेखांच्या नोंदीवरून ज्ञात झालें कीं, इ. स. १२००, १२९८, १३२८, आणि १३३१ या काळांत बहुसंख्य बौद्धतीर्थयात्री बाहेरच्या देशांतून येऊन त्यानी आपापल्यापरीनें आणि जेथें जरूरी असेल तेथें जीर्णोद्धाराचें कार्य केल्याचें उल्लेख आहेत.

उपरोक्त माहितीवरून बौद्धगया मंदिर नि त्याच्या परिसरांतील भूभाग हा इ. स. च्या १४ व्या शतकापर्यंत म्हणजे बाहेरच्या मुसलमानांचें या देशांत आक्रमण होण्यापूर्वीपर्यंत बौद्धांच्या ताब्यांत होता. आणि तेथील पूजादि विधि बौद्ध पद्धतीनें चालू होते, हें निर्विवाद आहे. परंतु तेथील ऐतिहासिक पुरावे नि शिलालेखांतील नोंदी उपलब्ध असतांनाहि अगदीं अलिकडे म्हणजे १९ व्या शतकात हिंदु महंतांनी जो वाद निर्माण करून हें मंदिर पूर्णतया हिंदूंचेंच आहे असा हास्यास्पद दावा मांडला तो किती फोल आहे हें सिद्ध होतें. ( त्याबद्दलची सविस्तर नि साधार माहिती पुढें ओघानें येईलच. )

आणखी विशेष हें कीं, या पुण्यभूमीच्या संरक्षणासाठीं नीतिचें चिर-

कालित्व टिकविण्यासाठीं सिंहलद्वीप, ब्रह्मदेश, चीन आदि बाहेरच्या देशाच्या राजांनीच अपार संपत्ति नि हार्दिक सहानुभूति खर्ची घालून या स्थळाचें अस्तित्व शाबूत राखण्यास मदत केली आहे.

## बोधिवृक्ष

**महाबोधि** मंदीराचें निरीक्षण केल्यानंतर आम्ही मंदीराच्या पश्चिमेस असलेल्या बोधिवृक्षाकडे गेलो. हा एक विशाल पिंपळाचा वृक्ष असून ज्या ठिकाणीं तथागतास खरे ज्ञान प्राप्त झालें. नव्हे सिद्धार्थ गौतमास खरेखुरें बुद्धत्व प्राप्त झालें आणि म्हणून त्या वृक्षास ' बोधिवृक्ष ' हें नामाभिदान प्राप्त झाले तोंच हा विश्वविख्यात ' बोधिवृक्ष ' होय.

या वृक्षामुळें या स्थळाला महत्व आहे. कारण या वृक्षाखालींच बसून भ. गौतमाला इच्छित ज्ञान प्राप्त झाले नि त्या ज्ञानाच्या आधारावरच बौद्धधर्माचा पाया रचला गेला. म्हणून या वृक्षास बौद्धजन अतिशय आदरणीय नि पवित्र समजतात. आणि या वृक्षाच्या अस्तित्वामुळेंच 'गया' या स्थळास तीर्थस्थानाचें स्वरुप प्राप्त झालें आहे यांत मुळींच शंका नाहीं.

## वज्रासन

या बोधिवृक्षाखालीं एक दगडी आसन आहे. त्याला वज्रासन असें म्हणतात. त्याची लांबी ६ फूट ६ इंच, रुंदी ४ फुट १० इंच; आणि ' उंची ३ फूट आहे. त्या आसनावर पाली भाषेंत पुढील श्लोक कोरलेला आहे.

" इहासने शुष्यतु मे शरीरं, ।
त्वगस्थि मासं प्रलयच्च यातु ।।
अप्राप्य बोधि बहुकल्प दुर्लभं ।
नैवासनात कायमतश्च लिश्चते ।। "

अर्थ– (या आसनावर माझें शरीर जरी सुकून गेले, हाडे मांस व त्वचा जरी झडून गेली, किंवा अनेक संकटे निर्माण झाली, तरी खरें ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय या बैठकीवरून मी बिलकूल हलणार नाहीं ) उपरोक्त

भ. गौतमबुद्धाच्या घोर प्रतिज्ञेवरून नि दृढ निर्धारावरून त्याची ज्ञान प्राप्तीची लालसा व तळमळ किती जाज्वल्य होती हें दिसून येतें. आणि ज्या वृक्षाखाली ती महान् प्रतिज्ञा सफल झाली, त्या वृक्षाला बौद्ध धर्मीय जगांत इतकें पावित्र्य नि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यांत काय संशय ?

## गौतमाला ज्ञानप्राप्तीचा हव्यास

उपरोक्त बोधिवृक्षाखाली व तेथील वज्रासनावर बसून भ. गौतमास जें ज्ञान प्राप्त झालें तो कांहीं दैवी चमत्कार किंवा त्याच्या ठायीं दैवी शक्ति होती म्हणून ज्ञानप्राप्ति झाली असें मुळींच नाहीं. आणि असें समजणें म्हणजे त्यांचे अलौकिक कर्तृत्व नि अनेक प्रकारची हालअपेष्टा सहन करून मिळविलेला अनुभव मातीमोल ठरविणें होय. कारण भ. गौतम उर्फ सिद्धार्थ हा राजवैभव, ऐश्वर्य, सत्ता, संपत्ति ऐहिक सुखाचा परिपूर्ण उपभोग घेतलेला एक राजपुत्र होता. त्यांत त्याचें मन रमेना. नव्हे त्याच्या अस्वस्थ मनाला निराळेच कांहींतरी हवें होते. त्याला सर्व मानव प्राणी सुखी कसा होईल याची तळमळ लागली होती; आहे त्यापेक्षां निराळेंच जग त्यांच्या मनःचक्षुपुढें होते. त्यासाठींच रात्रंदिवस त्याचे संशोधन चालले होते. त्याकरितां त्यानें सर्वस्वाचा त्याग करून घर सोडलें नि इच्छितध्येय प्राप्तीस्तव तो वणवण भटकला.

बालवयांत केलेल्या हिंदू–शास्त्राच्या अभ्यासावरून नि त्या शास्त्राच्या सखोल अध्ययनानें तरी मानवी सुखाचा मार्ग सांपडेल म्हणून त्याकाळाचें प्रख्यात महापंडित **आलार कालम** यांचेकडे तो गेला नि त्यांचे शिष्यत्व पत्करून त्यांच्या देखरेखीखाली वेदशास्त्रांचा सखोल अभ्यास केला. परंतु अखेर भ. गौतमाचे त्यानेंही समाधान होऊं शकलें नाहीं, म्हणून तो " उद्दक रामपुत्त " नांवाच्या एका महान संन्याशाकडे गेला. त्याचे शिष्यत्व पत्करून त्याच्याकडून समाधीच्या सात पायऱ्या त्यानें आत्मसात केल्या. गुरूच्या उपदेशानुसार देह कष्टविल्यानें नि त्यागानें मानव सुखाची गुरुकिल्ली सांपडेल म्हणून त्यानें निराहार राहून तपश्चर्या करण्याचा दृढ निश्चय केला.

## सिद्धार्थाची घोर तपश्चर्या

" अंत:करणांत अशुद्ध विकाररुपी मळ असेल तर त्यांत पडलेलें भावनांचे प्रतिबिंब ते कितीहि तेजोमय असो तें दृष्टीगोचर होणार नाही यासाठीं स्वस्वरुप दाखविणारा मनाचा आरसा स्वच्छ असला पाहिजे " आपल्याला ज्या अर्थी ते महान तत्व दिसत नाहीं, त्याअर्थी आपलें अंत:करण शुद्ध नाहीं हें स्पष्ट आहे. असा गौतमानें सिद्धांत बांधला.

कारण अन्न निरनिराळ्या रसांचें बनलेलें असतें व तें रस निरनिराळ्या अशुद्ध विकारांना उत्पन्न करतात. याचा परिणाम ते विकार अंत:करणांत बिंबून तेहि विकारी बनतें हें तत्व त्या मुळाशीं असावें, म्हणूनच महानयोगी योगभ्यास करीत असतांना निराहार राहात असतात. भ. गौतमानें या नियमाप्रमाणें निराहार राहण्याचा निश्चय केला. आणि त्वरित त्या निर्धाराची अंमलबजावणी करण्यासाठीं त्यानें आपले गुरु महापंडित व महासंन्यासी उद्दक रामपुत्त यांना सोडून तो उरुवेल जंगलांत निघून गेला. नि त्यांनीं दाखविलेल्या मार्गाप्रमाणें त्यानें घोर तपश्चर्येचा अवलंब केला.

तेथे त्याच्या तपश्चर्येची पूर्ण सहा वर्षें निघून गेली, परंतु अद्याप त्याला जे साध्य करून घ्यावयाचे होते तें त्याला प्राप्त झाले नव्हते. त्यासाठीं त्यानें तपश्चर्या, उपवास इत्यादि उपाय–जीवाची पर्वा न करतां चालविले होतेच. खडतर तपश्चर्येमुळें आणि शारीरिक त्रासामुळें त्याचे शरीर अगदी निस्तेज व अशक्त झाले होतें.

## तपश्चर्येतून मिळालेला अनुभव

या सहा वर्षाच्या अनुभवानें गौतममुनीला आपण ज्या मार्गानें जात आहोत तो मार्ग निरूपयोगी आहे असे वाटूं लागलें. " अन्न वर्ज्य करून, फक्त शरीर कृश होईल, परंतु शरीर कृश करून माझ्या मनाचें समाधान कसें होणार ? खऱ्या ज्ञानाचा प्रकाश माझ्या अंतर्यामीं कसा पडणार ? " म्हणून त्यानें तोहि मार्ग सोडण्याचा निश्चय करून, तो त्या जंगलापासून

निघाला. आणि तेथून जवळच असलेल्या निरंजना नदीच्या कांठाकांठानें अगदीं उद्विग्न मन:स्थितींत चालत गेला.

## ज्ञानप्राप्ती कशी झाली ?

खडतर तपश्चर्या, पराकोटीचें देहदंड व उपासमार हा सारा उपक्रम पांच सहा वर्षं करूनहि जेव्हां आपणास हव्या असलेल्या ज्ञानाचा उलगडा होत नाहीं. तेव्हां गौतमानें ते सारे मार्ग त्याज्य ठरवून त्यानें चिंतन करीत बसण्याच्या अगदीं साध्या मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविलें. जातां जातां त्यास फल्गू नदीच्या कांठीं एक विशाल वडाचा वृक्ष दिसला त्याखालीं तो जाऊन बसला नि संवयीप्रमाणें तो समाधीस्थ होऊन चिंतनांत मग्न झाला.

जगांतील प्रत्येक मनुष्यप्राणी दु:खी कां? प्रत्येकजण सुखासाठीं धडपड करीत आहे. परंतु सुखी मात्र कोणीच दिसत नाहीं. हें असें कां ? मानवाला त्यांतून सुटण्याचा कांहीं मार्ग आहे कां ? या एकाच प्रश्नाचा त्याला एकसारखा ध्यास लागला होता. त्याचा पुरा छडा लावण्याचा त्यानें निर्धार केलेला होता. नि त्याप्रमाणें तो त्या वटवृक्षाच्या छायेंत तेंच चिंतन करीत बसला.

गौतम ज्या ठिकाणीं बसला होता, तेथून जवळच एक सेनानीग्राम नांवाचें गांव होते. त्या गांवांत एक मोठा जमीनदार राहात होता. त्या गांवाच्या नांवावरून त्यास सेनानीजमीनदार असे म्हणत असत. त्याला सुजाता नांवाची एक अति सुंदर व तरूण कन्या होती.

चांगला मनपसंत नवरा मिळून मुलगा झाला म्हणजे दुधाच्या खिरीचा नैवेद्य दाखवीन असा तिनें कुमारी असतांना आपल्या गांवाजवळच्या वनांतील त्या वटवृक्षाला (ज्या वृक्षाखालीं गौतम ध्यानस्थ बसला होता त्याला ) नवस केला होता. सुदैवानें तिला मनासारखा पति मिळाला नि योग्य वेळीं एक सुंदरसें पुत्ररत्नहि लाभले.

सुजाताला आपल्या नवसाची आठवण झाली वैशाखी पौर्णिमेचा चांगला मुहूर्त पाहून तिनें नवस फेडण्याचें ठरविलें. त्या दिवशीं सकाळीं उठून वनांत ज्या वडाच्या वृक्षाखालीं तिच्या देवतेची मूर्ति होती त्या

वृक्षाखालीं जागा स्वच्छ करण्यासाठीं तिनें आपल्या दासीला पाठवून दिले व स्वत: नैवेद्याची खीर करण्यासाठीं स्वयंपाकघरांत गेली.

इकडे दासी वडाच्या झाडाजवळ आल्यावर तिनें गौतमाची ध्यान-मग्न, प्रफुल्ल नि शांत मुद्रा पाहून; ही या ठिकाणची देवताच प्रसन्न होऊन प्रगट झाली आहे अशी तिची समजूत झाली नि धांवतच परत फिरली व सुजाताला पाहिलेल्या दृश्याची खबर दिली.

सुजाता त्वरित उठली. दासीच्या हातांत पाण्याचा सुवर्ण कलश व पूजेचें साहित्य देऊन तिनें खिरीचें पात्र स्वतः घेऊन झपझप पावलें टाकीत त्या वटवृक्षाजवळ गेली. तेथें पाहते तों साक्षात् वनदेवताच आपला नैवेद्य ग्रहण करण्यासाठीं झाडाखालीं बसली आहे अशी तिची खात्री झाली. तिनें हातांतील पात्र खालीं जमिनीवर ठेवून मोठ्या भक्तिभावानें गौतमाला वंदन करून, प्रदक्षिणा घातली व बरोबर आणलेलें खिरीचें ताट त्याच्यापुढें ठेविलें.

तिच्या या गडबडीमुळें गौतम समाधींतून जागा झाला व डोळे उघडून त्यानें सुजाताकडे पाहिलें. त्यावेळीं सुजाताची खात्री झाली कीं ही कोणी वनदेवता नसून कोणी महातपस्वी व्यक्ति असावी. सुजाता अत्यंत नम्रपणें गौतमाला पुन्हां वंदन करून म्हणाली, "हे तपस्वी, माझ्या देवतेकरितां मोठ्या भक्तिभावानें आणलेला हा नैवेद्य मी आपणाला अर्पण केलेला आहे आपण त्याचा स्वीकार करावा. आपण तो ग्रहण केल्यानें माझी देवता संतुष्ट होईल अशी माझी खात्री आहे."

गौतमहि अनेक वर्षे अन्नपाण्यावाचून वंचित होताच. त्यानें हातावर पाणी घेऊन आग्रह केलेल्या त्या खीरीचा स्वीकार केला व सुजाताला आशिर्वाद दिला.

अशा रीतीनें सुजातानें गौतमाला अनेक वर्षांनंतर आज प्रथमच अन्न दिलें त्यामुळें गौतमाला हुषारी वाटली. तो तेथून उठला व जवळच असलेल्या एका पिंपळाच्या झाडाखालीं योग्य जागा आहे असें पाहून तेथें चिंतन करीत बसला.

तो दिवस वैशाख पौर्णिमेचा होता. स्वच्छ चांदणें पडलें होतें. त्या ठिकाणीं गौतमानें बराच तेळ चिंतनांत घालविल्यावर थोड्या वेळांतच त्याला मानवी जीवनाच्या दु:खाची गुरुकिल्ली सापडली. नव्हे मानवाची दु:खापासून सुटका करण्याचा, मानवी प्राण्याच्या दु:खविमोचनाचा मार्गच अखेर त्याला सांपडला. तो म्हणजे 'मनुष्याची तृष्णा' हेंच त्या दु:खाचें मूळ आहे ही गोष्ट त्या रात्रीं गौतमानें प्रथम शोधून काढली.

गौतमानें या उमगलेल्या ज्ञानापासून निष्पन्न होणाऱ्या मुद्यांची उलट सुलट बाजूनें खूप तपासणी केली व ते पायाशुद्ध असल्याबद्दल स्वत:ची खात्री झाल्यावर त्यानें आपला निर्णय अखेर पुढील सिद्धांताच्या रूपानें मनाशीं दृढ केला.

( १ ) जगांत सार्वत्रिक दु:ख आहेच आहे; हें पहिले सत्य.
( २ ) त्या दु:खाचें मूळ तृष्णा आहे; हें दुसरें सत्य.
( ३ ) तृष्णेचा क्षय अथवा निरोध केल्यानेंच माणसाची दु:खापासून सुटका होईल हें तिसरें सत्य.
( ४ ) कायावाचामनें करून सदाचरणानें वागल्यानेंच त्या तृष्णेचा क्षय करतां येईल; हें चौथें सत्य.

अशा रीतीनें ज्या वृक्षाखालीं गौतमाला हवे असलेले ज्ञान प्राप्त झाले नि त्यामुळें त्यास बोधिसत्व ही उपाधि प्राप्त झाली त्या पिंपळाच्या वृक्षाला बोधिवृक्ष हें नांव तेव्हांपासून प्राप्त झाले.

---

## ज्ञानप्राप्तीचें श्रेय बोधी-वृक्षाला कीं कर्तृत्वाला?

अशा रीतीनें भगवान गौतमानें त्याला हव्या असलेल्या खऱ्या तत्त्वज्ञानाच्या संशोधनार्थ मनोनिग्रहपूर्वक अनेक संकटें सहन केली. निरनिराळे अनुभव घेतले नि संचित अनुभवांतून त्याला सत्याचें संशोधन झालें. या त्याच्या फलप्राप्तीला दैवी चमत्कार म्हणणें किंवा त्या पिंपळाच्या वृक्षाच्या ठायीं दैवी शक्ति आहे, असें समजणें म्हणजे या त्याच्या अचाट कार्याला नि

अनुभवाला शुन्यवत् ठरविणें होय. हे मात्र नक्की म्हणतां येईल कीं भगवान गौतमानें सर्व प्रकारचे अनुभव घेतल्यानंतर अखेरच्या वेळीं व स्थळीं जगाला मार्गदर्शन करणाऱ्या या चिरस्मरणीय तत्वज्ञानाचा जेथें शोध लागला गेला ते स्थळ अखिल मानवजातीच्या दृष्टीनें आदरणीय नि अविस्मरणीय ठरण्याचा अग्रहक्क त्या वृक्षाला खास आहे.

## बोधिवृक्षाचा इतिहास

बोधिवृक्ष जगांत सर्वांत प्राचीन आणि ऐतिहासिक वृक्ष मानला जातो. त्याचा इतिहासहि विचित्र घटनांनीं भरलेला आहे. अडीच हजार वर्षापूर्वीच्या ह्या पुरातन वृक्षाचें अस्तित्व नि पावित्र्य पूर्वीइतकेच आजहि जसेंच्या तसें आहे. त्याचप्रमाणें अनेकांनीं त्याच्या फांद्या तोडून नेऊन अनेक स्थळीं त्याचा विस्तारहि केला आहे.

भगवान गौतमाच्या वेळेस या वृक्षाची एक फांदी 'श्रावस्तीच्या' जेतवन बागेंत महास्थविर आनंद याच्या हस्तें लावली गेली होती. म्हणून त्या स्थळीं त्या वृक्षाला "आनंद बोधिवृक्ष" असें नांव तेथें ठेवण्यांत आलें आहे. तो वृक्ष अद्याप त्या ठिकाणीं आहे.

त्याचप्रमाणें सम्राट अशोकाची कन्या भिक्षुणी **संघमित्रा** हिनें या वृक्षाची एक फांदी सिलोनला नेली व तेथें अनुराधापुरांत लावली. सदर फांदीपासून लावलेला वृक्ष अद्याप त्या स्थळीं आहे.

## वृक्षाचें उच्छादन व पुनर्जीवन

सम्राट अशोकानें कलिंगदेश पादाक्रांत केल्यानंतर त्यानें बुध्दधर्माची दीक्षा घेतली. आणि आपल्या ठायीं वास करीत असलेल्या दुर्वासना नि दुर्भावना नष्ट व्हाव्यात या समजुतीनें तो दररोज नियमितपणें त्या वृक्षा-खालीं येऊन बसत असें हा त्याचा उद्योग त्याची पत्नी तिश्यरक्षिता हिला पसंत न पडल्यानें तिनें मत्सरानें प्रेरित होऊन त्या वृक्षाचें मूळासह उच्चा-टन करून टाकलें. या प्रकारामुळें सम्राट अशोकास अतिशय दुःख झाले व त्यानें त्याचवेळीं घोर प्रतिज्ञा केली कीं, या वृक्षाला पूर्ववत पानें फुटेपर्यंत या जागेवरून मी हलणार नाहीं. असें सांगतात कीं, लवकरच त्या ठिकाणीं

जमिनींत असलेल्या मुळांना कोंब फुटून पानें दिसू लागली. आणि अशोकाला आपली प्रतिज्ञा सफल झाल्याचा आनंद उपभोगण्याचा प्रसंग निर्माण झाला.

इ. स. च्या ६ व्या शतकांत जनपदाचा कर्णसुवर्ण नांवाचा बुध्दधर्माचा एक हितशत्रु होता. त्यानें मत्सरानें प्रेरित होऊन या वृक्षाचें मूलोच्छेदन केलें. परंतु मगध देशाचा राजा पूर्ववर्मा यानें अनेक प्रयत्न करून नि त्या वृक्षाच्या मूळाचें संरक्षण करून, परत ती मुळें जमिनींत पुरली व जोपासना केली. या अपराधाबद्दल त्या कर्णसुवर्णास हद्दपारीची शिक्षा दिली गेली.

इ. स. १८७० सालीं एक महाभयंकर वादळ व पाऊस झाला. त्यांत हा वृक्ष मूळासह उखडला गेला. परंतु हरेक प्रयत्न करून परत त्याच जागीं तो लावला गेला व पुन्हां तो पूर्ववत् झाला.

इ. स. १८८० मध्यें मंदीराच्या जीर्णोध्दाराच्या वेळीं हा वृक्ष पुन्हां पडला त्यावेळीं त्याची एक फांदी त्याजागीं लावली गेली व अशा रीतीनें हल्ली अस्तित्वांत असलेला वृक्ष हा त्या फांदीचाच पुर्नजिवीत झालेला भाग होय.

दुसरी एक फांदी बोधिमंदिरापासून उत्तरेस ८० फुटांवर लावली गेली. ती ही पुनर्जीवीत होऊन हल्ली तेथे तिचा मोठा वृक्ष झाला आहे. त्या वृक्षाखालीं हिंदू महंतांनीं अनेक देवतांच्या मूर्ति ठेवल्या आहेत. त्यामुळें ते स्थान आपल्या पूर्वजांचें पिंडदान देण्याचा विधि करण्यासाठीं आजपावेतो उपयोगांत आणतात.

बोधिवृक्षाच्या पावित्र्याबद्दल बौध्द धर्मियांच्या प्रमाणेंच हिंदू धर्मीयांच्याहि मनांत नितांत आदर आहे. बौध्दवाङमयाप्रमाणेंच हिंदू धर्मग्रंथांत विशेषत: अग्निपुराण नि वायुपुराण यांत बोधिवृक्ष आणि बौद्धगया यांचे महात्म्य यथार्थ वर्णन केलेले आहे.

परंतु हिंदू शास्त्रांत या वृक्षाबद्दल नि बौध्दगया तीर्थाबद्दलचें वर्णन अद्‌भूत चमत्कृतिनें वर्णिलेले आहे तसा तो अद्‌भूतपणा किंवा काल्पनिक

अतिशयोक्ति बौध्दवाङ्मयांत नाहीं. हाच हिंदूधर्म नि बौध्दधर्म किंवा इतर धर्म यामध्यें मूलभूत फरक आहे.

इतर सर्व धर्मात धर्म ही ईश्वराप्रत नेणारी शिडी आहे असा दृढ समज निर्माण केला आहे. परंतु बौध्दधर्म हा मानवानें मानवाशी कसें वागावें याचे नीतिशास्त्र आहे. अद्‌भूतपणाला किंवा चमत्कृतीला ह्या धर्मात मुळींच थारा नाहीं.

आम्ही ज्यावेळीं बौद्ध गया या स्थळीं गेलो तेव्हां याजागीं बौद्ध नि हिंदू या दोन्हीं धर्माची एकाच भूभागांत परंतु अवघ्या सत्तर ऐशीं फुटांच्या अंतरावरहि धार्मिक तीर्थस्थानें अस्तित्वांत असलेली दिसलीं. परंतु दोन ठिकाणीं दोन भिन्न प्रकारची दृश्यें पहावयास सांपडली-

एका बाजूस ईश्वराचें अवास्तव स्तोम माजवून दैवी शक्ति, अद्‌भूत-पणा, चमत्कृति इत्यादींचा आभास निर्माण करून, मृतांच्या नातेवाईकांकडून मृतात्म्यांस स्वर्गात शांति लाभावी म्हणून पिंडदान नि त्यासाठीं भरम-साठ दक्षिणा लुटणारे पंडित–पुरोहित यांचा घोळका दिसत होता. तसेंच ईश्वराच्या नांवानें भिक्षा मागणारे आंधळे, पांगळे, महारोगी, जटाधारी साधू नि इतर अपंग यांच्या लांबच्या लांब रांगा दिसत होत्या.

याउलट बौद्ध मंदीराकडे एकहि भिक्षा मागणारा किंवा दक्षिणा उपटणारा पुरोहित–पंडित दिसला नाहीं. किंवा मंदीरांत येऊन नवस करून मूर्तीला लांच दर्शविणारा यात्रेकरूहि दिसला नाहीं. कारण हा धर्म ईश्व-राचें अस्त्वि, आत्मा, पुनर्जन्म, पापपुण्य या कल्पना न मानणारा असल्यानें हें उपद्‌व्याप या ठिकाणीं दिसलें नाहींत. बौद्धधर्मीय जे यास्थळीं यात्रेस येतात ते पुण्य संचित करण्यासाठीं किंवा झालेल्या पापांचा निचरा करण्या-साठीं येत नसून भ. बुध्द हा नीतिशास्त्राचा, विश्वबंधुत्वाचा द्रष्टा नि मानवश्रेष्ठ विभूति या नात्यानें त्याच्या मंदीरांत येऊन, त्यापुढें नतमस्तक होऊन, बुध्दीचें प्रतीक म्हणून नमस्कार करतात. तो ईश्वर किंवा ईश्वराचा एखादा अवतार म्हणून त्याचे भक्त पूजा करीत नाहीत.

हा फरक आम्हांस त्याठिकाणीं ठळकपणें पहावयास सांपडला.

आणि शेवटीं धर्माच्या तत्त्वांची तुलना करीत करीत आम्ही पुढील दृश्ये पहावयास गेलों.

## शिल्पकला कौशल्याचे प्रदर्शन

आम्ही बोधिवृक्षापासून निघून मंदीराच्या उत्तरेकडील आसपासच्या मोकळया भूभागाचें निरीक्षण करीत चाललो असतां त्या भागांत चोहों-कडे लहान लहान मंदिरे, स्तूप, स्तंभ इत्यादींचें भग्नावशेष इतकें इतस्ततः पडलेले आहेत कीं पहाणारास तें कलाकृतीचें एक भव्य प्रदर्शनच असल्याचा भास होतो. त्यांतील अनेक स्तूप त्या त्या काळच्या प्रतिष्ठित भिक्खूंची समाधि स्मारकें आहेत. ती सर्व तीर्थे यात्रेकरूंनी व एकनिष्ठ उपासकांनीं तयार केलीं आहेत. त्या स्तूपावरील नि स्तंभावरील त्या काळच्या उत्कृष्ट कलाकौशल्याची साक्ष पटते. नव्हे भारतांची त्याकाळच्या पराकोटीस गेलेल्या कलाकृतीचा तो सजीव इतिहासच आहे असे म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. कारण भारताच्या मूर्त कलेच्या इतिहासांत बुध्दमूर्तींच्या निर्मितीला अतिशयच महत्त्वाचें स्थान आहे.

बुद्ध मूर्तींमध्यें जी विविधता, जे कलाकौशल्य, जे नाविन्य, जी कलात्मकता दिसतें त्याला विशेष महत्व आहे हें त्यांतील तज्ञच जाणू शकतील.

बुद्धगया या स्थळीं आम्हांस इतक्या विविध प्रकारच्या मूर्ति आढळल्या कीं, सारनाथ सोडून अन्य कोठेंहि या घडणीच्या मूर्ति नसल्याचें सांगण्यांत आले. हे सर्व स्तूपादि स्मारकाचे अवशेष इ. स. १८८० मध्यें मंदीराच्या जीर्णोद्धाराच्यावेळीं सांपडलेले आहेत.

## भारत सरकारची सहानुभूति

भारत सरकारचे अलिकडेच म्हणजे इ. स. १९५६ पासून बौध्दधर्म तत्वज्ञानाकडे नि त्याच्या कलात्मक स्मारकाकडे लक्ष वेधले गेले आहे तेव्हांपासून बौध्द कलाकृतिचें संरक्षण नि जोपासना करण्यासाठीं सरकार सहानुभूती दर्शवूं लागले आहे. सन १९५६ साली भ. बुध्दाची २५०० वी

जयंती सरकारी खर्चानें मोठ्या थाटामाटानें सारनाथ येथें साजरी झाली. तेव्हां पासून बुध्दगया या पवित्र तीर्थस्थानीहि विजेच्या दिव्यांची व्यवस्था केल्यामुळें या भागाची रात्रीची शोभा द्विगुणित झाली आहे.

## यात्रेकरूंसाठीं धर्मशाळा

त्याचप्रमाणें यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठीं अनेक धर्मशाळा. यात्रा-निवास, डाकबंगला इत्यादींची व्यवस्था करून अडचणी दूर करण्यास मदत केली आहे. मंदीराच्या उत्तरेस एक भव्य धर्मशाळा दिसते. त्या ठिकाणीं आम्हीं गेलों. ही धर्मशाळा इ. स. १९३६ सालीं ब्रह्मी मिस्त्स् **नंदमाला** भिक्खु **उत्तस्** यांच्या प्रयत्नांनी तयार केली गेली आहे. या धर्मशाळेस सुमारें ७५०,०० रुपये खर्च आला.

या धर्मशाळेच्या बाजूलाच दुसरी एक धर्मशाळा आहे. ही लडाखची भिक्खु लामा "**खनयो ओबंगसेनय**" यांनी इ. स. १९३८ साली देणग्या जमा करून बांधून घेतली. मोठ्या देणग्या देणारांची नांवें एका शिलेवर कोरलेली आहेत. त्यांत आपले भारतीय दानशूर **जुगल किशोर बिर्ला** यांनीं उदारहस्ते ५००० रु. देणगी देऊन आपले औदार्य प्रस्थापित केलें आहे.

ही धर्मशाळा दोन मजली असून, वरच्या मजल्यावर अनेक प्रदर्शनीय वस्तू व मूर्ति ठेवलेल्या आहेत. आसपास तिबेटी लामांच्या अनेक मूर्ति ठेवलेल्या असून, मध्यभागीं तिबेटी धर्मग्रंथ "**कंग्यूर-तांयूर**" हा ठेवलेला आहे. बाजूला असलेले पूजास्थान इतकें प्रेक्षणीय, अनुकरणीय नि सुव्यवस्थित आहे कीं, ते पाहतां क्षणीं मन प्रसन्न होते.

या धर्मशाळेच्या पश्चिमेस थोड्या अंतरावरच चिनी मंदिर लागते. त्यांत प्रवेश करतांच आम्हीं अगदीं मंत्र-मुग्ध झालो. कारण तेथील स्वच्छता टापटीप नि पवित्र वातावरण चटकन् लक्षांत भरल्याशिवाय राहत नाहीं हें मंदीर इ. स. १९३५ सालीं महानिर्वाणवासी '**भिक्खु सि:ती:च्छेन**" यांनीं पुष्कळ मोठी रक्कम खर्ची करून सर्व सुख-

सोयींनीयुक्त असें हें मंदिर बांधलें. आहे. मंदीरांत एक संगमरवरी दगडाची व एक काळया दगडाची अशा दोन भव्य बुध्दमूर्ति आहेत. मंदीराच्या सर्व भिंतीवर भ. बुध्दाच्या जीवनावरील प्रसंगांची उत्तम चित्रें काढली आहेत. त्यांतलें भ. बुध्दाच्या महापरिनिर्वाणाचे चित्र प्रेक्षकांच्या मनांत कारुण्याचा झरा निर्माण केल्याशिवाय राहत नाहीं.

या चिनी मंदिराच्या पाठीमागेंच एक भव्य धर्मशाळा असून ती श्री. जुगल किशोर बिर्ला शेठनें स्वतःच्या खर्चानें बांधली आहे. या धर्मशाळेंत हिंदू व बौद्ध या दोन्हींहि धर्मांच्या लोकांस राहता येतें. तेथील व्यवस्था चोख असून, यात्रेकरूंना सर्व प्रकारच्या सुखसोयी पाहिल्या जातात.

९३६७८

## सरकारी यात्रीनिवास

बुद्धगयेस येणाऱ्या यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठीं खास बिहार सरकारनें एक " विश्रामगृह " नांवाची धर्मशाळा बांधली आहे. हें विश्रामगृह आधुनिक पद्धतीचें बांधलें असून, २४ तासांसाठीं फक्त १ रु. भाडें प्रत्येक यात्रेकरूस द्यावे लागतें. त्याचप्रमाणें भ. बुध्दाच्या २५०० जयंतीच्या शुभमुहूर्तावर येथून थोड्याच अंतरावर दुसरें एक " बौध्दयात्रीनिवास " नांवाचें निवास बांधलें आहे. त्यांत फक्त ४८ यात्रेकरूं राहूं शकतील अशी व्यवस्था केली आहे. याचेहि भाडें २४ तासाला १ रु. ठेवले असून; त्यांत यात्रेकरूंना सर्व प्रकारच्या सुखसोयी मिळूं शकतात.

याशिवाय येथून जवळच एक आधुनिक धर्तीचा सरकारी खर्चानें बांधलेला डाकबंगला आहे. त्यास " बुध्दिस्ट गेस्ट हाऊस " असें म्हणतात. हा कोणासहि विनामूल्य वापरण्याचा संकेत असला तरी सर्व सामान्य गरीब जनतेला पुण्यसंचयाच्या अभावी तो कधींच रिकामा सांपडत नाहीं.

## सुजाताकुटी

मंदीराच्या आसपासच्या भागाचें निरीक्षण केल्यानंतर येथून जवळच

पूर्वेस सुजाता कुटि नांवाच्या मंदिराकडे गेलो. सदर मंदिर संपूर्णतः नष्टावस्थेंत असून, हल्ली त्या स्थळीं फक्त मातीचा ढिगारा अस्तित्वांत आहे, असें जरी असले तरी प्रत्येक यात्रेकरू वुध्दगयेस आला कीं, या स्थळाचें दर्शन घेतल्याशिवाय राहात नाहीं.

कारण सहा वर्षे अन्नाशिवाय निराहार राहून, कठोर तपश्चर्या करून अगदीं अस्थिपंजर नि मृत:प्राय झालेले शरीर घेऊन भ. वुध्द याच स्थळीं प्रथम आले नि येथें समाधिस्थ अवस्थेंत बसले असतां जिनें त्यांना खीर खावयास घालून प्रथम अन्न दिले. एवढेंच नव्हे तर वुध्दत्व प्राप्त होण्यासाठीं नवा जोम व तरतरी निर्माण करण्यास कारणीभूत झाली. या महिमामय बौध्द महिला "सुजाताचें" नांव अखिल जगांतील बौध्दांच्या हृदयांतून कधींहि नष्ट होऊ शकणार नाहीं. भ. वुध्दानेंहि महापरिनिर्वाणसूत्रांमध्यें सुजाताच्या स्वभावाची नि पुण्याईची अत्यंत मार्मिक शब्दांत स्तुति केली आहे. म्हणूनच प्रतिवर्षीं हजारों, लाखों यात्रेकरू वुध्दगयेस आले कीं, या पवित्र स्थानाचे दर्शन घेतल्याशिवाय परत जात नाहींत. नव्हे त्या स्थळाचें दर्शन घेणारा प्रत्येक यात्रेकरू स्वत:स भाग्यशाली समजतो.

अशा तऱ्हेनें आम्ही सदर मंदिर पाहून परत येत असतां वाटेंतच आम्हांला माहिती सांगणारे आमचे मार्गदर्शक यांनीं वौद्धगया मंदीराबद्दल नि तेथील या स्थळांबद्दल जी ऐतिहासिक माहिती सांगितली ती रोमांचकारी नि हृदयस्पर्शी असल्यानें ती संक्षिप्तरूपानें पुढीलप्रमाणें देण्याचा प्रयत्न करतो. (शिवाय सदर माहिती साधार पटविण्यासाठीं तेथें प्रसिद्ध असलेल्या सरकारी मार्गदर्शकांनी भिक्षु शिलाचार यांच्या " वुद्धगया " या हिंदी पुस्तिकेचा अंशतः आधार घेतला आहे. )

## बुद्धगया मंदीराची शोकांतिका

बुद्धगया येथील मंदीराची व्यवस्था नि जिर्णोद्धार कार्य इ.स. च्या १२ व्या शतकापर्यंत विशेषत परकीय बौद्धधर्मीय लोकांनीं केली आणि या

स्थळाचें वैभव वाढविण्याचे नि त्याचे संरक्षण कार्यहि विशेषतः बाहेरील देशांतील बौद्धानीच केलें आहे. याचे सविस्तर वर्णन " मंदीराचें जीर्णोद्धाराचें कार्य " या प्रकरणांत मागें केले आहे, हे ऐतिहासिक सत्य आहे. परंतु इ. स. १७६४ सालीं गयाप्रांत ब्रिटीशांच्या ताब्यांत गेला. त्याचप्रमाणें इ. स. १८८५ सालीं ब्रह्मदेशहि त्यांच्या ताब्यांत गेला. या शंभर-सव्वाशें वर्षांच्या कालावधींत भारतांत जिकडे तिकडे युद्धाची धामधूम नि अशांतता पसरल्यामुळें बाहेरच्या देशांतून विशेषतः बौद्ध देशांतून प्रामुख्यानें येणारे बौद्ध भिक्खू व उपासक हे इ. स. १८९० पर्यंत कोणीच इकडे येऊं शकलें नाहींत. या संधीचा फायदा या देशांतील सनातनी हिंदूंनी घेऊन त्यांनीं हें बौद्धक्षेत्र व तेथील मंदिरें हस्तगत केली नि तें स्थळ आपल्या ताब्यांत घेतलें आणि पुकारा केला कीं, हें तीर्थक्षेत्र पूर्वापार हिंदूंचेंच होतें व यापुढेंहि ते कायम राहणार आहे.

या कटांत सनातनीं हिंदूपैकीं महंत **श्री. हेमनारायणगिरी** हें प्रामुख्यानें होते. त्यांनीं पद्धतशीर कट रचून त्या वेळचे गया जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश मि. **जॉर्ज ग्रिब्सन** यांच्याकडून " हे मंदिर पूर्वापार हिंदूच्याच ताब्यांत होतें आणि यापुढेंहि मंदीराची सर्व प्रकारची व्यवस्था हिंदूकडे कायम असावी " असा लेखीं परवाना मिळविला.

सदर परवाना हिंदु महंतांना देण्यापूर्वी सदर न्यायाधीश महाशयांनीं याबाबतींत कसलीहि चौकशी अगर तत्संबंधीचा पुरावा पाहण्याची बिलकूल तसदी घेतली नाहीं किंवा विरोधी बाजूकडील म्हणणें ऐकून घेण्याची बिलकूल पर्वा केली नाहीं. यामुळें बौद्धधर्मीयांवर घोर अन्याय झाला नि या अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं पुढें अनेक दिव्यांतून बौद्धांना जावे लागलें. वास्तविक त्या काळचे पुराणवस्तु संशोधक डॉ. **बुकानन हॅमिल्टन** हें नुकतेंच भारतांत येऊन गेले होते. त्यांनीं आपल्या अहवालांत इतर माहितीबरोबरच बौद्धगया ह्या स्थळाचा उल्लेख केला आहे. त्यांत स्पष्ट लिहून ठेवले आहे कीं, इ. स. १८१२ पर्यंत बौद्धगया येथील मंदीराची सर्वस्वी व्यवस्था बौद्धांकडे होती. हिंदूपूजापद्धति तेथें बिलकूल आढळली नाही.

यावरून सदर मंदीराची व्यवस्था पूर्वापार बौध्दांकडेच होती हे सिध्द होते. हा स्पष्ट पुरावा त्यांचेच देशबांधव इंग्रज गृहस्थानें स्वहस्ते लिहून ठेवलेला असतांना या इंग्रज न्यायाधीशानें हिंदू महंतांच्या दडपणास बळी पडून, अगदीं घाईघाईनें नि अविचारानें सदर परवाना देऊन, हिंदू बौध्दांना दीर्घकाळ ग्रासणारा वादाचा विषय करून टाकला.

## आंदोलनाची हांक

हिंदू महंतांनीं मंदीराचा लेखी परवाना मिळविल्यापासून त्यांनीं त्या स्थळाचें सर्वस्वी हिंदूधर्मीय स्वरुप करून टाकले. लाईफ ऑफ एशियाचे अमर लेखक श्री. सर एडविन हे इ. स. १८८५ मध्यें ज्यावेळीं बौद्धगयेस दर्शनार्थ आले, त्यावेळीं त्यांना या स्थळाचें झालेले स्थित्यंतर पाहून फार वाईट वाटलें. कारण त्यावेळीं तें स्थळ सर्वस्वी हिंदूमय झाल्याचें दृश्य त्यांना पहावयास मिळालें. ही त्या बौद्धस्थलाची शोचनीय अवस्था पाहून त्यांचे हृदय अक्षरशः पिळवटून निघालें. त्यांनीं तावडतोब याविरुद्ध आवाज उठविला नि समस्त हिंदुर्धमियांना व भारत सरकारला कडक इशारा दिला कीं, हे बौद्धतीर्थ तावडतोब बौद्धांच्या स्वाधीन केलें पाहिजे. नाहींतर जगांतील सर्व बौद्ध जनता याविरुद्ध आंदोलन केल्याशिवाय गप्प बसणार नाहीं अशा तऱ्हेनें **सर एडविन** यानें अखिल बौद्ध जनतेस एकत्र येऊन या अन्यायाविरुद्ध आंदोलनांत भाग घेण्याची तळमळीची **हांक** दिली.

## बौद्ध सम्मेलन

सर एडविन यांच्या आंतरिक हांकेचा जो परिणाम व्हावयाचा तो झाला. चोहोंकडून त्यांच्या हांकेस साद मिळू लागली. समग्र बौद्ध जगांत याबद्दल खळबळ सुरू झाली. त्याच दरम्यान निर्वाणवासी **अनागरिक देव-मित्र धर्मपालजी** " हे बौद्धगया येथील महाबोधि मंदीरांत पूजेसाठीं आलें असतां त्यांना तेथील स्थित्यंतराचें दृश्य पाहून धक्काच बसला. त्यांनीं अनेक परिश्रम घेऊन नि इ. स. १८९१ च्या आक्टोबरमध्यें सर्वत्र आमंत्रणें पाठवून एक " **विश्वबौद्ध संमेलन** " भरविलें. त्या **सम्मेलनांत चीन,**

जपान, सिलोन, बर्मा, सिंहलद्वीप, नेपाळ, तिबेट, सिक्कीम, भूतान, चटगांव इत्यादि देशांतून आलेल्या हजारों बौद्ध प्रतिनिधींनी मोठ्या हिरीरीनें भाग घेतला.

सदर सम्मेलनांत सत्य, न्याय नि अहिंसा या तत्वांवर आधारित अशा सनदशीर मार्गानें आंदोलन करण्याचा निश्चय करून हें बौध्दतीर्थ-स्थान बौद्धांच्याच ताब्यांत द्यावी अशा आशयाचा ठराव पास केला व तो संबंधित व्यक्तींकडे नि भारत सरकारकडे रवाना केला.

## हिंदू महंतांची अरेरावी

सदर संमेलनांत एकमतानें केलेला ठराव त्या वेळच्या संबंधित सरकारकडे नि व्यक्तींकडे पाठवून, न्याय मिळण्याची आशाळभूतपणें वाट पहात राहिले परंतु, तीनचार वर्षांचा काळ लोटून गेला तरी त्या बाबतीत कांहींच हालचाल झाली नाहीं. उलट हिंदू महंतांनीं बुध्दगया या स्थळीं आपलें प्रस्थ वाढविण्याचें अधिकाधिक प्रयत्न कसोशीनें चालविले होते. बौध्द धर्म नी त्याचे प्रचारक, उपासक यांच्या बाबतींत हिंदूंच्या मनांत किती द्वेशबुध्दि होती याचें प्रत्यंतर म्हणजे इ. स. १८९४ सालीं श्री. आनागारिक धर्म पालजी अमेरिकेंतील धर्मसंमेलन संपवून भारतांत आले येतांना त्यांना जपानचे पंतप्रधानांनीं दिलेल्या बौध्द मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच्या इराद्यानें ते बुध्दगयेस आले. तेथें इ. स. १८९४ साली वैशाख पौर्णिमेच्या शुभदिनीं ती मंदिरांत बसविण्यास गेले असतां, तेथील हिंदू महंत श्री. कृष्णदयाळगिरी यांनीं जोराचा विरोध केला. एवढेंच नव्हे तर धर्मपालजी व त्यांच्या बरोबर असलेले सिलोनचे प्रतिष्ठित भिख्खू यांना बेदम चोपून तेथून अक्षरशः पिटाळून लावलें.

या हिंदू महंतांच्या गुंडगिरीविरुद्ध धर्म पालजीनी कोर्टांत फिर्याद दाखल केली. लौकरच त्या वेळच्या जिल्हा न्यायाधिशांनीं सर्व प्रकारच्या साक्षी पुराव्याची छाननी करून आपल्या सद्सद्विवेक बुद्धीनुसार पुढील प्रमाणें निकाल जाहीर केला.

...ग्रंथ संग्रहालय, ...
...क्रम.................... वि: ..................

"बौद्धभिक्खू नि उपासक हे नियमानुसार पूर्वापार बुद्धगया या स्थळीं पूजा करण्यासाठीं येत असतात असा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. मात्र मागच्या वर्षीच्या जुलै महिन्यापासूनच त्याठिकाणीं हिंदु पद्धतीची पूजा होत आहे. त्या पूर्वी कधीहि होत असल्याचा पुरावा हिंदूकडे नाहीं."


अशा आशयाचा निकाल देऊन हिंदू महंत श्रीकृष्णदयाळगिरी व त्यांचे साथीदार यांना मारहाणीच्या कृत्याबद्दल प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावासाची आणि १०० रु. दंडाची शिक्षा दिली. परंतु कोठें किल्ली फिरली नकळें, अगदीं थोडक्यांच दिवसांनीं सदर शिक्षा रद्द होऊन त्या हिंदू महंतांना बिनशर्त सोडून देण्यांत आले.

या प्रकारामुळें बौद्ध जनतेंत तीव्र असंतोषाची लाट उसळली. कारण अहिंसेचें प्रतिक जो भ. बुद्ध त्याच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या प्रसंगीं हिंसामय प्रसंगनिर्माण व्हावा; तसेंच त्याबद्दल न्यायहि मिळू नये याबद्दल धर्मपालजींच्या नि इतर प्रमुख भिक्खूंच्या मनांत शल्य बोंचत राहिलें. म्हणून **धर्मपालजी** व भिक्खू **सुमंगल** यांनी त्याचवेळीं वास्तव्य करून रहाण्याचा निर्धार केला. आणि बौध्दांवरील हा घोर अन्याय दूर होईपर्यंत हातीं घेतलेलें कार्य सोडायचें नाहीं अशी प्रतिज्ञा केली

## सरकारतर्फे कमिटीची नियुक्ति


भिक्खु धर्म पालजी आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठीं अहर्निश उद्योगांत गढून गेले होतें. सरकारी अधिकाऱ्यांच्या घरीं वारंवार खेटें घालणें संबंधित व्यक्तिच्या गाठीं भेटीं घेणें, अर्ज विनंत्या करणें नि आपली न्याय्य बाजू निर्भीडपणें त्यांच्यापुढें मांडणें, त्यांचें मतपरिवर्तन घडवून आणणें, हा त्यांचा उद्योग मोठ्या सौजन्यानें नि अहिंसा व्रताला शोभेल अशा प्रयत्नानें त्यांनीं या प्रकरणाचा अगदीं पिच्छा पुरविला. शेवटी त्यांच्या या दीर्घ नि चिकाटीच्या प्रयत्नामुळेंच बिहार सरकारला इ. स. १९०३ सालीं न्यायाधिश **शारदाचरण मिश्र** आणि **महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री** यांच्या नेतृत्वाखालीं या वादाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नियुक्त करावी लागली.

## कुशीनार येथील स्तूप



जेथें भ. गौतम बुद्धाचा वयाच्या ८० व्या वर्षी महानिर्वाणवास झाला त्या कुशीनगर येथें बांधलेला हा स्तूप.

## राजगृह



हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या लुंबिनी गांवीं इ. स. पूर्वी ६२३ व्या वर्षी ज्याचा जन्म झाला नि वयाच्या २९ व्या वर्षापर्यंत ज्या गृहांत मोठ्या कोडकौतुकानें लालन पालन झालें त्या भगवान गो. बुद्धाचे हें विलासयुक्त ‘ राजगृह’.

या कमिटीनें दोन्ही पक्षाकडील म्हणणें ऐकून घेतले आणि साधक-बाधक विचार करून उभय पक्षांना न्याय मिळण्याच्या दृष्टीनें एक मध्यम मार्ग शोधून काढला :—— " बुद्धगया मंदीराच्या व्यवस्थेचा कारभार महंतांकडून काढून घेऊन एका स्वतंत्र व्यवस्थापक कमिटीकडे सोंपविण्यांत यावा, आणि या निर्णयास हिंदू महंत जर कबूल नसतील तर याबाबतींत सरकारनें तसा कायदा करून असें करण्यास त्यांना भाग पाडावें. "

अशा आशयाचा अहवाल तयार करून सदर कमिटीनें सरकारकडे पाठविला.

उपयुक्त आशयाचा निर्णय हिंदू महंतांना मुळींच मान्य झाला नाहीं. एवढेंच नव्हें तर त्यांनीं त्या कमिटीविरुद्ध नि सरकारविरुद्ध आकांडतांडव करून धमक्या देण्यास सुरुवात केली.

आश्चर्याची बाब म्हणजे सरकारहि महंतांच्या या धमकावण्यास दबून सदर समितीचा अहवाल कार्यान्वयित न आणतां दफ्तरी दाखला करून ठेविला. या प्रकारांमुळें हिंदूमहंतांच्या अन्यायी कृत्यास एक प्रकारें खत-पाणीच मिळाल्यासारखें होऊन त्यांच्या त्या अंगीकृत कार्यास एकप्रकारे उत्तेजित होण्यास वाव मिळाला.

## महंतांचा अतिरेकी हव्यास

अशा तऱ्हेनें बुद्धगयामंदिर हिंदू महंतांनी जबरदस्तीनें नि अन्यायी मार्गें हस्तगत केलेंच. परंतु त्यावरच त्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें. त्यांनीं या मंदीरापासून थोड्या अंतरावर असलेल्या **" ब्रह्मी विश्रामागर "** या बौद्धस्थळांचाहि त्यांनीं हव्यास धरला.

वास्तविक हें ब्रह्मीविश्रामागर " ब्रह्मदेशांतील लोकांनीं आपल्या खर्चानी बांधून त्याची व्यवस्थाहि तेच पहात होते. परंतु त्या स्थळीं भिक्खू आनागारिक धर्मपालजी नि त्यांचे सहकारी यांचें वास्तव्य हेंच महंताच्या पोटांतील शल्य होते. त्यांची तेथून हकालपट्टी केल्यास आपल्या पाठीमागील ही बौद्धांची कायमची कटकट नष्ट होईल. या अपेक्षेनें सन १९०६ सालीं महंत

श्रीकृष्ण दयाळगिरी यांनीं भिक्खू सुमंगल यांच्याविरुद्ध गयेच्या न्यायालयांत फिर्याद दाखल करून असा दावा मांडला कीं, "बुद्धगया मंदीराशेजारचे 'ब्रह्मीविश्रामागर" हें स्थळ मंदीराप्रमाणेंच पूर्वापार हिंदूंच्याच ताब्यांत होते. परंतु हल्ली वास्तव्य करून राहिलेल्या भिक्खूंनीही जागा बेसनदशीरपणें ताब्यांत घेऊन, ती बळकावली आहे. शिवाय त्यांच्या वास्तव्यामुळें आम्हा हिंदूधर्मियांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी तें स्थळ त्वरित आमच्या ताब्यांत देण्याचा नि तेथील भिक्खूंना निघून जाण्याचा हुकूम व्हावा अशी न्यायालयास विनंती केली. शिवाय बिहार सरकारमार्फत गयेच्या न्यायालयावर दडपण आणण्यासाठीं अनेक कुटील कारस्थानेंहि रचिली गेलीं.

त्याचा परिणाम व्हावयाचा तोंच झाला. न्यायाधिशांनीं फेब्रुवारी सन १९१० सालीं तातडीचें फर्मान काढून "ब्रम्ही विश्रामागर" महंतांच्या ताब्यांत दिल्याचा नि श्री. अनागारिक धर्मपालजी, भिक्खू सुमंगल आदि भिक्खूंना सदर जागा ताबडतोब सोडून देण्याचा हुकूम बजावला गेला.

## महंतांच्या उर्मटपणाचा अतिरेक

अशा रीतीनें आपल्या कटकारस्थानास यश मिळत गेल्यानें महंतांना इतका मद चढला कीं, त्या भरांत वाटेल ती उर्मटपणानी कृत्यें ते करण्यास प्रवृत्त होऊं लागलें, नव्हें शुद्ध दंडेली माजवून बौध्दांच्या बाबतीत दहशतीचें वातावरण निर्माण करण्याचा त्यांनीं चंग बांधला. सन १९२३ च्या नोव्हेंबर महिन्यांत नेपाळचें सुप्रसिध्द भिक्खू आणि बुध्दिस्ट इंडिया पत्राचे संपादक **धर्मादित्य धर्माचार्य** आणि इतर प्रमुख भिक्खू व उपासक हें सर्वजण बुध्दगया मंदीरांत दर्शनासाठीं आलें असतां, या उर्मट महंतांनी "परधर्म सहिष्णुता" नि शालिनता हें सद्गुण पायाखालीं तुडवून या परदेशीं पाहुण्यांना अक्षरश: मारहाण करून निर्दयपणें त्यांचा पाठलाग केला.

अशा तऱ्हेची त्या कालांत शेंकडों अत्याचाराची नि त्यांच्या उर्मट-पणाची उदाहरणें आम्हांस ऐकावयास मिळाली. परंतु विस्तारभयास्तव ती

सर्वच येथें देतां येत नाहींत. या उलट बौद्धधर्मीयांनीं कमालीचा संयम पाळून नि आपल्या अहिंसा ब्रीदाला जागून अगदीं सनदशीर मार्गानें परंतु चिकाटीनें आपल्यावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठीं नि बौद्धधर्म व त्याची तत्त्वें जतन करण्यासाठी सतत सनदशीर अंदोलन चालू ठेवले.

## बौद्धांचे सनदशीर मार्ग

महंतांच्या कटकारस्थानांनीं खचून न जातां बौध्दांना जे जे सनदशीर मार्ग उपलब्ध होते त्या त्या मार्गांनीं जाण्याचा निर्धार त्यांनी अखंड चालू ठेवला. कारण सत्यावर त्यांचा विश्वास होता. सत्य हें कधीहि नाश पावत नाहीं. "अंतिम सत्याचाच विजय" हें धर्मसूत्र त्यांच्या रोमारोमांत बिबले होतें. या आत्मविश्वासानेंच त्यांनीं आपलें प्रयत्न चालू ठेवले होतें. बौद्ध प्रतिनिधींनीं कोर्ट-कचेऱ्या किंवा सरकारी वरिष्ठ अधिकारी यांच्या न्याय बुध्दीवरच केवळ अवलंबून न राहतां त्यांनी आपल्या प्रयत्नांची दिशा जनमताकडे वळविलीं. त्याकाळीं ज्या प्रचलित राजकीय नि धार्मिक संघटना होत्या त्यांच्या प्रमुखांच्या गाठीभेटी घेणें, त्यांना आपली न्याय्य बाजू सांगणें, लेखी निवेदनें आणि ठराव पाठविणें इत्यादि मार्गांचा अवलंब सुरु केला.

इ. सन १९२२ च्या डिसेंबर महिन्यांत अखिल भारतीय कांग्रेसचें अधिवेशन **डॉ. राजेंद्रप्रसाद** यांचे अध्यक्षतेखाली गया येथें भरले असतां ब्रह्मदेशांतून भिक्खू उत्तम यांचे नेतृत्वाखालीं सुमारें १०० भिक्खूंचें शिष्ट-मंडळ येथें आले आणि "बौध्दगया मंदिर" बौध्दांच्या ताब्यांत देण्याबद्दल लेखी खलिता अध्यक्षांच्या स्वाधीन केला. अध्यक्षांनीं सदर खलिता अधिवे-शनांत वाचून दाखविला. अधिवेशनानें सदर बाबींची चौकशी करण्याचा अधिकार अध्यक्षांना बहाल करून, नि आलेल्या शिष्टमंडळांचे कसेंबसें समाधान करून, त्यांची बोळवण केली; परंतु सदर बाबतींत अध्यक्षांनी पुढें कांहीएक हालचाल केली नाहीं.

त्यानंतर दुसरेंच वर्षी **कोकनद** या मुक्कामीं कांग्रेसचे अधिवेशन भरले असतां पुन: एका शिष्टमंडळानें त्या ठिकाणीं जाऊन मागील वर्षीच्या

खलित्याची आठवण करून दिली. आणि बौध्दांवरील अन्याय दूर करण्या-बद्दलची पुन्हां विनंती केली. परंतु याही वेळीं मागच्या वर्षाप्रमाणेंच सदर शिष्टमंडळाचें वरवर समाधान करून वाटेस लावले.

त्याचप्रमाणें कानपूर आणि मुझफरपूर येथें निरनिराळ्या वेळीं भरलेल्या हिंदूमहासभेच्या अधिवेशनास उपस्थित राहून बौध्द शिष्टमंडळानें आपली न्याय मागणी त्यांच्यापुढें सादर केली.

बौध्दांचा हा प्रयत्न म्हणजे लांडग्याच्या टोळीनायकाकडे जाऊन तुमच्या इतर लांडग्यांना अहिंसावादी बनण्याचा उपदेश करा असें कोंक-रांच्या शिष्टमंडळानें जाऊन सांगण्यासारखाचा हास्यास्पद जरी वाटत असला, तरी हिंदूधर्माच्या उच्च तत्वज्ञानाची ओळख असलेल्यांपैकी या हिंदू मेळाव्यांत कोणाची तरी सद्‌विवेक बुध्दी जागृत होईल नि त्यांना आमची न्याय्य मागणी पटेल या विश्वासानें बौध्द शिष्टमंडळानें सदर मार्गाचा अवलंब केला. परंतु त्याचा परिणाम व्हावयाचा तोंच झाला. सदर शिष्टमंडळाच्या खलित्यास वाटाण्याच्या अक्षता लावून आल्या वाटेनें रवानगी केली गेली.

## हिंदू महंतांची डोकेंदुखी

इकडे बुध्दगया येथें ठाण मांडून बसलेल्या हिंदू महंतांच्या उचापती चालूच होत्या. शिवाय ही परदेशांतील बौद्ध शिष्टमंडळें या देशांत येऊन आमच्या कट–कारस्थानांची लक्तरें वेशीवर टांगत आहे, ही हिंदू महं-तांची मोठीच डोकेंदुखी होऊन बसली होती.

ही शिष्टमंडळे बंद कशी होतील या विवंचनेंत ते होतेच. अखेर त्यांना एक मार्ग दिसला. तो म्हणजे ही शिष्टमंडळें ज्या मार्गानें भारतांत येतात, त्या मार्गावरील म्हणजे बंगालच्या गव्हर्नरकडे सन १९२७ साली एक अर्ज पाठवून त्यांत त्यांनी अगदीं तळमळीचा आक्रोश केला कीं, आम्हां हिंदूंना या देशी व परदेशीं बौध्दांपासून कमालीचा त्रास होत असतो, नव्हें त्यांच्या-मुळें आमच्या धार्मिक भावनांवर मोठा आघात होत आहे. हे परकीय बौध्द या देशांतील बौध्दांना आमच्या विरुद्ध चिथावण्याचें कार्य करीत असल्या-

मुळे आमच्या उभय धर्मांत भयंकर संघर्ष होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तरी या गया प्रांतातील सर्व बेकायदा आलेल्या बौद्धांना येथून हद्दपार करावें. त्याचप्रमाणें परदेशीं बौद्धांना भारतांत येण्यास बंदी घालावी. अशा आशयाचा खलिता बंगाल गव्हर्नरकडे पाठविण्यांत आला.

परंतु सदर गव्हर्नर महाशयांनी हिंदू महंतांच्या या खलित्यास कवडीचीहि किंमत दिली नाहीं उलट त्यांना असे लेखी उत्तर पाठविले कीं, "बुद्धगया" या नांवावरूनच तें स्थळ बौध्दधर्मीयांचे आहे. तेव्हां त्यांना ह्या स्थळीं जाण्यास बंदी कशी घालता येईल ? शिवाय खलित्यांत केलेल्या तुमच्या विधानांना कसलाहि आधार नाही. म्हणून तुमच्या या अर्जाचा विचार केला जाणार नाहीं."

त्यानंतर ज्यावेळीं बेळगांवला सन १९२५ सालीं म. गांधींच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचे अधिवेशन भरलें. त्यावेळीं सिलोन व इतर बौध्द देशांतील बौद्धांनीं आपली शिष्टमंडळें आणून पुनः आपली न्याय्य मागणी जोरदारपणें त्या अधिवेशनांत मांडली. यावेळीं मात्र बौद्धधर्म तत्वज्ञानाकडें अंशतः आकृष्ट झालेल्या म. गांधीजींच्या मध्यस्थीनें एक समिती नियुक्त केली गेली. सदर समितींत (१) श्री. डॉ. राजेंद्रप्रसाद (२) डॉ. काशिप्रसाद (३) श्री. व्रजकिशोरप्रसाद आणि (४) महापंडित राहुल सांस्कृत्यायन हे सदस्य निवडले गेलें. त्या समितीनें ताबडतोब या प्रश्नावर साधकबाधक विचार करून पुढील निर्णय जाहीर केला.

बुद्धगया मंदिर हिंदूकडून बांधलें गेले आहे. आणि मदिरावर पूर्वापार हिंदूचाच व्यवस्थेचा अधिकार आहे. या हिंदूमहंतांच्या म्हणण्याला कसलाहि माधार पुरावा नाहीं किंवा त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ठ्यर्थ कसलाही लेखी अगर तोंडी आधार उपलब्ध नाहीं. उलट हें मंदिर बौद्धांनीच निर्माण केलें असून, त्याचें संस्कारकार्य तेच पूर्वापार करीत असल्याचा भरपूर पुरावा सांपडतो. म्हणून या स्थळावर बौद्धांचाच संपूर्ण अधिकार पोंहचतो. परंतु उभय धर्मांचा संघर्ष टाळण्यासाठीं सुवर्णमध्य साधण्याची आवश्यकता आहे. यासाठीं हिंदू व बौद्ध या दोन्हीं धर्मीय लोकांची एक संयुक्त समिति

स्थापन करून, तिच्या वतीनें येथील कारभार व व्यवस्था चालविण्यांत यावी. परिणामी उभय धर्मीय लोकांचा संघर्ष थांबला जाऊन परस्पर धर्माच्या तत्वांची देवाणघेवाण होईल. आणि त्यामुळें दोन्हीं धर्मांचा उत्कर्ष होण्यास मदत होईल. विशेषत: बौद्धधर्मांतील प्रेम दया नि अहिंसा या हिंदूधर्मात अभावानें तळपणाऱ्या तत्वांचा प्रादुर्भाव होऊन, धर्माच्या प्रगतीस मदत होईल.

## विधान सभेत मंदिर बिल

उपरोक्त समितीचा निर्णय जरी बौद्धांच्या दृष्टीनें संपूर्ण अनुकूल नसला तरी बहुतांशीं समाधान मानण्याइतपत तो अनुकूल होता. हे जरी खरें असलें तरी प्रत्यक्ष अम्मलबजावणीच्या दृष्टीनें सदर निर्णयाचें पुढे काय ? हा प्रश्न शिल्लक राहिलाच. त्या निर्णयावर सरकारी शिक्का–मोर्तब झाल्याशिवाय तो कार्यान्वित होणें अशक्यच. म्हणून बौद्धप्रतिनिधींनी त्यादृष्टीनें प्रयत्न चालू ठेवून अनेक, संबंधित सरकारी अधिकाऱ्यांच्या गांठीभेटी घेऊन आणि शेवटीं इ. स. १९३५ सालीं बिहारच्या विधान-सभेंत बुद्धगया मंदिर बिल आणविलें गेलें, परंतु कां कोण जाणें, सदर बिल कित्येक वर्षे चर्चेलाच येऊं शकलें नाहीं.

शेवटीं प्रयत्नांची शिकस्त करून दि. १९ जून १९४६ सालीं सदर बिल बिहार विधानसभेंत चर्चेला आणण्यांत बौद्धांनीं यश मिळविलें. सदर चर्चेतून हें निष्पन्न झालें कीं, या बाबीवर सखोल विचार करण्यासाठीं एक सरकारी समिती स्थापन झाली. व त्या समितीला लवकरांत लवकर अहवाल देण्याचा अधिकार देण्यांत आला.

## महंतांची कोर्टाकडे धांव

बिहार विधानसभेंत सदर बिलावर जी चर्चा झाली व त्या अनु-रोधानें जो निर्णय जाहीर झाला तेवढ्यावरूनच हिंदू महंतांची लगेच धांवपळ सुरूं झाली.

महंतांचे पुढारी श्री. **हरिहरनाथगिरी** यांनी इ. स. १९५० सालीं

सदर बिलावर विधानसभेंत चर्चा करण्याचा अधिकारच नाहीं. या मुद्यावर विधानसभेविरुद्ध वरिष्ठ न्यायालयाकडे अपिल केलें. त्याचा निर्णय लवकर लागेना म्हणून स्मरणार्थ पुन्हां ५।२।१९५३ सालीं अपिल केले. तोपर्यंत बुद्धगया मंदीराचा ताबा महतांनीं सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याच्या सबबीवर सोडला नाहीं.

## अंतिम सत्य अहिंसेचाच विजय

बौद्ध प्रतिनिधींनीं मात्र आपल्या प्रयत्नांत बिलकूल कसूर केली नाहीं. त्यानीं मोठ्या संयमानें नि दीर्घ चिकाटीनें हें आंदोलन चालू ठेविलें. हिंदू-महतांच्या हीन कट-कारस्थानाशीं टक्कर देऊन तसेंच सहानुभूतीशून्य अशा प्रचलित सरकारचा निर्भयपणें पाठपुरावा करून; पूर्ण ६८ वर्षे हें न्याय्य आंदोलन चालू ठेवलें. इतक्या प्रदीर्घ कालावधींत सत्य, अहिंसा या बौद्ध धर्मीय अमर तत्त्वांवर लक्ष केंद्रित करूनच, बौध्द प्रतिनिधी आत्मविश्वास पूर्वक यशाची मार्गप्रतिक्षा करीत होते. यांत मुळींच शंका नाहीं.

अखेर याच तत्त्वांचा विजय होऊन आशिया खंडाचें नव्हें, तर अखिल जगांतील पददलितांचें चेतनकेंद्र असें "**बुद्धगया मंदिर**" बिहार सरकारनें दि. २८ मे १९५३ रोजीं, वैशाख पौर्णिमेच्या शुभमुहुर्तावर आंतरराष्ट्रीय विद्वानांच्या समक्ष आणि बौद्धांच्या मुक्तकंठ त्रिपिटीकेच्या शांतिमहाघोषणेंत, **सदर मंदिर हिंदू** महतांच्या ताब्यांतून घेऊन ते बौद्ध-हिंदू या संयुक्त समितीच्या ताब्यांत दिल्याची जाहीर घोषणा केली आणि तेव्हांपासून पूर्ववत् **बुद्धगया** हें क्षेत्र बहुजनपिडीत मानवांना सुख-शांति आणि अहिंसेचा ध्वनी ऐकविण्याचें कार्य करूं लागलें. "

ही माहिती तेथील मार्गदर्शकाकडून ऐकत असतां आम्हीं इतकें तन्मय होऊन गेलों होतों कीं, तीन-साडेतीन तास केव्हां निघून गेलें हें समजलेंहि नाहीं. त्वरीत आम्ही आमच्या मोटारींत बसून स्टेशनवर आलों. भोजन वगैरे विधी आटोपून डेहराडून एक्स्प्रेसनें कलकत्याच्या मार्गास लागलों.

**कलकत्ता :** **गुरुवार दि. २७**

आज सकाळीं ठीक ६–४५ वा. आमची " डेहराडून एक्स्प्रेस " कलकत्त्याच्या हावडा स्टेशनवर आली. स्नानादिविधी आटोपून आम्हीं स्टेशनबाहेर पडलों. तों समोरच आम्हांला अजस्त्र असा " **हावडा ब्रीज** " नांवाचा लोखंडी पूल दृष्टीस पडला. मोठ्या औत्सुक्यानें आम्हीं सर्वजण त्याकडे धांवलों–सदर पूल हा हुगळी या महानदीवर लोखंडी खांबांच्या सागाड्यावर अधांतरी उभारला आहे. नदीच्या या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत मध्यभागीं त्याला कसलाहि आधार नाहीं. यामुळें हा पूल म्हणजे भारतांतील एक आश्चर्यच समजलें जातें. हा लोखंडी पट्टयाचा सुमारें २०० फूट उंचीचा नि सुमारें सात फलांग लांबीचा लोखंडी भव्य सांगाडा पाहून मन थक्क होऊन जाते.

या पुलावरून पलिकडे आम्हीं कलकत्ता शहरांत गेलों. फिरण्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य असल्यानें आम्हीं बौद्धधर्मीय १०–१५ जण प्रथम जपानी बौद्ध मंदिर, महाबोधि मंदिर, तिबेटी मंदिर या बुद्धमंदिरास भेटी देऊन प्रत्येक स्थळीं त्रिशरण पंचशिला या प्रार्थना घेतल्या. त्यानंतर शहर पाहण्यास पायींच निघालो.

हें शहर मुंबईपेक्षांहि अवाढव्य नि भव्य वाटलें. लोकसंख्या सुमारें ७० लक्षांवर असून येथील इमारती मुंबईपेक्षां फारच विस्तृत नि भव्य म्हणजे १४–१५ मजल्यांच्या आढळल्या. रस्त्याची स्वच्छता नि सुसज्जता, दुकानांची भव्यता नि आकर्षकता, घरांची आधुनिकता नि सौंदर्यपूर्ण रचना ही जितकी चित्ताकर्षक वाटली. त्याबरोबरच कांहीं भागांत गरीब मजुरांच्या ठिकठिकाणीं झोपड्यांच्या मोठाल्या वसाहती पाहून मनाला एक प्रकारची उद्विग्नताहि वाटल्याशिवाय राहिली नाहीं.

अशा अवस्थेत आम्हीं संध्याकाळीं ५ वा. स्टेशनवर आलों. यावेळीं सूर्य मावळून अंधार पडत चालला होता. रात्रीं भोजन करून, आमच्या नेहमीच्या निवासस्थानीं (बोगींत) झोंपलों.

**कलकत्ता** **दि. २८**

आज कलकत्ता शहरांतच सायंकाळपर्यंत वास्तव्य असलें तरी नेहमी-पेक्षां आज आम्हीं लवकर उठून प्रार्तविधि उरकून घेतला. कारण आमची बोगी स्टेशनांतील जागेच्या टंचाईमुळें तेथून ६ मैल दूर असलेल्या सांत्राकाझी स्टेशनवर सोडण्यासाठीं जाणार होती. त्यामुळें भोजनाचें साहित्य नि आमचें आवश्यक तें सामान बाहेर घेऊन, आम्ही स्टेशनबाहेर आलों. तों तेथें अगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. च्या बसेस उभ्या होत्या. त्यांत बसून शहर पाहण्यास निघालों. आज सायंकाळपर्यंत जैनमंदिर, कालिमाता मंदिर, इडन गार्डन, सचिवालय, वुईल्यम किल्ला, म्युझियम, मार्बल पॅलेस, व्हि. मेमोरियल, बेलूरमठ, टिप्पुसुलतात मॉक्स, राजमलिक बहादूर यांचा राजवाडा, जकेरिया मशीद इत्यादि स्थळांना धांवत्या भेटी देऊन स्टेशनवर आलों आणि रात्री ठीक ८–४५ वा. पूर्वरेल्वेच्या "हावडा-पुरी एक्स्प्रेसला" आमची बोगी जोडली गेली नि आमच्या पुढच्या प्रवासास सुरवात झाली.

**कटक** **शनि. दि. २९**

सकाळीं ठीक ६ वा. कटक स्टेशनवर उतरून, अगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बसनें प्रथम भुवनेश्वरला गेलों. तेथें 'उदयगिरी' टेकडी-वरील जैन लेणी, खंडगिरी स्टेशनवरील बौद्धलेणी, त्यानंतर म्युझियम, लिंगराजमंदिर, मुक्तेश्वर मंदिर, सिद्धेश्वर मंदिर इत्यादि प्रमुख स्थळांना धांवत्या भेटी देऊन, पूर्ववत् स्टेशनवर आलों. रात्रौ ठीक ८–७ वाजतां आमची बोगी दक्षिण पूर्व रेल्वेच्या 'आसनसोलपुरी' फास्ट पॅसेंजरला जोडली गेली. नि आम्हीं निद्रेच्या आधीन झालों. त्या गाडीनें आमच्या बोगीस रात्रौ ११–१० वा. पुरी स्टेशनला सोडून ती पुढें गेली. आम्हीं सकाळीं ५ वाजेपर्यंत तसेंच झोपून होतो.

**पुरी** **रविवार दि. ३०**

आम्हीं नेहमीप्रमाणें सकाळीं उठून नि स्नानादि विधी आटोपून पुरी

शहरांत फिरावयास गेलों. दुपारी ठीक ३–३० वा. आमची बोगी दक्षिण-पूर्व रेल्वेच्या 'पुरी-हैद्राबाद' फास्ट पॅसेंजरला जोडली गेली, नि आम्हीं प्रवासाच्या मार्गक्रमणास लागलो.

**वॉल्टेर** सोमवार दि. १

आज सकाळीं ठीक ७–१० वाजतां, वॉल्टेर स्टेशनवर उतरून प्रत्येक जण वैयक्तिक जबाबदारीवर शहर पाहण्यास गेले, हे शहर पूर्वी आंध्र राज्याची राजधानी होती. शहरांत गेल्याबरोबर "आंध्र राज्य भाषिक तत्वावर स्वतंत्र करण्यास ज्यांनीं आपलें बलिदान केलें, त्या **श्री पोटी रामल्लू**" ह्या हुतात्म्याचें स्मरण झाल्याशिवाय राहिलें नाहीं. त्याचें जन्म स्थान तेथून ४ मैलावर असल्याचे चौकशीअंतीं समजलें. सदर शहरांत विजगापट्टणचा जहाज बांधणीचा भव्य कारखाना, आंध्र विश्वविद्यालय आदि प्रमुख स्थळें पाहून स्टेशनवर आलों. भोजनादि कार्यक्रम उरकून तेथेंच विश्रांति घत पहुडलों. रात्री ठीक ११–४५ वाजतां आमची बोगी दक्षिण रेल्वेच्या "वॉल्टेर–मद्रास" पॅसेंजरला जोडली गेली. आम्हीं मात्र निद्राधीन अवस्थेंतच होतों.

**विजयवाडा** मंगळवार दि. १ नोव्हेंबर

दुपारीं ठीक २–३० ला आम्हीं विजयवाडा रेल्वे स्टेशनवर उतरून, आगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बसनें प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. विशेषत: लोयाला कॉलिज आणि न्यू कृष्णा पूल, दुर्गामाता मंदीर हे पाहून स्टेशनवर आलों आणि भोजनादि कार्यक्रम उरकून घेतले. रात्रीं ठीक ९–३० वाजतां सेंट्रल रेल्वेच्या 'पुरी-हैद्राबाद' फास्ट पॅसेंजरला आमची बोगी जोडली जाउन पुढचा प्रवास निर्वेधपणें सुरू झाला.

**हैद्राबाद** बुधवार दि. २ नोव्हेंबर

आमची गाडी हैद्राबाद स्टेशनवर सकाळीं ठीक ८ वाजतां आली. गाडींतून उतरून बाहेर आलो तो तेथें आगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी

आमचीच मार्ग प्रतिक्षा करीत उभ्या होत्या. त्यांत बसून प्रथम इतिहास-प्रसिद्ध गोवळकोंड्याच्या किल्यावर गेलो. तो पाहून नंतर क्रमशः सिकंदराबाद शहर, चार मिनार, मक्कामशिद, म्यूझियम, उस्मानिया विद्यापिठ-टाऊन हॉल, भीमसागर, हिमायतसागर, ज्युबिली हॉल, इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहून, संध्याकाळीं स्टेशनवर आलों. भोजन करून सायंकाळीं ६–४५ वाजतां सेंट्रल रेल्वेच्या 'सिकंदराबाद–वाडी' एक्सप्रेसनें पुढील प्रवासास लागलों. सदर एक्सप्रेस गाडीनें आमच्या बोगीस वाडी या स्टेशनवर रात्री ११–३० वाजतां सोडून ती पुढें गेली. नंतर मागाहून आलेल्या सेंट्रल रेल्वेच्या 'रायचूर–पूना' या गाडीनें आमच्या बोगीस बरोबर घेऊन सोलापुरास आणून सोडलें.

**सोलापूर** दि. ३ नोव्हेंबर

सकाळीं ठीक ८ वा. आम्हीं सोलापूर स्टेशनवर उतरून प्रथम स्नानादि प्रातर्विधि उरकून घेतला व बाहेर पडलों. स्टेशनजवळच असलेल्या वृत्तपत्रांच्या स्टॉलवर धांवतच गेलों नि आधाशासारखें मराठीं वृत्तपत्र घेऊन, वाचूं लागलों. कारण आज जवळ जवळ १५–१६ दिवस मराठीं वृत्तपत्र डोळ्यांनींसुद्धां पहावयास मिळाले नव्हते.

नंतर आमच्यातील कांहीजण पंढरपूरास गेलें नि आम्हीं शहर पहाण्यास निघालों. प्रथम भारतीय स्वातंत्र्य चळवळींत म्हणजे सन १९३० मध्यें ज्या चार हुतात्म्यांनीं स्वातंत्र्याकरितां बलिदान केलें. त्या (१) किसन सारडा (२) जगन्नाथ शिंदे (३) मल्लाप्पा धनशेटी (४) कुर्बान हुसेन यांचें रस्त्याच्या मध्यभागीं असलेलें स्मारक पाहिलें त्या स्मारकांस आदरानें अभिवादन करून पुढें गेलों. नंतर भुईकोट किल्ला, सिद्धेश्वर मंदिर, सिद्धेश्वर तलाव, रिपन गार्डन, म्युनि. वॉटर वर्क्स वारद बंगला इत्यादि स्थळें पाहून पूर्ववत स्टेशनवर आलों रात्रौ ठीक ९–२५ वाजतां आमची बोगी सेंट्रल रेल्वेच्या "सिकंदराबाद–पूना" पॅसेंजरला जोडली गेली. नि आम्हीं अंथरुणावर निर्धास्तपणें पहुडलों.

**पुणें** **शुक्रवार दि. ४ नोव्हेंबर**

आज सकाळीं झोपेंतून उठलों तों आमची गाडी ठीक ६–४० वा. पुणें स्टेशनवर उभी. आम्हीं स्नानादि कार्यक्रम उरकले नि आगाऊ रिझर्व्ह केलेल्या एस्. टी. बसमध्यें बसून शहरांत प्रवेश केला तेथील बंडगार्डन, शिंदे छत्री, पर्वती, पेशवे उद्यान, शनिवारवाडा, शिवाजीचा पुतळा, राणी-लक्ष्मीबाईचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, वेधशाळा, इंजिनियरिंग कॉलेज, फुले मार्केट, इत्यादि स्थळांना धांवत्या भेटी देऊन, रात्री स्टेशनवर आलों. भोजनादि कार्यक्रम उरकून रात्री ११-४० वा. सेंट्रल रेल्वेच्या "मनमाड–दौंड–मुंबई" पॅसेंजरला आमची बोगी जोडण्यांत आली. नि आम्ही घराच्या वाटेस लागल्याच्या आनंदातच झोपी गेलों.

अशा रीतीनें आम्हीं दि. १७–१०–६० तें ४–११–६० पर्यंत एकूण १९ दि. ची सहल करून दि ५–११–६० रोजीं मुंबईस सकाळी ठीक ६–३० वा. सुखरूप पोहोचलों.

आमचा एकूण प्रवास रेल्वेनें नि एस्. टी. बसनें ५९४२ कि. मी. मोटारनें सुमारें १७० कि. मिटर (१०५ मैल) इतका झाला. त्याचप्रमाणें उत्तर भारतांतील (महाराष्ट्र वगळून) एकूण आठ राज्यांतून आम्ही फिरून आलों त्या राज्यांची नांवें आणि त्या राज्यांतील ज्या गांवीं उतरून तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहिली त्या प्रमुख गांवांची नांवें पुढील-प्रमाणें होत.

| राज्य | प्रमुख स्थळ |
|---|---|
| १) मध्यप्रदेश | भोपाळ, सांची |
| २) दिल्ली | दिल्ली, जुनी दिल्ली |
| ३) उत्तर प्रदेश | हरद्वार, आग्रा, लखनौ, अलाहाबाद, वाराणसी सा. |
| ४) बिहार | पाटणा, गया, |
| ५) बंगाल | कलकत्ता, |
| ६) ओरिसा | कटक, भुवनेश्वर, जगन्नाथपुरी |

७) आंध्र वॉल्टेर, विजगापट्टन, विजयवाडा, हैद्राबाद, सिकंदराबाद.

८) महाराष्ट्र सोलापूर, पुणें

याप्रमाणें इतक्या दूरचा ( माझ्या दृष्टीनें ) नि दीर्घ मुदतीचा प्रवास करण्याचा आयुष्यांतील पहिलाच जरी प्रयत्न असला तरी या प्रवासानें माझ्या ज्ञानांत नि अनुभवांत कमालीची भर पडली आहे यांत मुळीच शंका नाहीं.

मुंबईंत पाय ठेवतांच ज्ञानाचें मोठें गाठोडें घेऊनच परत आल्याचा भास झाला. नि जीवन समृद्ध झाल्याची प्रचिती आली. कारण प्रवासाचे होणारे फायदे नि त्याची महति वर्णन करणारे विचार अनेक विचारवंत पंडितांनीं आपापल्या अनुभवांतून प्रकट केले आहेत. त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला घ्यावयास मिळाल्यानें कृतार्थ झाल्यासारखें वाटले. कारण प्रवासाद्वारे मनुष्य जितका भूमिभाग दृष्टिच्या योगानें आपलासा करितो; जितके अंतर पादाक्रांत करतो; जितका अनुभव सांठवितो तितक्या अंशांनी त्याचें जीवन समृद्ध होतें.

प्रवासी जसा जसा प्रवास करतो तसा तसा तो चातुर्याचा सांठा वाढवित जातो, चिकाटी नि उदारता शिकतो आणि अंतीं तो एक उत्कृष्ट समाजशास्त्री बनतो. एका दृष्टीनें प्रवास हें व्यक्तित्वाच्या विकासाचे साधन आहे यांत मुळींच संशय नाही. कारण प्रवाशाचें अंगिकृत कार्य जें अज्ञातामागें धांवणें, त्याचा अनुभव घेणें, त्याच्यावर विजय मिळवून, त्याला ज्ञात करणें हा जीवनांतील मोठ्यांतला मोठा आनंद आणि उत्कृष्ट पौष्टिक खुराक आहे. तें प्रवास केल्यानेंच साध्य होतें. दुसरें असें कीं, जितका देश आपण पाहिला, निरीक्षिला, आपलासा केला तेवढ्या प्रदेशाविषयीं आपल्यांत विशिष्ट भावना उत्पन्न होते. त्या प्रदेशाशीं आपली आत्मीयता बांधली जाते. त्याच्यासंबंधीं अभिमान किंवा भक्ति उत्पन्न होते. आणि त्यामुळें आपण त्याचे अनन्य भक्त बनतों. एखाद्या प्रांताचा प्रवास करून आल्यानंतर वर्तमानपत्रांत येणाऱ्या तिथल्या समा-

चाराविषयीं केवढी आस्था वाटूं लागते. किती आत्मीयतेनें तेथील वृत्त आपण वाचतो याची अनुभूती त्या प्रवाश्यालाच येते.

परंतु प्रवासी व्यक्ति जितकी अधिक निस्पृह, निराग्रही नि निरहंकारी तितकी तिला प्रवासामधून जास्तीत जास्त संस्कारिता लुटता येईल. म्हणून प्रवासाला निघतेवेळी प्रत्येकानें निर्विकार मनानें नि केवळ ज्ञानलालसेनें प्रवृत्त होऊनच प्रवासाच्या वाटेला लागावे. तरच वामन पंडितानें म्हटल्या-प्रमाणें ' केल्यानें देशाटन पंडितमैत्रि सभेंत संचार। शास्त्र–ग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ॥ ' याचा अनुभव त्या प्रवाश्याला येऊ शकेल.

## भाग दुसरा

# बौद्ध-तीर्थ दर्शनापासून झालेला आत्मबोध

मुंबई महापालिका शाळाखात्यांतून कांही शिक्षकांनीं उत्तर भारतांत सहलीस जाण्याचा विचार केला ही बातमी समजतांच मी सहल चिटणीसांची भेट घेऊन, सहलींच्या स्थळांची यादी पाहिली. यादींत फत्तेपूरशिक्रीचा किल्ला, आग्ऱ्याचा किल्ला, जगप्रसिद्ध ताजमहाल, लालकिल्ला, भारताची राजधानी दिल्ली इत्यादि ऐतिहासिक स्थळें पहाण्याचा योग लाभणार याबद्दल माझ्या शिक्षक पेशाच्या दृष्टीनें हर्ष तर वाटलाच, परंतु प्रारंभीं सांगितल्याप्रमणें सहस्र पटीनें हर्ष जर कोणती नांवें वाचून झाला असेल तर ती म्हणजे सांची, सारनाथ नि बुद्धगया ही होत.

आणि ते स्वाभाविकहि होते, कारण यापूर्वींच मी मुंबई येथें दि. २६ जानेवारो १९५७ या प्रजासत्ताकदिनीं माझ्या पूर्वाश्रमीच्या लाखों अस्पृश्य बांधवांसमवेत चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या हिंदु धर्माचा त्याग करून; समतेवर आधारलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. तेव्हांपासून या बौद्ध धर्माबद्दल मोठ्या अधिरतेनें मिळेल ते तें वाचले नि ऐकलें; परंतु कां कोण जाणें मनाचें समाधान असें होत नव्हते. जिज्ञासा मात्र दिवसेंदिवस म

धम। वत होती.

तत्वज्ञ अशा या बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाची लालसा मनांत घर करून आणि ी असतांनाच ' ज्यास्थळीं किंवा ज्या ठिकाणीं त्या धर्माची कायम पड रूपाची स्मारकें आहेत त्यास्थळीं जाऊन त्यांपासून कांहीं बोध झाला तर आपल्या मनांतील गोंधळ दूर होण्यास मदतच होईल, ' अशा अपेक्षेनें मी आर्थिक विवंचनेसारख्या अडचणींची पर्वा न करता, सदर सहलीस जाण्यास मोठ्या उत्सुकतेनें तयार झालों नि त्याप्रमाणें दि. १७।१०।६० ते दि.

५।११।६० पर्यंत एकूण एकोणीस दिवसांचा प्रवास करून, अपेक्षित ज्ञान-प्राप्तीसह परत आलो.

एकूण प्रवासांत जी अनेक ऐतिहासिक, भौगोलिक नि धार्मिक स्थळें पाहिलीं त्यापैकीं **सांची, सारनाथ** व **बुद्धगया** या बुद्ध धर्मीय तीर्थ-स्थानांचेंच मी सूक्ष्म निरीक्षण केलें आणि त्याबद्दलची विस्तृत माहिती 'धर्मयान' मासिकांतून एकूण सात लेखांत दिली आहे. अर्थात त्या स्थळांच्या निरीक्षणासाठीं मला निर्दोष दृष्टीची आवश्यकता होती. तीहि अडचण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या '**बुद्ध आणि त्याचा धर्म**' या ग्रंथानें दूर झाली. नव्हे माझ्या अधु नयनांना तो एक सूक्ष्मदर्शक निर्मळ चष्माच लाभला यांत मुळींच शंका नाहीं. त्या ग्रंथरूपी चष्म्याच्या योगानें मी या तिन्ही बौद्ध तीर्थस्थानांचें निरीक्षण, परीक्षण नि अवलोकन करूं शकलो. त्यायोगे बौद्धधर्माच्या तत्वज्ञानाचें कांही अंशीं जे परीशीलन केलें त्यामुळे माझ्या मूळच्या गोंधळलेल्या मनःस्थितीचे अज्ञानपटल दूर होण्यास बऱ्हंशी मदत झाली.

या तिन्हीं स्थळीं उपलब्ध असलेलें शीलालेख, स्तंभलेख, मूर्ति, त्या त्या स्थळीं प्रसिद्ध झालेली माहितीपत्रकें त्याचप्रमाणें त्या स्थळीं वास्तव्य करून राहिलेल्या भिक्खू गणांशीं केलेली चर्चा इत्यादीवरून बऱ्याचशा ज्ञानाची उकल मला त्यास्थळीं होऊं शकली. म्हणूनच आरंभी म्हटल्या-प्रमाणें या माझ्या बौद्धतीर्थाटनामुळें माझ्या अपेक्षित आकांक्षा अंशतः सफल होऊं शकल्या.

## तीर्थाटनाचा उद्देश

बौद्ध धर्मानुयायी व्यतिरिक्त इतर धर्मीय भाविक जे तीर्थ स्थ[illegible] जातात, ते काल्पनिक ईश्वराच्या निष्ठेनें नि कांहींतरी मनांत स्वार्थ[illegible] बाळगून जातात. तीर्थाटनास जाणाऱ्यांत विशेषतः हिंदू धर्मीय देवभ[illegible] भाविक 'कोणत्याहि वाममार्गी वागणुकीबद्दल देवानें आम्हांस क्षमा करावी नि निष्क्रिय राहूनहि सुखसमृद्धी द्यावी' अशी अभिलाषा बाळगून ते तीर्थस्नानी जातात. तेथें गेले कीं, देवाला नवसाची लालूच दाखवून, त्या

सुखाचें अभिवचन मिळालेंच अशी मनाची समजूत करून घेऊन पावन झाल्याचें समाधान मानतात.

त्याचप्रमाणें तीर्थस्थानीं असलेल्या एकाद्या नदींत स्नान केलें कीं, केलेल्या सर्व बऱ्यावाईट पापकृत्यांचा निचरा होतो अशी भावडी समजूत करून घेऊन पुढें पूर्ववत् त्या स्थळीं येण्याच्या काळापर्यंत पुन: पापकृत्यें करण्यास मोकळा होतो. आणि अशा पापकृत्यांच्या राशी झटकून टाकण्याची सोय या तीर्थस्थळीं उपलब्ध असल्याची समजूत झाल्यावर, पापकृत्ये करण्याची खंत न बाळगली गेली तरच आश्चर्य !

याच्या उलट बौद्ध धर्माची धारणा नि तत्वज्ञान असल्यानें बौद्ध तीर्थाटनास जाणारा सदर धर्माचा अनुयायी निराळाच हेतू मनांत बाळगून जात असतो. तो आपल्या धर्माच्या तत्वज्ञानाची उजळणी करण्यासाठी जातो. कारण त्याला पूर्ण जाणीव असते कीं, आपल्या भल्याबुऱ्या वागणुकीचे इष्ट–अनिष्ट परिणाम याच जन्मीं आपणास भोगावें लागतील; त्यांचा कर्ता सवरता आपणच. म्हणून तो तीर्थस्थानीं जाऊन, भगवान बुद्धाच्या मूर्तीला साक्षी ठेवून स्वत:च्या बुद्धीलाच आवाहन करतो नि सच्छिल वागणुकीची प्रतिज्ञा करतो. हाच बुद्धधर्म नि इतर धर्माच्या तीर्थस्थानांतील मूलभूत फरक आहे.

## तीर्थाटनांचा माझा हेतू

अर्थात बौद्ध तीर्थाटनास माझा जाण्याचा हेतू काय असेल हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाहीं. कारण आरंभी सांगितल्याप्रमाणें माझ्या मनांत जो गोंधळ निर्माण झाला होता, त्याचे मुख्य कारण सदर बुद्ध धर्माच्या तत्वज्ञानाच्या परस्पर विरोधी विधानांचे नि हिंदूधर्माच्या तत्वज्ञानाशी साधर्म्य असणारे बौद्ध मराठी वाङमय माझ्या वाचण्यांत आलें आणि त्याचे निरसन करून घेण्यासाठीं मला सदर तीर्थस्थळी जाणें भाग पडले.

कारण सदर धर्माबद्दलची माहिती विशेषत: संस्कृत, पाली भाषेंत नि इंग्रजी वाङमयांत भरपूर आहे. मराठी भाषेंत जी कांही हाताच्या बोटावर मोजणारी पुस्तकें माझ्या वाचण्यांत आली. त्यांतील कांहीं पुस्तकांतून तर

हिंदू धर्माप्रमाणें चमत्कारादि विधानांनीं आणि अंधश्रद्धा, पूजा-अर्चा विधि इत्यादि भ्रामक कल्पनांना वाव देणारा मजकूर आढळला; इतकेंच नव्हें तर भगवान गौतमबुद्ध हा विष्णूचा नववा अवतार आहे, हे कटाक्षानें बिंबविण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

त्याचप्रमाणें कांहीं पुस्तकांतून तर भगवान गौतम जन्माला येण्यापूर्वीच त्याची आई राणी महामाया हिला स्वप्नें पडत होती कीं, 'परमेश्वर तिच्या उदरीं जन्म घेणार आहे?' शिवाय त्याचा जन्म लुंम्बिनी बागेंत झाल्यावरोबर त्यानें उभे राहून चारी दिशा अवलोकन केल्या.

तसेच भ. गौतमानें चार दृश्यें (म्हातारा, रोगी, प्रेत व संन्यासी) पाहिल्यानंतर त्याच्या मनावर विपरित परिणाम होऊन, त्यानें गृहत्याग केला. इत्यादि मजकूर वाचण्यांत आल्यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं म्हणजे सन १९५८ मध्यें डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं स्वत: लिहिलेला "बुद्ध आणि त्याचा धर्म" हा इंग्रजी ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांत उपरोक्त सर्व चमत्कारयुक्त नि बुद्धीला न पटणारी विधानें कशी भ्रामक नि फसवी आहेत हें साधार पटवून दिलें आहे, इतकेंच नव्हे तर बौद्धधर्म हा हिंदूधर्माहूनच नव्हे तर जगांतील इतर सर्व धर्माहून कसा वेगळा नि आगळा आहे याचें मनोवेधक विवेचन त्यांत केलें आहे.

अशा भिन्न विचारसरणीच्या प्रवाहांत सांपडल्यानें माझ्या मनांत वैचारिक गोंधळ निर्माण होणें स्वाभाविक होतें नि त्याचेंच निरसन करण्याचा हेतू मनांत बाळगून मी सदर बौद्धतीर्थस्थळीं गेलों आणि बव्हंशीं तो माझा हेतू सफलहि झाला.

## ज्ञानचक्षूंना झालेला अलभ्य लाभ

मी ज्या क्षणीं तीर्थस्थानीं पोहोंचलों नि त्या स्थळाचें दर्शन घडले त्या त्या वेळीं मनांत अनेक विचारतरंग उमटूं लागले. विशेषत: बुद्धगया येथें जवळच वाहत असलेली निरंजना नदी नि मंदीराच्या पश्चिमेस डौलानें डोलत असलेला विशाल बोधिवृक्ष पाहून मुखांतून सहजोद्‌गार बाहेर पडले कीं, "भ. गौतमबुद्धानें या जवळच्या उरवेला जंगलांत, हिंदूधर्म-शास्त्राच्या आधारें महापंडित **आडारकालाम** आणि **रुद्रातरामपुत्र या**

शास्त्रनिपुण पंडितांच्या मार्गदर्शनाखालीं पूर्ण ६ वर्षे तपश्चर्या करून ईश्वर प्राप्तीचा नि मानव सुखाचा मार्ग चोखाळला. परंतु त्यांत त्याला अपशय आल्यामुळें त्या मार्गाचा त्याग करून भ. बुद्धानें याच वृक्षाखालीं बसून ज्या ज्ञानाची प्राप्ती करून घेतली नि त्या ज्ञानाच्या मध्यबिंदूपासून नवीन मानवी धर्माची उभारणी केली ती याच स्थळीं नव्हे कां ? ”

“ चांगल्या कृत्यापासून चांगलें नि वाईट कृत्यापासून वाईट निर्माण होतें. ” आणि हाच जीवनाचा खरा मार्ग असून, त्यासाठीं शुद्धतेचा, सदाचाराचा नि सद्‌गुणाचा मार्ग या तिहींचें मानवानें कांटेकोर पालन केल्यास त्याला दुःखापासून मुक्त होतां येईल. असें भ. गौतमानें निर्धारपूर्वक सांगितलें तें याच पवित्र भूमीवर ना ?

या जगांत ईश्वर नाहीं. हें जग ईश्वरनिर्मित नाहीं तसेंच वेद हे अपौरुषेय नि सर्वप्रमाणभूत नाहींत असें स्वानुभवाच्या जोरावर भ. गौतमबुद्धानें जी निर्धारपूर्वक घोषणा केली ती याच सुप्रसिद्ध बोधिवृक्षाखालीं ना ?

त्याचप्रमाणें जगाला शांति, मैत्री, नि अहिंसा या त्रयींचा महामंत्र ज्या स्थळांवरून उद्‌घोषित केला तद्वतच एकता, समानता, आणि विश्वबंधुत्व ही जगाच्या दाही दिशा अद्याप दरवळून टाकणारा भ. गौतमबुद्धाचा दिव्य संदेश आणि त्याच्या त्या ज्ञानप्राप्तीचा ज्या तपोभूमीनें भारताच्याच नव्हे तर सर्व जगाच्या संस्कृतीचें एक नवें पर्व तयार होऊन, अज्ञान अंधःकारांत पिचत असलेल्या पददलितांवर नवा प्रकाश टाकण्याचें महत्‌कार्य केलें ती तपोभूमि हीच ना ?

अशा तऱ्हेनें अनेक विचारतरंग माझ्या मनांत डोकावून गेलें नि मी त्या भावनेंनूनच तेथील स्तंभलेख, शिलालेख मंदिरें, मूर्ति व त्यावर कोरलेलें तत्वज्ञान यांचे निरीक्षण करूं लागलों आणि सदर निरीक्षणांतून या धर्माच्या बऱ्याच तत्त्वज्ञानाची मला उकल होऊं शकल्यानें, हा एक प्रकारें अलभ्य लाभ झाल्याचें समाधान वाटलें.

त्याचप्रमाणें या तिन्हीं तीर्थस्थळांच्या निरीक्षणांतून माझ्या एका शंकेचें निरसन अगदीं सहजगत्याच होऊं शकलें आणि ते म्हणजे डॉ. बाबासो

आंबेडकर यांनीं आपल्या स्वतःसाठीं नि अखिल पिळल्या गेलेल्या पददलित मानवासाठीं याच धर्माची निवड नि शिफारस कां केली ? याचें मर्म त्वरित उमगले आणि अस्पृश्यांच्या चळवळीच्या इतिहासाचा संपूर्ण चित्रपट नजरेपुढें झर झर सरकूं लागला.

**बाबासाहेबांचे कार्य**

बुद्धगया या स्थळीं आलों. या स्थळाचें सर्वत्र फिरून निरीक्षण केलें नि विश्रांतीसाठीं ज्या वृक्षाखालीं भ. गौतमाला बौद्धधर्माचें ज्ञान प्राप्त झालें त्या बोधिवृक्षाच्या छायेंत येऊन बसलों. त्यावेळीं उपरोक्त प्रश्न माझ्या डोक्यांत निर्माण झाला नि त्यावर विचारचक्र सुरूं झाले. ज्या क्षणीं हे विचार माझ्या मनांत उद्भवले. त्यावेळीं डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा गेल्या तीस वर्षाचा इतिहास माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला त्यांच्या चळवळीचें मुख्य सूत्र "अस्पृश्यादि पददलितांना सामाजिक गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त केल्याशिवाय त्यांच्या आर्थिक उन्नत्तीचा मार्ग सुकर होणार नाहीं." ते सूत्र हातीं धरून त्यांनीं ह्या वर्गाच्या परि-स्थितीचा सखोल अभ्यास करून मोठ्या परिश्रमानें रूढींच्या दडपणासाठीं पिचत पडलेल्या निद्रींत समाजाला प्रथम जागृत केलें आणि गुलामाला आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली कीं तो आपल्या गुलामगिरीच्या बेड्या तोडण्यास प्रवृत्त होतो. या ऐतिहासिक सत्याच्या जाणीवेंतून डॉ. बाबासाहेबांनीं अस्पृश्यादि पददलितांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देऊन, त्यांची अभेद्य अशी संघटना निर्माण केली.

त्यानंतर या सर्व संघटित पददलितांना घेऊन ते या समाजाच्या उद्धा-राचा मार्ग शोधू लागले. त्यांतून त्यांना हाच अनुभव आला कीं या समाजाची उन्नत्ति सर्वस्वी हिंदूधर्मानें रोखून धरली आहे. या धर्मातून बाहेर पडल्या-शिवाय तरणोपाय नाहीं. याची पुरेपूर खात्री पटल्यानंतर त्यांनीं स्वतः या धर्माचा त्याग केला नि सामाजिक नि आर्थिक समतेवर आधारलेल्या बौद्धि धर्माचा अंगिकार केला. त्याचप्रमाणें आपल्या समवेत सर्व पददलितांनीं आत्मोन्नतिप्रित्यर्थ या धर्माचा स्विकार करण्याची जाहीर शिफारस केली.

हें धर्मांतर करण्यापूर्वीं डॉ. बाबासाहेबांनीं हिंदूधर्म सुधारणेचे नि

धर्मावर स्वार्थबुद्धीनें ज्यांचे वर्चस्व आहे, अशा सनातनी ब्राह्मणांचे मतांतर घडवून आणण्याचें अनेक प्रयत्न करून पाहिले. सभा परिषदांमधून ठराव केलें; आपल्या विद्वत्ताप्रचुरवाणीनें हृदय पिळवटून टाकणारी भाषणें केलीं. वृत्तपत्रांतून लेख लिहिले. मानवी समाजाच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करून अनेक ग्रंथ लिहिले परंतु पुरातन बुरसटलेल्या विचारांच्या प्रतिगामी सवर्ण हिंदूचा विशेषत: ब्राह्मण वर्गाचा यत्किंचितही हृदयपालट होऊं शकला नाहीं. त्यामुळेंच त्यांचा नाईलाज होऊन त्यांना धर्मांतर करण्याशिवाय अन्यमार्ग उरला नाहीं

अशा तऱ्हेनें पृथ्वीतलावर आदि मानवाची रचना निर्माण झाल्यापासून तो आजच्या विसाव्या शतकापर्यंतच्या समाजरचनेचें विश्लेषण अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या अनुरोधानें डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं अति हृदयंगमपणें केले आहे. त्यासाठीं त्यांनी किती वेद-पुराणें, सूत्रें आणि अस्पृश्यतेवरील देशी-विदेशी ग्रंथ पालथे घातलेले असतील याची कल्पना या उपरोक्त ग्रंथांतील अफाट संदर्भावरून सहज येते.

अस्पृश्य लोक गांवाबाहेरच कां राहतात? ब्राह्मणांनीं कधीकाळीं गोमांस भक्षण केले काय? ते शाकाहारी कां बनले? आणि अस्पृश्यतेचे मूळ कोणते? ह्या खळबळजनक प्रकरणाचे विवेचन करतांना, मोठमोठ्या संशोधकांना सांपडणार नाही अशी माहिती देऊन वाचकांस विचारमुग्ध व्हावयास लावले आहे. परंतु दुर्दैव या हिन्दू धर्माचे नि त्यांच्या अनुयायांचे कीं, त्यांच्या बुरसटलेल्या डोक्यांत हे असले मौलिक नि प्रगमनशील विचार शिरूं शकले नाहींत.

## सनातनी हिंदूंचा दुराभिमान

वास्तविक जगांतील कोणत्या धर्मात नसलेला अस्पृश्यतेचा काळाकुट्ट कलंक फक्त भारतातच, नि तोहि हिंदूधर्मातच पहावयास सापडतो. तो कलंक जगांतील मानवांच्या उन्नतावस्थेकडे लक्ष देऊन धुवून काढण्यासाठीं आणि आपली बेअब्रू टाळण्यासाठीं वास्तविक सवर्ण हिंदूनीच पुढें यावयास हवें होते. परंतु तें कार्य डॉ. आंबेडकरांनीं मोठ्या परिश्रमाने केले. याबद्दल हिंदुधर्मीयांनीं त्यांना कृतज्ञबुद्धीनें साथ देणे क्रमप्राप्त होते परंतु त्यांच्या

कार्याचें मर्म सनातनी ब्राह्मणांना "त्यांचे समाजांतील श्रेष्ठत्व नि सत्ता" या स्वार्थापायीं उमगू शकलें नाहीं. त्यामुळें हल्लींच्या पुढारलेल्या विज्ञानयुगांत नि जगाच्या निकटवर्ती संयोगामुळे त्या धर्माचा अज्ञानपणातर जगाच्या निदर्शनास आलाच, परंतु त्याचा ऱ्हास उत्तरोत्तर कसा अटळ होत चालला आहे ; याची या दुराभिमानी कुपमंडूक वृत्तीच्या हिंदूना खंतही नाहीं. हे त्या धर्माचें नि पर्यायानें ह्या देशाचें दुर्भाग्यच होय.

## हिंदूधर्म सुधारणेचे अखेरचे प्रयत्न.

हिंदूधर्म सुधारणेचे हें राष्ट्रीय कार्य डॉ. बाबासा. आंबेडकर करीत असतां सवर्ण हिंदूकडून त्यांना साथ मिळणेऐवजी त्यांचा अनन्वित छळ मात्र इतका झाला कीं, त्याला इतिहासांत तोड नाहीं. तरीपण ते निराश झाले नाही तर त्यांना आपल्या कार्यात यश येण्यासारखे अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचा भास झाला, तो म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्यांत जन-जागृती झाल्याचा.

कारण राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनांत भारतीय जनतेच्या मनांत राष्ट्रीय दृष्टिकोनाचा प्रादुर्भाव निर्माण झाला होता. त्यांच्या ठायीं वास करून राहिलेल्या संकुचित जातीधर्माचा पगडा कमी झाल्याचें वातावरण निर्माण झाले होते. कारण या देशांतील सर्व जातीधर्माचे लोक राष्ट्राभिमानानें प्रेरीत होऊन संघटितरित्या स्वातंत्र्यलढ्यांत सामील झाले होते आणि त्यांनी या संघटनेच्या जोरावर सुमारें दिडशेंवर्षे ब्रिटीशांच्या गुलामींतून आपली सुटका करून घेतली होती.

अशा या वातावरणांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशांतील जनतेबद्दल आशा वाटू लागली होती कीं, स्वातंत्र्य आंदोलनांतून तावून-सुलाखून निघालेली ही जनता विशेषत: या देशांतील बहुसंख्य हिंदूसमाज, मिळालेलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं नि राष्ट्राचा उत्कर्ष करण्यासाठीं केवळ राष्ट्रहिताकडे नि त्यांतील जनतेच्या भरभराटीकडे लक्ष देऊन, या राष्ट्रोन्नती रोखून धरणाऱ्या अशा या हिंदूधर्मांतील कपोलकल्पित चातुर्वणाची पकड नि त्यांतून निर्माण झालेल्या शेंकडों जातीजमाति नष्ट करण्यास ही वेळ योग्य आहे, अशी डॉ. आंबेडकरांची समजूत होऊन त्यांनीं अगदीं

अलिकडे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, दिल्ली पार्लमेंटमध्ये तत्वशुद्ध असे हिंदू **कोडबिल** आणून, त्या धर्माच्या सुधारणेच्या दृष्टीनें नि राष्ट्रहिताला बाधक ठरणाऱ्या विक्षिप्त व चमत्कारिक रुढी रीतिरिवाज नि सामाजिक विषमता यांवर कायद्यानें बंधन यावे; म्हणून अखेरची संधि या राष्ट्रांस नि विशेषत: हिंदूधर्मीयांस आणून दिली होती. परंतु दुर्दैव या धर्माचें नि राष्ट्राचें कीं, बुरसटलेल्या पुराणमतवादी हिंदूधर्मीयांनीं आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर ते बिल डावलून आपल्या धर्माची बदनामी–संस्कृतींत भर घालण्यासच उलट मदत केली.

## मानवतावादी धर्माकडे

अशा रीतिनें डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं या दिंदूधर्माच्या सुधारणेकरितां आपल्या आयुष्याची अमूल्य अशी २५-३० वर्षे फुकट खर्ची घातली. त्याचा कांहींच परिणाम होऊं शकला नाहीं. म्हणून आपल्या कोट्यावधि पद–दलित समाजाच्या हितासाठीं नि या राष्ट्राच्या भवितव्यासाठीं त्यांना योग्य असा मार्ग चोखाळावा लागला. जो धर्म आपला अकारण छळ नि अव्हेर करतो त्याचाच त्याग केल्याशिवाय या पददलित सामाजाचें भवितव्य यापुढें कधींच उज्वल होऊ शकणार नाहीं अशी ठाम समजूत करून घेऊन, त्यांनीं जगांतील प्रचलित सर्व धर्मांचा सखोल अभ्यास केला नि अखेर त्यांच्या तैलबुद्धीतून त्यांना पददलितांच्या हिताचा सर्वंकष असा **बौद्धधर्म** सांपडला. नि लगेच त्यांनीं स्वत: दि. १४, ऑक्टो. १९५६ रोजीं नागपूर मुक्कामी आपल्या लाखों अनुयायांसह विषमतेनें बरबटलेल्या नि कोट्यावधि पददलितांची कायमची प्रगति रोखून धरणाऱ्या अशा प्रतिगामी हिंदूधर्माचा त्याग करून, मानवतावादी बुद्ध धर्माची दीक्षा घेतली.

## हिंदूधर्मावर उपकार

अशा तऱ्हेनें "वाईटांतून चांगले" या उक्तिप्रमाणें हिंदूधर्मीयांनी जर डॉ. बाबासाहेबांचा नि त्यांच्या समाजाचा छळ केला नसता तर या उज्वल बौद्धधर्माचें संशोधन नि पुनर्जीवन होऊं शकले नसतें. कारण याच देशांत निर्माण झालेला, परंतु सनातनी ब्राह्मणांच्या कुटील कारस्थानांमुळें कांहीं शतकें देशांतून नष्टप्राय झालेला नि समतेवर आधारलेला मानवतावादी

असा बौद्धधर्म आपल्याच भूमीत परत कधीं येऊच शकला नसता या कार्यामुळें या देशांतील कोटयावधि पददलितांच्या उद्धाराचा मार्ग तर मोकळा झालाच; परंतु अधिक प्रशंसनीय बाब जर कोणती झाली असेल तर ती ही कीं, जातीय विषमतेनें कलंकीत झालेल्या हिंदूधर्माचा कलंक धुवून काढण्यासही यामुळें एका परीनें हातभार लागला आहे, हें त्या धर्मावर कायमचे उपकार झाले आहेत असे म्हटल्यास त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

## अस्पृश्यतेचा उगम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं आपल्या अचाट बुद्धीमत्तेच्या आधारें हिंदूधर्मशास्त्राचा, जगांतील इतर धर्मांचा आणि मानवता समाजाच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केला. या संशोधनांतून "अस्पृश्यता" कशी नि कोणी निर्माण केली, याचें साधार विवेचन आपल्या **'अस्पृश्य मुळचे कोण?'** या ग्रंथांतून जाहीर करून सवर्ण हिंदूंना आजपावेतों निरुत्तर करून टाकलें आहे. या त्यांच्या संशोधनांतून त्यांनीं सवर्ण हिंदूंना पुढीलप्रमाणें आव्हान केले आहे कीं, :—

(१) वंशाच्या दृष्टीनें पाहिल्यास सवर्ण हिंदूंत आणि अस्पृश्यांत कांहींच फरक नाहीं.

(२) अस्पृश्यता निर्माण होण्यापूर्वीं हिंदू व अस्पृश्य यांच्यामधील फरक **जेते** आणि **जीत** यांमधील फरकाप्रमाणें होता. नि पुढें पुढें **जित** टोळीला अस्पृश्य समजण्यांत आले.

(३) अस्पृश्यतेस जसा वंशाचा आधार नाहीं तसा धंद्याचा देखील आधार नाहीं.

(४) बाहेरून आलेल्या आर्यांचे अनार्यांशीं झालेल्या लढाईत पराभव पावलेल्यांपैकीं जे **जित** (ब्रोकन मॅन) ते सर्व बुद्धधर्मीय होते; ते आर्यांचा पर्यायानें हिंदूचा धर्म स्विकारण्यास तयार होईनात म्हणून ब्राह्मणांनी त्यांचा तिरस्कार नि द्वेष केला. अर्थात आजचे सर्व अस्पृश्य समजणारें मुळचे बौद्धधर्मीयच होते.

(५) आर्यधर्मात आरंभी यज्ञाच्या निमित्तानें सर्व ब्राह्मण गोमांस

भक्षक होते नि यज्ञाच्या निमित्तानें बेफाम बोकाळले होते. परंतु बौद्ध धर्माच्या अहिंसेच्या प्रभावी नि परिणामकारक प्रचारामुळें यज्ञांतील हिंसा बंद होऊन ब्राह्मणांना गोमांस वर्ज्य करणें भाग पडलें. परंतु या ब्रोकन मॅन (जित) यांनीं गोमांस भक्षणपूर्व रिवाजानुसार तसेंच चालू ठेवले त्यामुळें ब्राह्मणवर्ग त्यांचा द्वेष्टा बनला.

(६) हिंदूधर्मशास्त्रांत सांगितलेला चांडाळ व अस्पृश्य यांचा मूलत: फरक असतां सनातनी हिंदू लोकांनीं अस्पृश्यांना चांडाळ असेच मानले नि तसा सर्वसामान्य लोकांत प्रचार केला. वास्तविक या दोघांत फार मोठा फरक आहे. त्यामुळें सर्व सवर्ण हिंदू अस्पृश्यांना हीन समजू लागले.

(७) इ. स. पूर्वी–धर्मसूत्राच्या काळांत चांडाळांचा एक वर्ग म्हणून जो ओळखण्यांत आला होता त्यानंतर कितीतरी काळानें म्हणजे इ. स. ४०० वर्षांनीं अस्पृश्यवर्ग संबोधण्यांत आला.

अशा तऱ्हेनें अनेक शास्त्रपुराणांचा सखोल अभ्यास करून, बाबासाहेबांनीं आपले **'अस्पृश्य मूळचे कोण ?'** या मौलिक ग्रंथांत विचार प्रकट केले आहेत. नि हिंदुधर्मीयांस ही काल्पनिक अस्पृश्यता नष्ट करण्याचा उपदेश केला आहे, परंतु त्यांत त्यांना यश येऊं शकलें नाहीं.

## हिंदुधर्म सुधारणेचे प्रयत्न

डॉ. बाबासाहेबांची प्रांजल अपेक्षा होती की, हिंदूधर्मातील अज्ञानमूलक कल्पनांचा नाश व्हावा नि हा डागाळलेला धर्म शुद्ध व्हावा. त्याचप्रमाणें धर्मातील त्या कल्पनेमुळें जो कोट्यावधि पददलित समाज अगतिक बनला आहे त्याचा उद्धार व्हावा. परंतु त्या प्रयत्नांत त्यांचे पदरीं अपयशच पडत गेल्यानें मग त्यांनी महाडच्या चवदार तळ्याचा, मंदिर प्रवेशाचा इत्यादि सत्याग्रहासारखे हृदयपालट घडवून आणणारें चढाईचें धोरण स्विकारले, परंतु त्यामुळेंहि सवर्ण हिंदूचें मतांतर किंवा हृदयपालट होऊं शकले नाहीं. शेवटीं या सवर्ण हिंदूंना हृदयच नाही, अशी ठाम समजूत करून घेऊन नाईलाजानें इ. स. १९३६ साली येवले मुक्कामीं धर्मांतराची घोषणा त्यांना करावी लागली. त्यानंतर सन १९३६ ते सन १९५६ अखेर पूर्ण २० वर्षांचा अवधि सवर्ण हिंदूंना विचार करण्यासाठीं

दिला. परंतु त्या अवधींतहि त्यांच्या मनावरील आर्यधर्माचा पगडा नष्ट होऊं शकला नाहीं.

उपरोक्त २० वर्षांच्या कालावधींतहि डॉ. बाबासाहेबांनीं सवर्ण हिंदूंना त्यांचा अज्ञानपणा पटवून देण्याच्या प्रयत्नांत बिलकूल खंड पडू दिला नाहीं. इ. स. १९४६ सालीं "**शूद्र मूळचे कोण? आणि इण्डो-आर्यन समाजव्यवस्थेंत चातुर्वर्ण्य म्हणून कसें गणले गेले**" या नांवाचा त्याचप्रमाणें इ. स. १९४८ सालीं "**अस्पृश्य मूळचे कोण? आणि ते अस्पृश्य कसे बनलें**" या नांवाचा ग्रंथ लिहून हिंदूधर्मीयांचें नि जगांतील इतरांचे या अस्पृश्य समाजाच्या दुरावस्थेकडे आणि गुलामगिरीकडे लक्ष वेधून घेतलें.

सदर ग्रंथांतून साधार पुराव्यानिशी असें पटवून दिलें आहे कीं, हिंदू संस्कृतीमध्यें ५ कोटि अस्पृश्य, दोन कोटी गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जाती आणि एक कोटि वन्यजमाती या तीन वर्गांचे अस्तित्व असणें किती तिरस्करणीय बाब आहे. या प्रकारामुळें सवर्ण हिंदूंना खेद वाटण्याऐवजी अभिमानच वाटतों ही किती शरमेची गोष्ट आहे?

## हिंदू संस्कृति म्हणजे बदनामी संस्कृति.

हिंदु संस्कृतिला संस्कृति म्हणणें कठीण आहे. मानवतेंस दडपून तीजवर गुलामगिरी लादण्याची ती अधमपणाची हिकमत आहे. तेव्हां त्या संस्कृतीला "**बदनामी संस्कृति**" हेच नांव शोभू शकेल. कारण एका वर्गानें मानवी देवघेवीपासून दूर रहावे नि त्यांच्या केवळ स्पर्शानें विटाळ मानला जावा, दुसऱ्या वर्गाचे जीवनाचे साधन म्हणून गुन्हेगारीचे धंदे चालवावेत, आणि तिसऱ्या वर्गानें कमालीच्या रानटी अवस्थेंत रहावे अशी शिकवण ज्या संस्कृतीची आहे तिला "बदनामी" शिवाय काय म्हणावे?

अशा तऱ्हेचें शास्त्रशुद्ध मानवतावादी लिखाण लिहून डॉ. बाबासाहेबांनीं अफाट ग्रंथरचना केली. यामागें त्यांचा हाच एकमेव उद्देश होता कीं, केवळ रुढी नि देवधर्माच्या नांवावर या पददलितांचा जो अनन्वित छळ होत आहे त्याबद्दल हिंदूधर्माच्या संस्कृतीचा पोकळ अभिमान बाळगणाऱ्यांना पश्चाताप व्हावा आणि हिंदू अस्पृश्यांचे समीश्रीकरण होण्यास

मदत व्हावी या सदिच्छेनें त्यांनीं हें विचार मांडले. त्याचप्रमाणें अस्पृश्य समाजामधील ही "हीनमनोगंडवृत्ति" नष्ट व्हावी नि आपल्या अंगच्या दोषामुळें अगर हीन धंद्यामुळेच आपण अस्पृश्य झालों नसून, ब्राह्मणांच्या दुष्टकृतीमुळें आपल्याला अस्पृश्य बनविण्यांत आले आहे याची जाणीव त्यांना व्हावी.

## एका दगडांत दोन पक्षांची शिकार

डॉ. बाबासो. आंबेडकरांनीं उभारलेल्या चळवळींची दोन अंगें होती. एक सामाजिक विषमता नि दुसरे आर्थिक विषमता. या दोहोंपासून त्या समाजाची सुटका करणें हे त्यांचें प्रमुख ध्येय होते. ज्याप्रमाणें एका नाण्याच्या दोन्हीं अंगास दोन भिन्न ठसे असले तरी त्या नाण्याचा व्यवहारांतील मूल्याचा दर्जा जसा ठराविक असतो, त्याचप्रमाणें या चळवळींत दोन अंगे असली तरी त्या समाजाचा सर्वांगीण विकास हे मूल्य ठरले होते. नि यांत दोन्हीं अंगांचा एकाच वेळी समन्वय साधून हें दोन्हीं ध्येयरूपीं पल्ले गांठण्यासाठीं डॉ. बाबासो. आंबेडकरांनीं जो मार्ग शोधून कढला तो म्हणजे बुध्दधर्माचा अंगिकार हा होय !

कारण बौद्धधर्म हा सागरासारखा अफाट आहे, त्यांत यऊन मिळणाऱ्या नद्यांचे अस्तित्व जसें लोप पावते त्याप्रमाणें या धर्मांत येणाऱ्यांचे कूळ, व्यवसाय अगर जात याचा मागमूसहि न राहता तो मानव म्हणूनच त्याच्याकडे पाहिले जातें. एवढेंच नव्हें तर नैसर्गिकरित्या निर्माण झालेल्या स्त्री पुरुष या जातींनाही व्यवहारांत समतेनें वागविण्यांत हा धर्म आघाडीवर आहे. अशा तऱ्हेची विशाल समसमता जगांतील कोणत्याही धर्मांत आढळणार नाहीं.

अशा तऱ्हेनें या धर्मांत जाण्यांत डॉ. बाबासो. नी एका अंगाचा पल्ला गांठण्याच्या दृष्टीनें त्यांची उज्वल कल्पकता दृष्टोत्पत्तीस येते यात बिलकूल संदेह नाहीं.

आता या चळवळीचे दुसरे अंग म्हणजे आर्थिक विषमता. या बाबीचा विचार करतांना बौद्ध धर्माचा सखोल अभ्यास करणारांस हे दिसून येईल कीं, या धर्माची मूलतत्त्वें सर्वस्वी आर्थिक समतेवर आधारलेली आहेत. धर्मांत ज्याप्रमाणें उच्च नीच जातीभेद मानला जात नाही, त्याचप्रमाणें

वैयक्तिक धनसंचयाला सक्त विरोध असून आर्थिक समतेवर या धर्माची तत्त्वें आधारीत आहेत. अन्य धर्मांत दोहोंपैकीं एक आढळेल किंवा कित्येकांत एकहि आढळणार नाहीं. उलट गरीबीचे गोडवे गाणारे किंवा दारिद्र्याचे समर्थन करणारेच बव्हंशी धर्म आढळतील. म्हणून बौद्धधर्म हा अखिल जगांतील पददलितांची गरज भागविणाराच नव्हे त्यांची सर्व प्रकारच्या दास्यांतून सुटका करणारा असा सर्वकष धर्म असल्यानें डॉ. बाबासो. आंबेडकरांनीं एका दगडांत दोन पक्षांची शिकार साधल्याचें श्रेय प्राप्त करून घेतले आहे.

## पददलितांच्या अनर्थाचें मूळ

भारतांतील सर्व पददलित वर्गांपैकीं अस्पृश्य मानला गेलेला वर्ग सामाजिक नि आर्थिक विषमतेनें वंचित झालेला आहे नि त्यांतील बहु-संख्य पददलित वर्ग ( सर्व धर्मांतील ) आर्थिक विषमतेनें नाडला गेलेला आहे. तो प्रामुख्यानें सेवा-धर्माच्या सोज्वल नांवाखालींच होय. त्या धार्मिक गुंगींतच तो आपली दुःखें आजपर्यंत निमूटपणें सहन करीत आला आहे.

बुद्ध धर्माव्यतिरिक्त इतर सर्व धर्मांत 'धर्म ही ईश्वराप्रत पोहच-ण्याची शिडी मानली गेली आहे' म्हणून धर्माची सर्व तत्त्वें ईश्वराभोंवतीं गुरफटून त्या त्या धर्माच्या प्रचारकांनीं आपल्या अनुयायांना त्या मोह-जालांत गुंतवून ठेवले गेले आहे. आणि काल्पनिक ईश्वराचें स्तोम माजवून आर्थिक विषमतेचें कारण पूर्व कर्मावर नि ईश्वराच्या मर्जीवर सोपवून कोट्यावधि पिळल्या जाणाऱ्या पददलितांस त्याच परिस्थितींत पिचत ठेवण्यास या मूठभर स्वार्थांध ऐतखाऊ ( भिक्षुक ) वर्गानें भाग पाडले. उलट मूठभर पुंजीपति–राजे–सरंजामदार यांना ईश्वरांतल्या मर्जीतल्या पुण्यवान ठरवून निव्वळ विनाकष्ट ऐषारामांत ( दक्षिणेवर ) राहतां येते म्हणून ब्राह्मण पंडितांनीं त्या वर्गाचीं तोंड फाटेपर्यंत भाटगिरी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं सर्व धर्मांतील पददलितांना बौद्धधर्मात येण्याबद्दल जी हांक दिली आहे, तिचें मर्म हेंच आहे कीं, **संपत्तीवर व्यक्ति विशेषत्वाचें स्वामित्व हेंच सगळ्या अनर्थाचें प्रमुख कारण आहे.** अनर्थ टाळावयाचा असेल तर दिशाभूल करणारा आणि निर्धनतेचें गोडवे गाणारा

धर्म झुगारून दिल्याशिवाय उन्नतीचा मार्ग दिसणार नाहीं. मग असा कोणता धर्म जगांत आहे कीं, तो आत्मिक उन्नत्तीवरोबरच आर्थिक विवंचना दूर करण्याचा मार्ग दाखवू शकेल तर सत्सद्विवेक बुद्धी जागृत असलेला नि अगदीं निर्विकार मनाचा कोणताहि विचारी माणूस बौद्ध धर्माकडेच बोट दाखविल. कारण या धर्मांत सद्गुण सदाचाराच्या शिकवणुकीवरोबरच वैयक्तिक धनसंचय नि मालकी हक्क यांचा धिक्कार केलेला आहे. यामुळें चालू युगांत ज्याला आपण समाजसत्तावाद किंवा साम्यवाद म्हणतों; तो या धर्मांत ओतप्रत भरलेला आहे.

अशा रीतीनें आर्थिक विषमतेचें मूळ सिद्धांत नि सदाचाराचें तत्त्वज्ञान या दोहोंचा समन्वय साधून मानवकल्याणाचा मार्ग दाखविणारा सत्धर्म म्हणजेच बौद्धधर्म होय.

## साध्य एक–साधनांत फरक

अलिकडे अर्थिक विषमतेवर आधारित जो वर्गकलहाचा किंवा समाजसत्तावादाचा प्रणेता किंवा जनक म्हणून **कार्लमार्क्स** समजला जातो परंतु भ. गौतम बुद्धानें कार्लमार्क्सच्या दोन हजार वर्षांपूर्वींच हें जाणलें होतें. मार्क्सचे तत्त्वज्ञान जवळजवळ भ. बुद्धाच्या तत्वज्ञानावरच आधारलेले आहे.

'विश्वाची उत्पत्ती कशी झाली याच्याशी आपल्याला कर्तव्य नाहीं. ते आपल्याला बदलावयाचे आहे. तसेंच समाजामध्यें गरीब–श्रीमंत हे वर्गभेद आहेत. ते नाहीसें करून, वर्गविरहित समाजाची उभारणी केली पाहिजे. हे बुद्ध व मार्क्स या दोहोंचेहि उद्दीष्ट एकच आहे. गौतमबुद्ध ज्याला दुःख म्हणतो त्याला मार्क्स पिळवणूक म्हणतो त्यांच्यांत जे अंतर आहे ते दुःखाचे निवारण करण्यास सांगितलेल्या साधनांत आहे.

भ. बुद्धाचे म्हणणे "नैतिक अधिष्ठानावर आधारलेला असा धर्म मानवाला जरूर हवा. मात्र धर्माला अनुसरून निर्धनता उत्पन्न करणारे सिद्धांत किंवा तत्त्वे त्यांत नसली पाहिजेत" कार्ल मार्क्स म्हणतो, "धर्म ही अफूची गोळी आहे." धर्मातील दैवीक अंध-श्रद्धेच्या मादकपणामुळें आर्थिक अनर्थ दूर करण्यास अडथळा निर्माण होतो. म्हणून फार तर धर्म ही वैयक्तिक आवडीनिवडीची बाब समजून, प्रत्येकानें फक्त आर्थिक बाबींचा दृष्टीकोन समोर ठेवावा नि आर्थिक समता आणण्यासाठी आंदोलन उभा-

रावें असें तो निर्धारपूर्वक सांगतो. अशा तऱ्हेनें भ. बुद्धाचें साध्य गांठण्याचें साधन हृदय परिवर्तन घडविणारे अहिंसेचें आहे; तर कार्लमार्क्सचें हिंसेचें हा दोहोंतला फरक होय. या बाबतींत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे काय विचार होते ते पाहूं या.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार

डॉ. बाबासो. आंबेडकरांनीं "नेपाळमधील **खाटमांडू**" येथें भरलेल्या चौथ्या जागतिक बौद्ध मेळाव्यापुढें जे भाषण केलें तें भाषण सर्वत्र प्रसिद्ध झाल्यानें तें सविस्तर या स्थळीं देण्याची आवश्यकता नाहीं. मात्र माझ्या विचारांच्या स्पष्टीकरणासाठीं डॉ. बाबासो. च्या भाषणाच्या आधारें हें स्पष्ट व्हावें म्हणून त्याचप्रमाणें अलिकडे आपल्या देशांतील साम्यवादाचे विरोधक, त्यांतले त्यांत डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणविणारे नि बौद्धधर्माचा नामधारी टिळा लावलेले कांहीं स्वार्थांध गणंग डॉ. बाबासाहेबांच्या भाषणाचा सोयीस्करपणें विपर्यास करून, सामान्य जनतेचा बुद्धिभ्रम कसा करतात नि पर्यायानें भ. बुद्धाचें जें मुख्य तत्त्वज्ञान "**बहुजन हिताय बहुजन सुखाय**" यालाच कशी तिलांजली देतात यासाठीं बाबासाहेब आंबेडकर खाटमांडू येथें काय बोलले, त्यांतील त्रोटक मुद्दे येथें दिल्यास आपल्या नवदिक्षीतांना नि इतर बहुजन समाजाला भ. बुद्ध नि कार्लमार्क्स यांचे उद्दिष्ट जरी एक असले तरी साधनांतील फरकामुळें कोणता आत्मोन्नतीचा मार्ग सुलभ आहे हें समजण्यास सोपे जाईल.

## दोन जीवन–मार्ग

डॉ. बाबासाहेब म्हणाले,......" ज्याप्रमाणें बुद्धिझम हा जीवनाचा मार्ग आहे. त्याचप्रमाणें कम्युनिझम हासुद्धा जीवनाचा मार्ग आहे" बुद्धिझीमचा जीवन मार्ग निरंतन आहे की, कम्युनिझमचा जीवनमार्ग चिरंतन आहे याचा शोध केला पाहिजे. कारण जो मार्ग चिरंतन नसेल जो मार्ग तुम्हांस जंगलाकडे नेणारा असेल, जो मार्ग तुम्हांस अराजकतेकडे नेणारा असेल, त्या मार्गानें जाण्यांत कांहींच अर्थ नाहीं. मात्र तुम्हांस सांगितलेला मार्ग सावकाशीचा, थोडा दूरचा असेल, तथापि खात्रीचा असेल आणि तुम्हांस शेवटीं सुरक्षित व भक्कम भूमीवर नेत असेल व तुम्हीं

जी उद्दीष्टें पुढें ठेवलेली आहेत, ती पूर्णत्वानें पूर्ण होणार असतील तर माझ्या मतें पहिल्याच म्हणजे **बुद्धिझमच्याच मार्गानें जाणें मानवाचें कर्तव्य ठरेल**" "कमी अंतराचा म्हणून मधलाच गुंतागुंतीचा मार्ग चांगला कीं, थोडचा अधिक अंतराचा धोपट सरळमार्ग चांगला? असा प्रश्न तुमच्या-पुढें आहे. जीवनामध्यें असे शॉर्टकट्स ( कमी अंतराचे मधले मार्ग ) फार धोक्याचे असतात......."

" ........जगांत पिळवणूक आहे या तत्त्वानें कम्युनिझमचे मूळ सुरवात होते." मार्क्स म्हणतो, श्रीमंत आपल्या पैशाच्या जोरावर गरीबांची पिळवणूक करतात. एका वर्गाची गरीबी व दुःख थांबविण्या-साठीं खाजगी मालमत्तेला प्रतिबंध केला पाहिजे. कोणीहि खाजगी माल-मत्ता बाळगू नये. कामगारांच्या श्रमानें निर्माण केलेले जादा धन तें सार्वजनिक किंवा राज्यसत्तेनेंच घ्यावें. त्याचा उपयोग सार्वजनिक उत्कर्षा-कडे करावा."......

......आतां आपण बुद्धिझमकडे वळू या. भ. गौतम बुद्धानें आपल्या धर्माची उभारणी कोणत्या मूलभूत पायावर केली आहे?....." अडीच हजार वर्षांपूर्वी भ. बुद्धानें **गरीबांच्या दुःखावर आपल्या धर्माचा सिद्धांत उभा केला आहे**. जगांत दुःख आहे. असे भगवंतानें सांगितलें; भ. बुद्धानें याला पिवळणूक हा शब्द वापरला नाहीं, हें खरें आहे. मात्र त्यांनी आपल्या धर्माचा पाया दुःख निवारण्याचा ठेवलेला आहे. **म्हणून बुद्धिझम आणि कम्युनिझम यांचा पाया पाहिल्यास या दोहोंमध्यें शाब्दिक फरका-शिवाय कसलाच फरक नाहीं हें स्पष्ट आहे.** ( जाड टाइप माझा )......'

'...... भ. बुद्धानें आपल्या धर्माचा पाया, ईश्वर, आत्मा अगर चमत्कारजन्य अशा गोष्टीवर आधारलेला नाहीं. तर त्यानें जीवनाच्या वस्तुस्थितीवरच बोट ठवले आहे. ती वस्तुस्थिती म्हणजेच लोक दुःखांत राहातात ही होय. यामुळें **कम्युनिझममध्यें जे तत्त्व आहे**, त्यांतील **भरपूर भाग बुद्धिझममध्यें आहे**. विशेष हें कीं **भ. बुद्धांनीं हें जें सांगितले ते मार्क्सच्या जन्मापूर्वीं दोन हजार वर्षे आधीं सांगितले**" ...... खाजगी मालमत्तेबद्दल देखील बुद्धाचें तत्त्वज्ञान आणि मार्क्सचें तत्त्वज्ञान या दोहोंचा

अगदींच जवळचा ऋणानुबंध आहेत. मार्क्सनें खाजगी मालमत्तेबद्दल सांगितले आहे कीं, खाजगी मालमत्ता हें उत्पादनाचे साधन असल्यामुळें **पिळवणूक थांबवावयाची असेल** तर **ही मालमत्ता राज्याच्या मालकीची करावी** म्हणजे खाजगी मालमत्तेच्या आधारावर मालकवर्ग मजूराची पिळवणूक करणार नाही...... ( जाड टाइप माझा )

.. ...मग बौद्ध बांधवांनीं मार्क्सकडे जाण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाहीं. कारण हा पाया भ. बुद्धानें आधीच शेंकडों वर्षापूर्वी पूर्णपणें भक्कमरीत्या बौद्धधर्मात बसविलेला आहे. आणि याच आर्थिक पिळवणूकीच्या तत्त्वावर "**धर्मचक्रप्रवर्तनसूत्र**" या आपल्या प्रवचन ग्रंथात केलें आहे. कार्लमार्क्सकडे जे आकर्षित झालेले आहेत, त्यांनीं हें प्रवचन अवश्य वाचावें आणि भ. बुद्ध काय म्हणतात तें पाहावें... "

" ......भ. बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्यामध्यें जो मूलभूत फरक आहे तो हा कीं, कम्युनिझम स्थापन करण्यासाठीं विरोधकांची हत्या करणें त्यांना ठार मारणें इत्यादि हिंसेची साधनें वापरणें भाग पडतें. तर भ. बुद्धाचा मार्ग हृदयपरिवर्तनाचा, युक्तिवादानें पटवून देण्याचा, नैतिक शिकवण देण्याचा नि ममतेचा आहे.

भ. बुद्ध म्हणतात कीं, सत्तेनें, जबरदस्तीनें माणसास जिंकता येत नाहीं; तर करुणेनें समतेनेंच जिंकता येते सारांश **भ. बुद्धाचा अहिंसेचा मार्ग तर मार्क्सचा हिंसेचा मार्ग आहे**. या दोहोंमध्यें जो फरक आहे तो हाच आहे.

'......भ. बुद्धाचा मार्ग हा कांहींसा पल्ल्याचा आहे. थोडा विलंबाचा नि कंटाळवाणा वाटण्याचा संभव आहे. परंतु तो मार्ग ठाम-खात्रीचा आहे याबद्दल मला तिळमात्र संशय नाहीं......'

## आज कोणता जीवनमार्ग आवश्यक ?

उपरोक्त डॉ. बाबासाहेबांच्या भाषणाचा मतितार्थ लक्षांत घेतला तर आपणांस हें कळून येईल कीं, बुद्धिझम नि कम्युनिझम हे दोन्हीही जीवनाचे मार्ग आहेत. दोहोंतील साधनांच्या फरकामुळें वेळ, काळ नि स्थळ

लक्षांत घेऊन, कोणी कोणता मार्ग चोखाळावयाचा हे ज्याचें त्यानें ठरवावें. भिन्न भिन्न देशांत सामाजिक व राजकीय स्थिति नि संस्कृति भिन्न भिन्नच असणार. म्हणून सर्वच देशांत एकच कोणताहि जीवनमार्ग हाताळून चालणार नाहीं तर देशपरिस्थितीनुरूप उपरोक्त दोहोंपैकीं, कोणत्याही एका मार्गाचा अवलंब करून; वहुजन समाजाचें सर्वांगिण उन्नतीचें उद्दिष्ट गांठलें पाहिजे.

साम्यवादाशिवाय गरीब श्रीमंतांमधील अंतर नष्ट होणार नाहीं, नि सर्वांची समान पातळीवरून उन्नती साधू शकणार नाहीं. भ. बुद्धाच्या भाषेंत सांगावयाचे म्हणजे "**बहुजन हिताय नि बहुजन सुखाय**" हें तत्त्व वैयक्तिक धनसंचयाची लालसा नष्ट झाल्याशिवाय तें कसें साध्य होईल? संपत्तीचा मालकी हक्क मान्य झाला कीं, धनसंचय लालसा तेथें आलीच म्हणून समजा. नि ती इतकी, वाढते कीं, तिला मर्यादाच राहत नाहीं. त्या लालसेंतूनच अनेक अरिष्टांचा–दुःखांचा जन्म होतो. म्हणून आज जगांत साम्यवाद आणावयाचा कोणत्या मार्गानें? कम्युनिझमच्या की बुद्धिझमच्या?

## भारतांत साम्यवादाला बुद्धिझमचाच मार्ग योग्य.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "खाटमांडू" येथील भाषणांत जीवनाच्या (कम्युनिझम नि बुद्धिझम) दोन मार्गांपैकीं कम्युनीझमधील गुणांचा त्यांनीं स्वीकार करूनहि बौद्धधर्माला नि त्याच्या तत्त्वाला कम्युनिझमपेक्षां श्रेष्ठ ठरविले आहे याचे कारण हेंच कीं, साम्यवादाला पोषक अशी तत्त्वें या धर्मांत आहेत. आणि तो धर्म या देशांतला म्हणजे भारतामधलाच आहे. म्हणन सर्व भारतवासियांनीं या देशांत साम्यवाद–समाजसत्तावाद येण्यासाठीं नि तो दृढमूल होण्यासाठीं बौद्धधर्माचाच स्वीकार करावा असें त्यांनीं जे आवाहन केलें आहे तें किती समर्पक नि हितकारक आहे याचे निराळे विवेचन करण्याची गरज नाहीं कारण कोणत्याहि धर्माचे आपल्या देशांतील संस्कृतीशीं अविभाज्य संबंध असतात. दुसऱ्या देशांतील लोकांत बौद्धधर्म स्विकारण्याकरितां आपापल्या देशांतील संस्कृतीचा त्याग करावा लागतो. परंतु भारतांतील लोकांना बौद्ध होतांना आपल्या देशाच्या संस्कृतीचा त्याग करावा लागणार नाही, या एकाच विशेष कारणावरून भारतांत बौद्धधर्माचा प्रचार नि प्रसार होण्याची जास्त

शक्यता आहे. शिवाय भारतांतील शेतकरी नि कष्टकरी यांची हलाखीची स्थिति लक्षांत घेतां, आपल्या भारतांत खराखुरा नि शास्त्रशुद्ध साम्यवाद प्रस्थापित करावयाचा असेल तर भारतवासियांनी **हिंसामय मार्क्सच्या मार्गानें न जातां अहिंसामय भ. बुद्धाच्याच मार्गानें जाणेंच योग्य ठरेल.** परंतु त्या मार्गाचा त्याला परिचय झाला पाहिजे, त्या मार्गाचा सुलभपणा नि महत्त्व त्याला पटलें पाहिजे. म्हणूनच खऱ्या बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार नि प्रचार होणें अगत्याचें आहे.

कारण आर्थिक विषमतेमुळें आजच्या जगांत दुःख दारिद्र्यच अधिक खच्चून भरलें आहे. नि त्यांतून सुटका करून घेण्याच्या प्रयत्नांत बहुजन पिळलेला वर्ग आज दंग आहे. तो निरनिराळे मार्ग शोधतो आहे, त्याला आजपर्यंतच्या अनुभवावरून कोणत्याहि धर्मांत याचा मार्ग दिसला नाहीं. त्यानें आपल्या देवाधर्मांना देव्हाऱ्यांतील कडी-कुलपांत सुव्यवस्थित ठेवून सुचेल त्या मार्गानें आपलें सुख हस्तगत करण्यासाठीं पुढें सरसावल्याची कांहीं देशांतील उदाहरणें आपल्या डोळ्यांपुढें आहेत. अशावेळीं त्याला या सत्धर्माचा मार्ग दिसला तर तो निश्चित या मार्गाचा अवलंब करून हिंसामय अरिष्टांपासून तो चार हात दूर राहील. आणि मग इच्छित सुखाच्या ध्येयाप्रत तो निश्चित जाईल. म्हणून आजच्या काळांत या बौद्ध-धर्माच्या खऱ्याखुऱ्या तत्त्वज्ञानाची नितांत गरज आहे. म्हणून तोच धर्म भारतांतील नव्हे अखिल मानव जातीचा उद्धार करणारा एकमेव धर्म आहे. यांत तिळमात्र शंका नाहीं.

सदर बौद्धधर्माचें महत्त्व पटवितांना डॉ. बाबासाहेबांनीं सांगितलें कीं, इतर सर्व धर्म प्रामाण्यावर किंवा ग्रंथप्रामाण्यावर आधारलेले आहेत. परंतु बौद्धधर्म बुद्धीच्या निकषावर आधारलेला आहे. शिवाय तो भौतिक वादावर नि विज्ञान-शास्त्रावरहि आधारलेला आहे. म्हणूनच बौद्धधर्म पिळल्या गेलेल्या बहुजन समाजाचें आशेचें प्रतिक आहे. अभ्युदय नि उत्कर्षाचा तो महान मार्ग आहे. त्याचप्रमाणें हा धर्म निव्वळ मानवी आहे, दैवी नाहीं. कारण यांत ईश्वर, आत्मा, परमात्मा, स्वर्ग नरक, पुनर्जन्म इत्यादि साम्यवादाला अडथळा निर्माण करणारी थोतांडे नाहींत. " धर्म

**हा वैज्ञानिक असला पाहिजे. धर्मांत नैतिक आचारणाच्या नियमांचा समावेश करण्यापूर्वी स्वातंत्र्य, समता नि बंधुत्व या तिहींचा समावेश असणें अगत्याचें आहे.** आणि म्हणूनच असा सर्वंकष हा बौद्धधर्म असल्यानें या धर्माकडे मी आकर्षिला गेलों आहे." असें आत्मविश्वासपूर्वक उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं आपल्या दीक्षाविधी प्रसंगीं काढले आहेत.

## पिडीत जनता कम्युनिझमकडे आकृष्ट कां ?

डॉ. बाबासाहेबांनीं खाटमांडू येथील चौथ्या जागतिक बौद्ध परीषदेपुढें मांडलेले विचार इतके उद्‌बोधक आहेत कीं, बौद्धधर्मावर श्रद्धा असणाऱ्या लोकांना अंतरीच्या कळकळीनें केलेले ते आवाहनच होय.

त्यांनीं ज्याप्रमाणें गौतमबुद्धाच्या धर्माचा नि त्यांतील तत्वांचा सखोल अभ्यास केला. त्याचप्रमाणें कम्युनिझम तत्त्वाचाहि तितकाच आत्मियतेनें अभ्यास केल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते तर मग जगांतील बहुसंख्य जनता आज कम्युनिझमकडे आकृष्ट झालेली दिसत असतांना डॉ. बाबासाहेबांनीं सर्व पददलितांना बुद्धिझीमच्या मार्गानें जाण्याचे आवाहन का केलें ?

याचे मुख्य कारण बौद्धधर्माची मूलतत्वेंच आज जगापुढें प्रकाशित झालेली नाहीत साम्यवादाच्या विरोधकांनीं ती बुद्धिपुरस्पर दडपून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कारण बौद्धधर्मांत साम्यवादाची मूलतत्वें प्रकाशानें उधृत केलेली आहेत. या तत्वानुसार आचरण केल्यास, सर्वांचा अभ्युदय होण्यास मदत होईल. परंतु साम्यवादाच्या विरोधकांना नेमके तेंच नको आहे. म्हणून त्या तत्वांना जितकें दडपून टाकतां येईल, तितकें त्यांच्या फायद्याचे असल्यानें त्या धर्मास विकृत स्वरूप आणून आपला स्वार्थी मार्ग निष्कंटक करून ठेवला आहे.

म्हणून आजची पददलित-पिडीत जनता असह्य स्थितींत इतर धर्माप्रमाणें याही धर्माकडे पाहून निराश झाली असल्यास त्यांत काय आश्चर्य ? आणि त्यामुळेंच सुखासाठीं वंचित राहिलेली ही जनता कम्युनिझमकडे आकृष्ट झाली आहे.

## विद्यमान बौद्ध धर्माची अवस्था

भ. बुद्धाचा सत्यधर्म, त्याचे मूळ सिद्धांत आणि त्याचें शुद्धजीवन-

चरित्र या गोष्टीं जगापुढें येणें आवश्यक आहेत. अशी सतत उत्कंठा बाबासाहेबांना लागून राहिलेली असावी. हें त्यांच्या प्रत्येक भाषणांत नि लिखाणांतून ठळकपणें पहावयास मिळते. ही त्यांची उत्कंठा त्यांनीं लिहिलेल्या **"दि बुद्धा ॲण्ड हिज् धम्मा"** या बहुमोल ग्रंथाच्या रूपानें भरून काढण्यांत यश मिळविलें आहे. परंतु त्यांचे हे विचार जगन्मान्य करून घेण्यास ते आज मात्र हयात नाहींत याचेच मनस्वी दुःख होतें. त्यांना आणखी थोडेंफार आयुष्य लाभतें तर त्यांनीं आपलें शास्त्रशुद्ध विचार अखिल बौद्ध जगतांत अधिकारवाणीनें आणि अगाध अशा पांडित्यानें पटवून देण्यांत निश्चितपणें यश मिळविलें असतें.

आज जगापुढें अस्तित्वांत असणारे बौद्ध वाङमय हें शुद्ध वाङमय नाहीं. भ. बुद्धाच्या नंतरच्या भिक्खूंनीं भगवंताच्या मूळ धर्मविचारांवर कल्पना–अवडंबराचा गडद मुलामा चढविलेला आहे. त्यामुळेंच भ. बुद्धाचे मूळ सिद्धांत आणि त्याचे शास्त्रशुद्ध विचार त्याखालीं दडपले गेलेले आहेत. आजच्या काळाची निकड लक्षांत घेऊन ही सर्व कल्पनांची आवरणें नि पुटें दूर सारून, त्यांत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न होणें जरूर आहे. तसा प्रयत्न बाबासाहेबांनीं चालविला होता. आणि ते करणें अत्यावश्यकही होते. कारण भ. बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर अवघ्या ७५ वर्षांनंतरच त्या धर्मास निराळे वळण लागून मागे सांगितल्याप्रमाणें त्या धर्माच्या हितशत्रूनीं नि कांहीं स्वार्थांधांनीं त्या धर्मांत विकृत तत्त्वज्ञानाची पेरणी करून, त्या धर्माचे मूळ स्वरूपच अजिबात बदलून टाकलें. त्यांतूनच या धर्माचे हीनयान व महायान हे दोन पंथ निर्माण झाले. त्यापैकीं महायान पंथ हा तर निव्वळ हिंदू धर्माची सुधारलेली नवी आवृत्तीच आहे, यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

या भूतलावर पैदा होणाऱ्या सर्व प्रकारच्या संपत्तीवर येथें वास्तव्य करणाऱ्या सर्व प्राणीमात्रांनीं समान उपभोग घेऊन, सर्वांचें जीवन सुखमय व्हावें असें ध्येय ज्या भ. बुद्धानें आपल्या धर्मांत कटाक्षानें प्रतिपादिलें आहे त्या धर्मांत परस्पर विरोधी तत्त्वावर आधारलेले नि मूळ तत्त्वाला मुरड घालणारे पंथ निर्माण व्हावेत हें जगांतील पददलितांचें दुर्दैवच नाहीं कां?

वैयक्तिक धनसंचय, एकतंत्री सत्ता नि पिळवणूक नष्ट करणें,

मतदानावर आधारलेल्या लोकशाही पद्धतीची गणराज्याची स्थापना करणें; गुलामगिरी नष्ट करणें, शांततेच्या मार्गानें प्रगति करणें आणि या सर्व कार्यासाठीं लागणारीं निःस्वार्थी अशी एकदिलाची संघटना उभारणें, ही भ. बुद्धाच्या शिकवणुकीची मूलभूत सूत्रें होतीं. त्या सिद्धांताला अनुसरून डॉ. बाबासाहेबांनीं या देशांतील बहुजन समाजाला भ. बुद्धाच्या मार्गानें जाण्याचा सल्ला दिला. तो आज विद्यमान असलेल्या बौद्धधर्माकडे पाहून खास दिलेला नव्हता.

भ. गौतमबुद्धानें समाजाच्या दुःखाला प्रथम वाचा फोडली. त्या दुःखाला खाजगी मालमत्तेचा मोह सोडण्याचा नि निर्वाणीचा मार्ग दाखवून गुलामगिरी नष्ट करणारी दास मुक्तिची चळवळ उभारून समाजामध्यें अहिंसा, दया, लोभविमुक्ती, शांतता व अष्टांग मार्ग इत्यादींचा प्रचार करण्यासाठीं बौद्धसंघाची (भिक्खूसंघाची) निःस्वार्थी संघटना उभीं केली. म्हणूनच त्या धर्माचा प्रचार नि प्रसार जगभर होऊं शकला. परंतु भ. बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर तो धर्म राजे लोकांनीं स्विकारला आणि राजमान्यता धन–देणग्या इत्यादि प्रकार सुरू झाले. पुन्हां स्वार्थाचा नि धनलोभाचा पगडा बसला. गुलामगिरी चालू झाली बौद्धसंघांत अनाचार, स्वार्थ सुरू झाला. आणि या सर्वांचा संकलित परिणाम होऊन त्या धर्माची वाढ खुंटून त्याचा उत्तरोत्तर ऱ्हास होत गेला. एवढेंच नव्हें तर तो धर्म या देशांतून बहुतांशीं नष्ट झाला. **अंशतः शेष राहिलेला धर्म हा विकृतावस्थेंतील विद्यमान बौद्ध धर्म होय.**

## डॉ. बाबासाहेबांचे टीकाकार

याच देशांत निर्माण झालेला परतु उपरोक्त कारणास्तव या देशांतून नष्टप्राय झालेला भ. बुद्धाच्या मूळ धर्म–सिद्धांताच्या आधारें त्याचें पुनर्जीवन करावें आणि या महान तत्त्वांच्या अभावी कोटयावधि पददलितांचें जीवन जें उध्वस्त झालें आहे नि ते लोक जीवन सौख्याच्या अभावी वाट दिसेल तिकडे सैरावैरा जे धांवत आहेत, त्यांना या तत्त्वाच्या आधारें एकत्र आणून; त्यांचें जीवन सुखमय करावें या सद्हेतूनें बाबासाहेबानीं त्या दिशेनें कार्य करण्याचें निश्चित केलें होतें एवढेंच नव्हें हा तर सारा भारत बुद्धमय करून खराखुरा साम्यवाद या देशांत आणण्याची घोर प्रतिज्ञाहि यांनीं केली होती.

यासाठीं त्या धर्माची खरीखुरी माहिती पाली भाषेंत असल्यानें त्या भाषेचा त्यांनीं अभ्यास केला. ती भाषा आत्मसात केली नि त्या पाली भाषेंतील महत्त्वाचें बौद्धवाङ्मय त्यानीं अभ्यासिलें. त्या प्रयत्नांतूनच त्यांना खऱ्या बौद्धधर्माच्या कांही तत्त्वांचा शोध लागला. त्या आधारावरच त्यांनी बरेंच लिखाण आणि अनेक परिषदांतून प्रचलित धर्माच्या थोतांडावर टीका केली नि भ. बुद्धाच्या खऱ्या तत्त्वज्ञानावर प्रकाश पाडला.

त्यांच्या या सत्य नि सडेतोड वक्तव्यावर नि लिखाणावर त्याच धर्मातील परंतु विकृत तत्त्वज्ञानांनी पछाडलेल्या कांहीं व्यक्तींनी बाबासाहेबांवर टीकेचा भडिमार केला. त्यांच्या कोलंबो, रंगून, सारनाथ, दिल्ली, खाटमांडू इत्यादि ठिकाणच्या जाहीर भाषणावर आणि त्यांच्या ग्रंथावर बऱ्याच प्रतिगामी विचारसरणीच्या भिक्खूंनी नि संबंधित बौद्धसंस्थांनी टीका केली आहे. उदाहरणार्थ "**हाँगकाँग**" येथील **टाइम्सनें**; **कलकत्ता** येथील "महाबोधि सोसायटी ऑफ इंडिया" च्या वतीनें निघणाऱ्या "**महाबोधि जर्नल**" च्या संपादकानें; रंगून येथील "**शासन कौन्सिल**" चे मासिकांतून आणि सारनाथ येथील प्रसिद्ध होणारे '**धर्मदूत**' या मासिकांतून डॉ. बाबासाहेबांच्या या पुरोगामी नि सत्य विचारसरणीवर टीका केली आहे.

ज्या डॉ. बाबासाहेबांनीं अनेक मार्गानें परिश्रम करून, सदर धर्माचें लोप पावलेल्या तत्त्वज्ञानाचें वाङ्मय हुडकून काढले नि त्या धर्मात घुसडलेल्या दंतकथा, चमत्कारादि तत्त्वहीन वाङ्मयावर प्रकाश पाडून; या धर्माला जे हिणकस वळण लागले आहे त्यास पूर्ववत वैभव प्राप्त व्हावे; तसेंच आज जो बहुजन समाज साम्यवादाच्या तृष्णेनें व्याकूळ झाला आहे तो या धर्मात राहून कांहीं मार्ग दिसत नाहीं, म्हणून कम्युनिझमकडे आकृष्ट होत आहे. त्या मार्गापासून त्याला थोपवावें म्हणून प्रयत्न करीत होते. त्यांच्यावर असा टीकेचा भडिमार व्हावा हें कशाचें लक्षण आहें ? आणि हें टीकाकार तरी कोण आहेत ? तर दुसरें तिसरें कोणी नसून बौद्धधर्माचेच अध्वर्यु नि त्या धर्माचे सूत्रधार समजणारे भिक्खूगणच होत. मग हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर टीका तरी कां करतात ? याचे उत्तर स्पष्ट आहे. आणि ते म्हणजे "ज्यांनीं या धर्मास सोयीस्करपणें निराळे वळण लावले नि ज्यांचा या धर्माच्या नांवावर मठात बसून

एषाराम भोगण्याची सोय होते, फुकटांत श्रेष्ठत्व लाभतें आणि भ. बुद्धाला अवतारी सत्पुरुष ठरवून, आत्मा, पुनर्जन्म आदि चमत्कारावर सामान्य जनतेला भुलवितां येते, **असेंच स्वार्थान्ध लोक या धर्माच्या नाशास कारणीभूत झाले आहेत.** नि अशा लोकांच्या मर्मावर घांव बसल्यानें ते सत्य-प्रकाशित करणाऱ्यावर टीका करणार नाहींत तर काय त्यांची पूजा करतील ?

## बुद्ध तत्त्वज्ञान नि जागतिक परिस्थिति

डॉ. बाबासाहेबांनी बौद्धधर्माच्या मूलभूत तत्त्वांचा सखोल अभ्यास करून अनेकवर्षे लुप्त झालेले सत्य बौद्ध वाङ्मयातून हुडकून काढण्यांत यश मिळविलें त्या आधारावरच ते प्रचलित बुद्धधर्मावर टीका करुं शकले.

त्या धर्मांत हेतुपुरस्सर घुसडलेल्या दंतकथा, चमत्कारानें भ. बुद्धाला ईश्वरी अवतार ठरवून त्याच्या तोंडीं घातलेला विकृत तत्त्वज्ञानाचा प्रचार यांवर बाबासाहेबांनी विदारक प्रकाश पाडून, वास्तव परिस्थितीच्या आधारे जगाला पटवून दिलें आहे. या दृष्टीनें बाबासाहेबांचे आधुनिक जगावर उपकारच झाले आहेत, असे म्हटल्यास बिलकूल अतिशयोक्तीचे होणार नाहीं.

कारण अलिकडील कित्येक वर्षे धुमसत असलेली जागतिक परिस्थिति लक्षांत घेतां आज जगाच्या सारीपटांवर जी सोंगट्यांची उलथापालथ होऊन, भराभर नकाशाचे रंग बदलत आहेत, ते दृष्टीसमोर धरल्यास हेंच दिसून येईल कीं, ज्या भ. बुद्धानें मानव कल्याणाचीं तत्त्वें निर्धारपूर्वक सांगितली नि त्या तत्त्वज्ञानाच्या पूर्ततेसाठीं जो खात्रीचा मार्ग दाखविला, त्या मार्गानें आज जगाची वाटचाल आहे कां ? जर असती तर आज ज्या घडामोडी होत आहेत, कांहीं होऊं घातल्या आहेत त्या निश्चित झाल्या नसत्या असें खात्रीनें म्हणतां येईल.

भ. गौतम बुद्धाच्या ज्या तत्त्वज्ञानाचा अर्ध्या अधिक जगानें स्विकार केला आणि भावी कल्याणाच्या आशेनें तें तत्त्वज्ञान बहुसंख्य पददलितांनीं शिरोधार्य मानलें, त्या मानव कल्याणसमाविष्ट मूलभूत सिद्धांताचा प्रसार आजपर्यंत जसाच्या तसा शिल्लक असता, तर आज जगाची जी दोलायमान स्थिति झाली आहे किंवा मानवाची जीवनसौख्यासाठीं जी धडपड चालू आहे. ती खात्रीनें दिसली नसती.

ज्या भ. बुद्धानें आपल्या खडतर अनुभवांतून नि आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर जगाला निक्षून सांगितले कीं, प्रेम, दया आणि करुणा ही आयुधें हातीं घेऊन समता, स्वातंत्र्य नि विश्वबंधुत्व, हस्तगत करण्या-साठीं साम्यवाद आणण्यासाठीं अहिंसेच्या मार्गानें कूच करा. हा भ. बुद्धाचा बहुमोल उपदेश जगांतील सर्वांच्या मनीं बिंबला आहे कां? मुळींच नाहीं. याच्या अगदीं उलट परिस्थिति भासमान होत आहे.

"बहुजन हिताय, बहुजन सुखाय" आधुनिक भाषेंत बोलायचे म्हणजे खराखुरा साम्यवाद प्रस्थापित करण्यासाठीं जग हिंसेचा मार्ग चोखाळीत आहे. यांतून अशी शंका निर्माण होते कीं, भ. बुद्धाचा मार्ग आधुनिक जगांत अनुभवांनी चुकीचा ठरला कीं काय? किंवा ज्या काळीं हा मार्ग जगाला कथन केला त्या बुद्धकाळीं जगच वेगळें होतें कीं काय?

या सर्व शंकांचें निरसन डॉ. बाबासाहेबांच्या बौद्धवाङ्मय संशोधनानें स्पष्ट झालें आहे. त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथावरून नि अनेक ठिकाणच्या भाषणांवरून हें उघड झालें आहे कीं, भ. बुद्धाचे तत्त्वज्ञान खऱ्या स्वरूपांत जगापुढें येऊच शकलें नाहीं. म्हणूनच आजची जागतिक परिस्थिति अस्थिर नि अशांततामय दिसत आहे.

कारण भ. बुद्धानंतर थोड्याच दिवसांत भारतांतील इतर धर्मियांनीं अनेक कपटकारस्थानें करून, या धर्मास निराळें वळण लावण्यासाठीं बौद्ध धर्मीय जनतेमध्यें बुद्धिभेद निर्माण केलें.

त्यांच्यांत दुफळी निर्माण करून, अनेक पंथ निर्माण केले. एवढेंच नव्हे तर हा धर्मच अजिबात उखडून टाकण्याचा प्रयत्नहि केला. परंतु त्यांत त्यांना फक्त धर्माचें तत्त्वज्ञानांत बदल करण्यांतच अंशत: यश आलें. धर्म नष्ट होऊं शकला नाहीं.

या कूटकारस्थानांत विशेषत: हिंदूधर्मीय शास्त्री, पंडित, पुरोहित, पंडे यांनीं "आपला हिंदू धर्मच नष्ट होतो कीं काय?" या धास्तीनें आपल्या धर्मांत सोयीस्कर सुधारणा घडवून आणून बुद्ध धर्मांत चमत्कार, अद्भूतपणा, जातककथा, आत्मा, पुनर्जन्म, ईश्वरी अवतार इत्यादि स्वधर्मा-प्रमाणें बुद्धीभ्रमाचे ढंग निर्माण करून, त्या बुद्धधर्माच्या तत्त्वज्ञानाचें तेज झांकण्याचा कट केला. आणि भोळ्या भाबड्या अशिक्षित बौद्धजनतेमध्यें

या मायावी मतांचा प्रचार करून, या धर्मास निराळे वळण लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला.

म्हणूनच खऱ्या बुद्ध तत्त्वज्ञानावर इतर प्रतिगामी धर्मांच्या तत्त्वांचा धुराळा बसून ते तत्त्वज्ञान आजपावेतों झांकले गेलें आहे; परंतु त्यावरील बसलेला धुराळा झटकण्याचें महत् कार्य डॉ. बाबासाहेबांनीं केलें. म्हणूनच अंशतः खरें बुद्ध तत्त्वज्ञान आपल्या दृष्टिपथांत येऊं शकलें.

या धर्मास वेगळे वळण लावण्यांत या धर्ममार्तंडास जे यश आलें त्याचे प्रमुख कारण, ज्यांना आर्थिक विषमता कायम ठेवल्यानें आपला स्वार्थ साधतां येतो नि आपल्या वैयक्तिक धनसाठ्यानें इतरांना गुलाम करून, त्यांच्यावर अमर्याद सत्ता गाजवितां येते; शिवाय ऐषारामांत आयुष्य कंठतां येऊन अमाप सुख उपभोगतां येतें. त्या सरंजामदार, राजेरजवाडे, पुंजीपति वर्गानें स्वहिताखातर या हिंदूधर्म-मार्तंडांना साथ देऊन, त्यांच्या कार्यांत बहुमोल अशी मदत केली. प्रचारी हस्तक खरेदी केले, शास्त्री, पंडितांना सर्व प्रकारची साधनें देऊन त्यांच्याकरवी सोयीस्कर असें वाङमय तयार करून घेतलें. नि बहुजन पिडीत जनतेला आहे त्या परिस्थितींत ईश्वराच्या नांवाखालीं समाधान मानण्यास भाग पाडलें. अशा तऱ्हेनें या राजेरजवाडे, सरंजामदार, पुंजीपति नि ऐतखाऊ शास्त्री, पंडित पुरोहित वर्ग यांनीं बुद्धधर्मांत निकृष्ठ तत्वज्ञान पेरून, काल्पनिक ईश्वराच्या आड लपून, बहूजन समाजाची पिळवणूक चालविली आणि त्यामुळें जगांत दुःखाच्या राशी पडण्यास सुरवात झाली ही आर्थिक विषमता जगांत जसजशी वाढत गेली तसतसें संघर्षाचें प्रसंग उद्‌भवू लागले. बहुजन पिडीत समाज बुद्धतत्त्वाभावी निराश होऊन, सुख-स्वातंत्र्यासाठीं तो हिंसामय क्रांतीच्या मार्गावर ओढला गेला.

## जगाची ओढ बुद्धाऐवजी युद्धाकडे कां ?

भ. बुद्धानें सर्वांना वैयक्तिक धनसंचयाला विरोध दर्शवून, जीवन सुखी करण्यासाठीं शांतता, प्रेम, करुणा नि अहिंसा या मार्गानें जाण्याचा मार्ग दाखविला होता. परंतु आजचा मानव समाज त्या मार्गानें जात आहे कां ? नाहीं. याचें कारण हेंच कीं, वैयक्तिक धनसंचयाचा लोभ वाढत चालला. त्यांतून आर्थिक विषमता वाढली नि त्यामुळें पिळून निघणारा नि

पिळणारा असे गरीब श्रीमंतांचे दोन वर्ग निर्माण झाले. आणि मग त्या दोन वर्गाचा संघर्ष आज अपरिहार्य होऊन बसला आहे.

पिळवणुकीनें त्रस्त झालेला बहुजन समाज जीवनसौख्यासाठीं ज्या वर्गानें तें जीवनसौख्य हिरावून घेतले आहे त्यापासून परत मिळविण्यासाठीं तो धडपडतो आहे.

म्हणून हिंसेच्या मार्गानें जाणारा (पिळलेला) वर्ग आणि त्या मार्गाकडे नेणारा (पिळणारा) वर्ग हें दोन्हीहि खऱ्या बुद्धतत्त्वज्ञानापासून अलिप्त राहिल्यामुळेंच आज जगांत स्फोटक परिस्थिति निर्माण झाली आहे. थोडक्यांत म्हणजे आजचें जग बुद्धाकडे येण्याऐवजी युद्धाकडे खेचले जात आहे.

## बौद्धराष्ट्रांत तरी बौद्ध तत्त्वज्ञान आहे कां ?

जगांत जे कांहीं बौद्धदेश समजले जातात, त्या देशांतून तरी हें वर्ग-संघर्ष टळले आहेत कां ? त्या देशांतील जनता बुद्धाच्या मार्गानें जाऊन शांततामय जीवन जगत आहे कां ? त्या देशांत तरी बौद्धतत्त्वज्ञान अस्तित्वांत आहे कां ?

या सर्व प्रश्नांचीं उत्तरें नकारात्मकच द्यावी लागतील. उलट इतर राष्ट्रां पेक्षां या बौद्ध राष्ट्रांत वर्ग-संघर्ष तीव्र स्वरूपांत झाल्याचे अनुभवास आले आहे. याची कांहीं मोजकी उदाहरणें आपणांस देतां येतील.

चीनसारख्या बौद्ध राष्ट्रांत भ. बुद्धाचें तत्त्वज्ञान अस्तित्वांत असतें तर तेथें रक्तमय क्रांति होऊन, तेथील जनता कम्युनिझमकडे आकर्षिली गेली असती कां ?

ब्रह्मदेश या बौद्ध राष्ट्रांत नि त्याच्या आसपासची बेटें, द्वीपकल्पें यांमधील छोटें मोठें बौद्ध देश यांच्यामध्यें ज्या अलिकडे संघर्षाच्या घडामोडी झाल्या आणि होत आहेत हें कशाचें लक्षण ?

सिलोनसारख्या कट्टर बौद्ध राष्ट्रांत तर तेथील शासनकर्ते नि पंतप्रधान बौद्ध धर्मीय असता त्या राष्ट्रांतहि हिंसामय बंडाळी होत आहेत. हें त्या धर्मातील शांततामय सहजीवनाचें तत्त्व कां ?

तिबेटसारख्या निर्भेळ बौद्ध राष्ट्रांत हिंसामय बंडाळी होऊन, तेथील धर्मगुरु जो दलाई लामा याला देशांतर करून, भारतांत पळून यावे लागले.

आश्चर्याची बाब म्हणजे " जो भ. गौतम बुद्ध वैयक्तिक धनसंचयाला नि मालकी हक्काला कटाक्षानें विरोध करणारा." त्याचा उच्च पदस्थ शिष्य हा दलाईलामा त्या देशांतला मोठा जमीनदार असावा? विशेष म्हणजे तो भारतांत पळून येतांना कोट्यावधि रुपयांचे सोनें बरोबर घेऊन आल्याचें ऐकून तर कोणाला आश्चर्याचा धक्का बसणार नाहीं? केवढी ही तत्त्व-विसंगती नि केवढा हा तत्त्वज्ञाचा अधःपात ?

कोठें तो भिक्षापात्र हातीं घेऊन तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठीं वण वण भटकणारा भ. बुद्ध नि कोठें हे मठांत ऐषआरामांत जीवन कंठणारा त्याचा पट्टशिष्य म्हणविणारा दलाईलामा नि त्याचे साथीदार? आणि अशा या तत्त्वहीन बौद्धप्रमुखांसारख्यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर टीका ऐकूं आल्यास त्यांत नवल वाटण्यासारखें काय आहे?

## हें त्या धर्मांतील शांतामय सहजीवनाचे तत्त्व कां?

यावरून हा निष्कर्ष निघतो कीं, भ. गौतमबुद्धाचें मूळ स्वरूपांतील खरें तत्त्वज्ञान अस्तित्वांत असते तर आज या देशांत नि जगांत तप्त वातावरण जें दिसत आहे तें दिसलें नसतें. निदान तें बौद्ध राष्ट्रांत तरी दिसलें नसतें. त्या तत्त्वज्ञानाभोवीच राष्ट्राराष्ट्रांतून आर्थिक विषमता फोफावत आहे. वर्ग-कलह निर्माण होत आहे; आपला लढा यशस्वी व्हावा म्हणून बहुजन पिळला जाणारा वर्ग प्रतिपक्षाला नेस्तनाबूत करण्याच्या उद्देशानें हिंसेची कास धरीत आहे. तर तो लढा यशस्वी होऊं नये म्हणून भांडवलदार सत्ताधारी वर्ग तो दडपण्यासाठी शस्त्रास्त्राचा नि सत्तेचा सर्रास उपयोग करीत आहे. आणि त्यांतूनच जागतिक महायुद्धाच्या नौबती झडूं लागून, आजचे सारे जग विनाशाच्या खाईत लोटले जाणार कीं काय अशी दाट शंका मनाला चाटून जात आहे.

म्हणून या सर्व अरिष्टांतून जगाची सोडवणूक व्हावी असें वाटत असेल तर भ. बुद्धाचें खरेंखुरें मूल स्वरूपांतील तत्त्वज्ञान जगापुढें आलें पाहिजे नि त्या मानव कल्याणी धर्माचा झाडून साऱ्या जगानें स्वीकार केला पाहिजे आणि जीवनसौख्याचा आनंद उपभोगण्याची संधि उपलब्ध करून घेतली पाहिजे. तरच हिंसामय मार्गापासून पिळली गेलेली जनता अलिप्त

राहूं शकेल. यासाठीं अखिल मानव जातीनें या बौद्धधर्माच्या मूलतत्त्वांचा अंगिकार करणें अत्यावश्यक आहे परंतु या मूलतत्त्वाचें संशोधन होणें आजच्या घटकेला अत्यंत निकडीचे झालें आहे. असें अनुभवांती म्हणणें क्रमप्राप्त झालें आहे. कारण आजच्या विद्यमान बहुसंख्य बौद्धवाङमयांत "भ. बुद्ध हा अवतारी पुरुष आहे" "स्वर्गांतील देवांनी त्याला पापक्षालनार्थ पृथ्वीवर पाठविले," "आत्मा हा अमर आहे," "बौद्ध धर्मांत नि हिंदु धर्मांत बरेंचसें साम्य आहे" त्याचप्रमाणें ईश्वराबद्दलचे भ. गौतम बुद्धाचें विचार संदिग्ध होते. इत्यादि आशयावर जोर देऊन कल्पनेनें रचलेल्या जातक कथांमधून सामान्य जनतेच्या मनांत या धर्माचें विकृत तत्त्वज्ञान बिंबविण्याचा नि त्यांचा बुद्धिभेद करण्याचा कटाक्षानें प्रयत्न केला गेला आहे. आणि यामुळेंच या धर्मास निराळें वळण लागून जीवनसौख्यापासून मानव समाज दुरावला गेला आहे. एवढेंच नव्हे तर खुद्द कांहीं बौद्ध देशांतील जनता प्रचलित धर्मतत्त्वांच्या आधारें निराश होऊन, त्यांना जीवनसौख्यासाठीं अहिंसेचा मार्ग चोखाळावा लागला ही खरी वस्तुस्थिति आहे. यावरून इतर धर्माप्रमाणेंच प्रचलित बौद्धधर्म मानवास सौख्याचा मार्ग दाखविण्यास असमर्थ ठरला आहे असें म्हटल्यास त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

ही बौद्ध जनतेंतील वैभवशाली भावना नि गोंधळाची मीमांसा शोधू गेल्यास हेंच दिसून येईल कीं, भ. बुद्धाचें परिश्रमपूर्वक चिंतनानें मानवप्रगतीच्या आड येणारी जी मुख्य अडगळ "ईश्वरवाद" त्यालाच अलगद बाजूला सारून त्यानें विशिष्ट नैतिक मूल्यांच्या आधारावर जी आपल्या धर्माची उभारणी केली नेमकी तीच बाब धर्मसुधारकांनीं या धर्मांत आणल्यानें या धर्माचा पायाच उखडला गेला. यामुळें आजचा बौद्धधर्मसुद्धां इतर धर्मासारखाच ईश्वराधिष्ठित बनून मानव कल्याणाचा मार्ग त्यामुळें अस्पष्ट नि दुर्गम झाला आहे.

त्याचप्रमाणें भ. गौतमबुद्धाला अवतारी पुरुष ठरविल्यानें त्याच्या परिश्रमाला नि अलौकिक बुद्धिमत्तेला गौण स्थान प्राप्त होत आहे. याचा या सुधारकांना विवेकहि राहिलेला नाहीं.

यासाठीं बौद्धधर्मांचें जें तत्त्वज्ञान आहे तें कोणत्या मूलभूत पायावर आधारलेले आहे याचें मनन नि चिंतन होणें आवश्यक आहे. बौद्धधर्म हा बुद्धिप्रामाण्यावर आधारलेला आहे. इतर धर्माप्रमाणें ग्रंथप्रामाण्यावर आधारलेला नाहीं. यास्तव बुद्धीच्या कसोटीवर त्या धर्माचे अंतर्मुख होऊन मनन केलें तर तें ग्रहणीयच ठरेल.

भ. बुद्धानें एका प्रवचनांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, " भिख्खूहो! आपल्या बुद्धीला जें पटेल त्याचा अंगिकार करा नि आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला अनुसरूनच वागा. केवळ मी सांगतों म्हणून तें सर्व खरें आहे असें मानूं नका. " .....

भ. बुद्धाच्या या उपदेशाच्या सूत्रानुसार बौद्ध धर्मात कालमानानुसार योग्य तो बदल करण्याची पुष्कळशी संधि उपलब्ध आहे. इतर धर्मात तशी नाहीं. अनुभवांतीं आज आपणांस हेंच म्हणावें लागेल कीं, ' भ. बुद्धानें निर्धारपूर्वक सांगितलें होतें कीं, या धर्मतत्त्वानुसार मानवानें आचरण केल्यास ते सर्व सुखी होतील. ' पण तो मानव आज सुखी झालेला नाहीं. सर्वसामान्य जनता दुःखमुक्त झालेली नाहीं. उलट तिच्या दुःखांत अधिकाधिक भर पडत असलेली दिसत आहे. त्याचें कारण काय बरें असावे? माझ्या मतें गौतमबुद्धानें सांगितलेलें तत्त्वज्ञान शुद्ध स्वरूपांत आज अस्तित्त्वांतच तरी राहिलेलें नसावें किंवा धर्मसुधारकांनीं स्वार्थाखातर ते बुद्धिपुरस्सर लुप्त करून तरी टाकले असावें. त्यामुळेच ज्यांना त्या तत्त्वज्ञानाची नितांत गरज आहे त्या पीडित जनतेपर्यंत ते येऊच शकलें नाहीं. जें आलें तें तत्त्वज्ञान विकृत नि अशुद्ध स्वरूपांत आल्यामुळें त्या जनतेचा या धर्माबद्दल भ्रमनिरास होऊन, ती अगतिक बनली आहे.

ज्याप्रमाणें स्वच्छ पाण्याच्या प्रवाहांत मध्यंतरीच एकाद्या गढूळ पाण्याचा लहानसा कां होईना, असा प्रवाह येऊन मिळाला तर त्या मूळच्या प्रवाहास गढुळपणा प्राप्त होऊन, त्याचें सर्व पाणी अशुद्ध होतें. त्याप्रमाणेंच या बौद्धधर्माची अवस्था झाली आहे अशी माझी ठाम समजूत आहे.

म्हणूनच या धर्माचें मूलतत्त्व तरी काय असावें? त्याचप्रमाणें या धर्मास विकृत स्वरूप कोणी व कां आणलें असावें? याबद्दलचे माझे विचार निर्भयतेनें मांडण्याचें धाष्टर्य करीत आहे. त्याला सूज्ञ बौद्ध जनतेनें हंसक्षीर न्यायानें विचार करावा अशी माझी अपेक्षा आहे.

७३६०८

## सिद्धार्थ गौतमाची तत्त्वसंशोधनासाठीं धडपड

दारिद्र्यानें त्रस्त झालेला निर्धन माणूस सधन होण्यासाठीं धडपड-तांना किंवा राज्यसत्ता मिळवून ऐषारामी जीवन जगण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या भिकाऱ्याच्या कथा अनेकवेळां ऐकण्यांत, वाचण्यांत येतात. परंतु ऐषारामी जीवनाचा नि राजसत्तेचा स्वखुषीनें त्याग करून, आयुष्यांतील पंचेचाळीस वर्षे भिक्षापात्र हातीं घेऊन अक्षरशः भीक मागणारा एक राजपुत्र आपल्या भारतांत होऊन गेला. त्याचें नांव सिद्धार्थ

स्वतःस मोक्षप्राप्ती व्हावी नि स्वर्गात अढळस्थान मिळावें म्हणून गृहत्याग करून स्वहितासाठीं संन्यास पत्करणारे अनेक ऋषि-मुनींच्या कथा पुराणांत आहेत. परंतु अखिल मानव सुखी व्हावा नि मानवांमानवा-मध्यें प्रेमभाव व शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून स्वर्गीय सुखाचा त्याग करून सिद्धार्थानें संन्यास पत्करला.

जगांत जें अफाट दुःख भरलें आहे. त्याचें कारण शोधण्यासाठीं सिद्धार्थ ईश्वराकडे जाण्यास निघाला. कारण त्यानें जो पुर्वायुष्यांत हिन्दू धर्मशास्त्र-पुराणांचा अभ्यास केला होता, त्या पूर्व संस्कारानुरूप त्याची हीच धारणा झाली होती कीं, या जगांतील सर्व प्राणिमात्राचा निर्माता नि कर्ता-करविता एकमेव ईश्वरच आहे. मग त्याचीच प्रत्यक्ष भेट घेऊन, जगांतील दुःखाचें नि सर्व प्रकारच्या विषमतेचें कारण त्यालाच विचारून खात्री करून घ्यावी.

म्हणून सिद्धार्थानें भिन्न भिन्न धर्मग्रंथांतून ईश्वराप्रत जाण्याचें वा ईश्वराला प्रसन्न करून घेण्याचें जे जे मार्ग नि विधि दर्शविले होते ते सर्व, आपलें गुरु महापंडित **अडार कालाम** व महासंन्यासी **उद्रक** यांच्या मार्ग-दर्शनाखालीं प्राणांतिक हालअपेष्टा सहन करून, पडताळून पाहिल्या. परंतु ईश्वरदर्शनाचें कोणतेच लक्षण त्याला दिसलें नाहीं.

पूर्ण सहावर्षे गया प्रांतातील '**वेरुवेला**' या घोर अरण्यांत खडतर तपश्चर्या करून, ईश्वरप्राप्तीकरितां प्रयत्नांची पराकाष्ठा केली, परंतु त्यांत यश येण्याचे कांहीच चिन्ह दिसेना म्हणून त्यांनीं तो नाद सोडून दिला नि तो गया या स्थळीं एका पिंपळाच्या वृक्षाखालीं याचा विचार करीत बसला

ह्या विचारमंथनांतून त्याची अशी खात्री झाली कीं, या जगांत ईश्वर म्हणून कसलीच चीज नाहीं. तो निव्वळ भास आहे. कल्पनेचें तें खेळणें आहे.

अशा प्रकारें ईश्वराबद्दलची मनाची पूर्ण खात्री करून घेऊन, निरीश्वरवादाचा छातीठोकपणें पुकारा करणारा सिद्धार्थ हा महापुरुष जगांतील पहिलाच नि शेवटचाच होय. मग या निर्गुण, निराकार अशा काल्पनिक ईश्वराचें अस्तित्त्व कोठून नि कसें निर्माण झालें ? या शंकेचें निरसन असें करतां येईल कीं, निसर्गाच्या घडामोडीच्या अज्ञानांतूनच मानवानें ईश्वराची निर्मिती आपल्या कल्पनेंतून निर्माण केली आहे. आप, तेज, वायु आणि विद्युत् यांच्या घडामोडीलाच तो चमत्कार समजू लागला नि त्या घडामोडीच्या पाठीमागें कोणीतरी अदृश्य व अद्भूत अशी शक्ति असून, तिलाच तो ईश्वर समजूं लागला.

निरनिराळ्या काळीं मानवाच्या निसर्गांतील स्थानासंबंधी पुरेशा ज्ञानाच्या अभावी निरनिराळ्या कल्पना गृहीत कृत्ये म्हणून पुढें आल्या आणि त्या त्या काळांत कदाचित् त्या कल्पना उपयुक्तहि ठरल्या असतील; परंतु कालांतरानें त्यांतील चुका स्पष्ट झाल्यानंतरदेखील त्यांचा माणसाच्या मनावरील पगडा कायम राहिला. यामुळें बराच काळ पावेतों माणसाला आत्मस्वरूपाचा योग्य तो बोध होऊं शकला नाहीं. अशीच गृहीत कृत्यरूप एक कल्पना म्हणजे ईश्वरासंबंधीची 'निर्माता' ही होय. यामुळें मानव हा आपली कृति, विचार, इत्यादि सर्व बाबतींत संपूर्णपणें ईश्वरालंबी वा ईश्वराच्या हातचे बाहुलेच बनला. आणि या संपूर्णपणें परावलंवी अवस्थेंत तो ' कर्माच्या ' अनुल्लंघनीय बंधनांनी जखडला गेला. त्याचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाले, तो सर्वस्वी त्या काल्पनिक ईश्वरी इच्छेनुसारच वर्तन करीत राहिला.

परंतु मानवाच्या या अवस्थेंत आस्ते आस्ते परिवर्तन घडून येत असल्याचे आज आपण अनुभवीत आहोंत. आज कांहीं लोक ईश्वराच्या आस्तित्वाबद्दल साशंक आहेत; तर कांहीं मुग्धता धारण करून आपापल्या नैमित्तिक कार्यांत दंग असल्यामुळे ईश्वराचा आधार जवळ जवळ त्यांनीं सोडल्यासारखेंच ते वावरत आहेत.

अलिकडे तर विज्ञानाच्या उन्नतीमुळें आपण काय अनुभवीत आहोंत ? तर परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या कल्पना करण्याची आवश्यकता विज्ञानानें नष्ट केली आहे. " निर्माता " म्हणून ईश्वराकडे पाहण्याची गरज आतां संपली असून त्याऐवजीं नियमबद्ध असलेल्या विश्वाचें विहंगम दृश्य आतां पुढें आलें आहे, ज्या सद्वस्तुचें हें विश्व बनलें आहे. तिच्या गुण-धर्माव्यतिरिक्त अन्यत्र या नियमांचा ईश्वराचें अस्तित्व न मानतांहि आपलें क्षीर वर करण्याची संधि विज्ञानानें मानवाला दिली आहे. आणि जों जों विज्ञानाची प्रगति होत जाईल तों तों ईश्वर हा शब्दच बोलण्या-वाचण्यांत कालांतरानें नष्ट होईल अशी कल्पना करण्यास कोणतीच हरकत नाहीं.

अडीच हजार वर्षांपूर्वीं सिद्धार्थ गौतमानें स्वानुभवांतून जो निरीश्वर-वादाचा सिद्धांत व्यक्त केला त्यावेळीं धर्ममार्तंडांनीं व इतरांनीं-' अविचारी, ' नास्तिक ' म्हणून त्याची अवहेलना केली असेल. परंतु आज विसाव्या शतकांत त्याच्या सिद्धांतांची सत्यता पटूं लागली आहे. बौद्धधर्माचा प्रसार भारताबाहेर विशेषत: पाश्चात्य देशांत झाल्यानें तेथील लोकांच्या डोक्यांतून ईश्वराच्या अस्तित्वाचें खूळ जस जसें कमी होत गेले तस तसा त्यांचा कल विज्ञानाकडे नि निसर्गाच्या घडामोडींची उकल सोडविण्याकडे लागला. अर्थात त्यामुळेंच आश्चर्यकारक असे नवें नवें शोध लागून आज मानवसौख्यांत भर घालण्यास कारणीभूत झाले आहेत.

अलिकडे तर मानवानें आपल्या बुद्धीच्या जोरावर विज्ञानांत इतकी प्रगति केली आहे कीं, पृथ्वीवरील गूढ ज्ञानाचें तर त्यानें आकलन केलेंच परंतु पृथ्वीबाहेरील कोट्यावधि मैल दूर असलेल्या ग्रहांचें गूढ उकलून काढण्यांतहि यश मिळविलें आहे-अर्थात हें संशोधनाचें कार्य करणारांच्या डोक्यांत ईश्वराच्या अस्तित्वाचें खुळचट वेड असतें, अंधश्रद्धा असती तर ईश्वराच्या कर्तृत्वाला आव्हान करणारे हे अभूतपूर्व शोध लागूच शकलें नसते.

## भारताच्या प्रगतींत अडथळा

आपण आपल्या भारताकडे दृष्टिक्षेप टाकल्यास काय दिसतें ? या

देशांत देवाधर्माच्या अंधश्रद्धेची पकड इतकी घट्ट बिबली गेली आहे कीं, आज जगाच्या आपण शेंकडों वर्षे मागें आहोंत. ईश्वराच्या काल्पनिक कर्तृत्वावर विश्वास ठेवून आपण अगतिक नि कर्तृत्वहीन बनलों आहोंत. सौख्यापासून आपण वंचित राहिलों आहोंत.

या देशांतील लोकांवर ईश्वर, आत्मा, स्वर्ग, नरक या काल्पनिक बाबींचा पगडा अधिक असल्यामुळें विज्ञानाकडे त्यांनीं पाठ फिरविली आहे. या जगांत जिवंतपणीं आपलें काय होतें, यापेक्षां मेल्यावर आपण स्वर्गांत जाणार कीं नरकांत या चिंतेचाच पगडा या देशांतील लोकांवर अधिक आहे. काल्पनिक ईश्वराच्या भजनीं लागून मेल्यावर आपलें भले व्हावें याची जिकडे तिकडे धडपड चाललेली दिसते. श्रम, पैसा, वेळ नाहक खर्चीं घालून, तीर्थाटनाला जातात नि तेथें ईश्वराला नवसाचें आमिष दाखवून कृतार्थ झाल्याचें समाधान मानून घेतात. रुद्राक्षाच्या माळा गळचांत घालून तिन्हीं काळ भजनांत दंग झालेले दिसतात, ढोंगी बुवाच्या नादीं लागून त्यांच्या बुवाबाजीला उत्तेजन देणारे या देशांतच अनेक लोक सांपडतील.

मेल्यावर सुखी व्हावें म्हणून किंवा आपल्याच कर्तृत्वानें झालेल्या वाईट गोष्टीचें पाप धुवून जावें म्हणून कुंभमेळा–सिंहस्थांत गंगा नदीवर लाखोंच्या संख्येनें एकदम जाऊन, त्याठिकाणीं गर्दींत चिरडून मृत्युमुखीं पडलें तरी देवाच्या दारीं मृत्यु आल्याचें समाधान मानणारे नि पुण्यवान् समजणारे लोक या देशांत आहेत. अशा कितीतरी अज्ञानमूल बाबींना या देशांतील लोक अद्याप चिकटून असल्यामुळें त्याची प्रगति रोखली गेली आहे.

आश्चर्य हें कीं, पाश्चात्य शिक्षण घेतलेले या देशांत सुशिक्षित म्हणविणारे लोकसुद्धां देवाधर्माच्या नांवानें असा कांहीं खुळचटपणा करतात कीं, त्यांच्या ज्ञानाची कींव करावी तितकी थोडीच होईल. देवा-धर्माच्या नांवानें या देशांतील माणसांचीं मनें दुबळीं करणाऱ्या अशास्त्रीय, अर्थशून्य नि खुळचट विधीचें जें स्तोम सगळीकडे अद्याप टिकून आहे त्याला हे सुशिक्षित म्हणविणारे लोकच बहुतांशी कारणीभूत आहेत. त्यामुळें बहुसंख्य अशिक्षित लोकांच्या मनांत अगतिक नि कर्तव्यशून्य बनविणारे विचार अहोरात्र जे ठांसले जात आहेत ते या देशाची प्रगति होण्याच्या मार्गातील एक

मोठ्यांतला मोठा अडथळा आहे हें या सुशिक्षितांच्या ध्यानींमनींहि येत नाहीं.

भारताची संस्कृति कोणत्याहि राष्ट्रापेक्षां फार प्राचीन आहे यांत बिलकूल संदेह नाहीं. नि त्याबद्दल आम्हां भारतीयांना मनापासून तिचा अभिमानहि वाटतो. परंतु त्या अभिमानाच्या कैफांत आम्हीं किती काळ गुंग रहावयाचे ? हा आजचा निकडीचा प्रश्न होऊन बसला आहे.

त्या आमच्या प्राचीन संस्कृतीचें हिंदूधर्माच्या मजबूत बांधानें जे डबकें बनविलें गेलें आहे, त्यामुळें त्या डबक्याचा निचरा होण्यास, अगर त्यांत नवीन सुधारणेचा प्रवाह येण्यास बिलकूल वाव राहिला नाहीं. त्या संस्कृतिरूपी डबक्याची आतां केव्हांच दुर्गंधी यावयास लागून, तींत निर्माण झालेल्या जंतुमुळें भारतरूपी शरीराचें आरोग्य दूषित करून टाकलें आहे. ही वास्तव परिस्थिति आम्हां भारतीयांना कळत असूनहि उमगत नाहीं. याचें काय बरें कारण असावें ? याचा शोध नि बोध झाला पाहिजे.

या बाबतींत अगदीं स्थूलमानानें जरी विचार केला; तरी कोणीहि डोळस मनुष्य हेंच सांगू शकेल कीं, " या देशांतील अगदीं पुरातन असलेला वैदिक किंवा ब्राह्मणी धर्म व त्याचे अनैसर्गिक खुळचट तत्त्वज्ञान नि त्याचे भारतीयांच्या मनावर अगदीं खोलवर बिंबवले गेलेले संस्कार हेंच सर्वस्वी कारणीभूत आहेत. त्या भ्रामक तत्त्वज्ञानानें भारतीय जनतेची दृष्टि संकुचित बनून, इतर राष्ट्राप्रमाणें आपले उन्नतीचे मार्ग आक्रमण्यास ती सर्वस्वी असमर्थ ठरली आहे. "

भारताच्या मागाहून उदयास आलेलीं जगांतील इतर राष्ट्रें, आज उन्नत शिखरावर आरुढ झालेलीं दिसत आहेत. परंतु आपल्या भारताची मजल त्या शिखराच्या पायथ्यापर्यंतसुद्धां गेलेली नाहीं हें कशाचें द्योतक ? याला सर्वस्वी कारणीभूत या देशांतील आस्तिकवादी नि बुरसटलेलें तत्त्वज्ञानच होय. त्या तत्त्वज्ञानानेंच भारतीय जनतेला अगतिक बनविलें आहे यांत बिलकूल शंका नाहीं.

## या अनर्थाला कारण सर्वस्वी सुशिक्षितच.

ईश्वराच्या काल्पनिक निर्मितीचा नि धर्माच्या अनैसर्गिक रूढी–निय

मांचा पगडा, विज्ञानाची उकल होण्यापूर्वी कांहीं काळ स्वार्थी धर्ममार्तंडांना, अज्ञ जनतेवर बसविणें शक्य झालें. आणि बहुसंख्य अशिक्षित जनतेचें आंधळे-पण तसेंच कायम राखण्यासाठीं धर्मशास्त्रांतून साक्षात्काराचें खुळ माजवून त्यांना भ्रमांत ठेवण्यास या स्वार्थांध ब्राह्मण पुरोहितांना साधलेंहि. परंतु आजच्या विज्ञानयुगांत नि इतक्या वर्षांच्या गतअनुभवावरून या भ्रामक कल्पना उधळून लावण्यासाठीं भरपूर पुरावे असूनहि आजचे विद्वान् डोळचा-वर कांतडे ओढून स्वस्थ आहेत, याचेंच महदाश्चर्य वाटतें. त्यांची ही वाग-णक म्हणजे अशिक्षित-अडाणी जनतेच्या रूढीप्रियतेला ही मूक संमतीच नव्हे कां ?

प्रचलित जगांत पाप-पुण्य, आचार-दुराचार, इत्यादि सर्वच केवळ कल्पना आहेत; ईश्वराच्या अधिसत्तेखालीं जगाचा व्यवहार चालतो याला कवडीचा आधार नाहीं. स्वर्ग-नरक आणि बंधन-मोक्ष हे बालिशवृत्तीचे भ्रम आहेत; पूजा-उपासना या पामरांच्या वंचनेसाठीं आहेत. त्याचप्रमाणें देव-देवीच्या लोकोत्तर कल्पना हीं केवळ थोतांडें आहेत, हें आजच्या प्रगत विज्ञानाच्या आधारें पटवून देण्यास सुशिक्षितांना भरपूर संधि उपलब्ध असतांनाहि ते कांहींच हालचाल करण्यास धजत नाहींत. या त्यांच्या कच्च-खाऊ वृत्तीला दांभिकपणाशिवाय दुसरें कोणतें विशेषण शोभेल ?

जगांतील कोणत्याहि राष्ट्रापेक्षां भारताची संस्कृति नि परंपरा अति-प्राचीन असतांना, हा देश इतका मागासलेला नि बुरसटलेल्या सनातनी विचारसरणीचा कां राहावा ? याचा आमचे विद्वान कधीं विचारच करीत नाहींत. उलट त्या जुन्यालाच चिटकून राहण्याचा अट्टाहास त्यांच्या वाग-णुकींत दिसतो. हिंदूधर्माच्या खुळचट धार्मिक रूढी-विधिमुळें नि साक्षात्कार-चमत्कारांच्या कथांवर विश्वास ठेवून वागणाऱ्या आपल्या भारतीयांकडे पाहून इतर लोक आपली कुचेष्टा करीत असतात याची खंतहि कुणास शिवत नाहीं. एवढें कशाला, या हिंदूधर्मामुळें या देशाची जी अपरिमित हानी झाली आहे; ती भरून काढण्यासाठीं त्या धर्मांत कांहीं सुधारणा कराव्यात किंवा तें शक्य नसेल तर त्या धर्माचाच त्याग करून या देशाचा नि त्यांतील जनतेचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं अखिल मानव कल्याण साधणारा बौद्धधर्म आणला तर आजपावेतों झालेली नि पुढें सतत

होणारी हानि भरून काढण्याच्या दृष्टीनें मदतच होईल; याचा विचार आमचे विचारवंत करण्याच्या मन:स्थितींत तरी आज आहेत कां? या वैदिक किंवा हिंदूधर्मानें शेंकडों वर्षांपासून अनंत अत्याचार करून, या देशांतील जनतेला इतकें भेकड नि अविवेकी बनविलें आहे कीं, त्याचा अनिष्ट परिणाम नि नामुष्की अद्याप आपणांस निमूटपणें सहन करावी लागत आहे. या धर्मानें कोट्यावधि विधवा अग्नींत जाळल्या, पशुप्रमाणें स्त्री–पुरुषांचा क्रय–विक्रय केला; कुत्र्यामांजराच्या स्पर्शानें माणूस विटाळत नाहीं, त्यांच्या विष्ठेनें चिर–दुषित होत नाहीं, परंतु ब्राह्मणांनीं ठरविलेल्या अस्पृशांच्या (चांडाळाच्या) स्पर्शानें हे सर्व अनर्थ होतात. असा कांगावा करून; त्या समाजाचा हजारों वर्षें अनन्वित छळ केला. देवालयें नि मंदिरें यांच्यांत सोन्यारुप्याचे नि हिऱ्यामाणकांचे ढीग रचून परकीय लुटारूंना निमंत्रणें दिलीं. आणि शत्रूंना तोंड देण्यासाठीं एकजूट करण्याऐवजीं आपसांत देवा–धर्माच्या नांवाखाली जातीजातींत उच्च–नीचतेची तेढ निर्माण करण्यांतच धर्माभिमान नि रूढी समजण्यांत आली. आणि अशा रीतीनें बहुजनसमाजाला धर्माच्या नांवाखालीं लुटून त्यांच्या निढळाच्या घामाची कमाई बरबाद केली गेली. सर्वांत मोठा अनर्थ म्हणजे देवा–धर्माच्या अनिष्ट रूढी–नियमाखालीं या देशांतील जनतेला अज्ञानांत खितपत पडण्यास भाग पाडलें.

हा घोर अन्याय दूर करण्यास आधुनिक विद्वान डोळसपणें सरसावून पुढें येण्याऐवजीं " बहुजन समाजाच्या रोषास बळी पडूं " या भीतीनें गप्प बसलेले दिसतात. म्हणूनच माझ्या मतें **ज्या दिवशीं हा हिंदू धर्म या देशांतून नष्ट होईल, त्या दिवशीं भारतांतीलच नव्हे** तर अखिल **मानवावरील** एक **मोठा कलंक नाहींसा होण्यास मोठी मदत होईल.** ही वास्तव परिस्थिति या देशांतील बुद्धिवाद्यांना आकलन होऊं नये यापेक्षां दुसरें दुर्भाग्य तें कोणतें असूं शकेल ?

भारतांतील अशा कांहीं विद्वान पंडितांची उदाहरणें आपणांस दिसतील कीं, या हिंदूधर्माच्या भ्रामक आचार–विचारांचा पगडा, अज्ञान, अडाणी लोकांपेक्षाहि त्यांच्यावरच अधिक प्रमाणांत बसलेला आढळेल.

त्यांच्या त्या वेडगळ विधि–आचाराकडे पाहून, हंसावें कीं रडावें हेंच समजत नाहीं.

उदाहरणार्थ–पं. मदनमोहन मालवीय हे गाढे विद्वानपंडीत भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं म. गांधी इत्यादि कांहीं पुढाऱ्यासमवेत इंग्लंडला गेले असतां, आजच्या या २० व्या शतकांत त्यांनीं जातांना भारतांतून आपलें पिण्यासाठीं सोंवळे पाणी बरोबर घेऊन गेल्याचे नि हा कशाचा परिणाम ? त्या देशांत या ब्राह्मण पंडिताला स्वच्छ, शुद्ध पाणीसुद्धां मिळूं शकलें नसतें कां ? पण नाहीं ! हिंदूधर्माच्या या खुळचट नि आचरट रूढी विधींचा बसलेला हा पगडा; असल्या बुद्धिवाद्यांनाहि सैल करतां येऊं नये ? हें फाजिल दुरभिमानाचें द्योतक नव्हें काय ? जगांत आमची संस्कृति श्रेष्ठ, आमचा धर्म श्रेष्ठ नि आम्हीं म्हणजे ब्राह्मण श्रेष्ठ या निरर्थक अभिमानानें आपली नि राष्ट्राची कशी बेअब्रु घडवून आणली जात आहे याची जाणीव अशा सनातन्यांना होऊं नये याचेंच नवल वाटतें.

दुसरें उदाहरण श्री. श्रीनिवास रामानुजन् या महान् गणिती पंडिताचें देण्यासारखें आहे. त्याच्या इतका गणितज्ञ त्याकालीं जगांत कोणी नव्हता असें सागतात. इंग्लंडसारख्या सुधारणेच्या शिखरावर गेलेल्या देशांत या भारतीय पंडिताला गणिताचा प्रोफेसर म्हणून बहुमानानें खास तेथें बोलावून घेण्यांत आलें. सदर प्रो० महाशय इंग्लंडला गेले परंतु जातांना या देशांतील हिंदूधर्माचें खुळचट आचार–विचार बरोबर नेण्यास मात्र ते विसरले नाहींत. शेवटीं त्या आचार–विचारांनींच त्या विद्वान पंडिताचा बळी घेतला. कारण हिंदूधर्माच्या आचार विधीनुसार स्नान–संध्येशिवाय भोजन म्हणजे भ्रष्टाचार, महापाप-या रूढीप्रियतेमुळें इंग्लंडसारख्या थंड प्रदेशांतील सकाळच्या स्नान–संध्येनें त्यांना डबल न्युमोनिया होऊन, त्यांतच त्यांचा अकाली अंत झाला.

अशा या विद्वान पंडिताचा सनातनी सोंवळे–ओंवळेंपणा पाहून अडाणी शेतमजूर काय आदर्श घेतील ? ही या विद्वानांची कृति हिंदूधर्माच्या बुरसटलेल्या अनिष्ट आचारा–विचाराला खतपाणी घालण्याचीच होत नाहीं का ? पाश्चात्य विद्यापारंगत विद्वानांच्या मनावर जर अशा अनैसर्गिक

रूढी–रिवाजांचा पगडा बिंबलेला दिसतो, तर अडाणी–अशिक्षित सामान्य जनतेची काय अवस्था असेल याची कल्पनाच केलेली बरी.

यावरून हा निष्कर्ष निघतो कीं, " जगांत जोपर्यंत सत्तालोलूप सत्ताधारी वर्ग आहे; त्याचप्रमाणें धर्माच्या नांवावर फुकटचे श्रेष्ठत्व मिळविणारे ब्राह्मण पंडित आहेत आणि या सर्वांची भाटगिरी करणारे धर्म आणि त्याच्या दान–पुण्यावर जगणारे ऐतखाऊ ब्राह्मण पाद्री–मुल्ला आहेत,तोपर्यंत या पृथ्वीचा स्वर्ग बनणें सुतराम् शक्य नाहीं ही काळ्या दगडावरील रेघ आहे. म्हणून असले ईश्वराधिष्ठित धर्म पृथ्वीतलावरून जेव्हां नष्ट होतील तेव्हांच **आकाशांतील स्वर्ग कोसळून पृथ्वीवर येईल.**

## भ्रामक कल्पना नष्ट करण्याचे झालेले प्रयत्न.

भारतांतील सुशिक्षित समाजसुधारकांना सर्वाआधीं हें देवा–धर्माचे (भ्रामक समजुती नि खुळचट आचार–विचारांचें) वज्रलेप झालेले संस्कार नष्ट करण्याचें बिकट कार्य करावयाचें आहे, नव्हें त्याचीच आज नितांत गरज आहे त्याशिवाय समाजसुधारणेची किंवा राष्ट्रोन्नतीची अपेक्षाच करणें चुकीचें ठरेल. अर्थात हें कार्य हातीं घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अंगीं तळमळ नि निर्भयता असणें आवश्यक आहे. शिवाय हल्ली हें कार्य करण्यास विज्ञानाच्या संशोधनामुळें नि प्रगतिमुळे तितकेंसें कठीणहि राहिलेलें नाहीं. तसेंच हें कार्य अगदींच नव्यानेंच सुरू करावयाचें आहे असेंहि कांहीं नाहीं तर, ज्यावेळीं या देवा-धर्माच्या भ्रामक कल्पनांचा जिकडे तिकडे बहर आला होता नि विज्ञानाची ओळख कोणाला झाली नव्हती, अशा काळीं कांहीं विचारवंतांना या भ्रामक कल्पनांची जाणीव होऊन; त्यांनीं अत्यंत धाष्टर्यानें यांवर प्रहार करून, हें अज्ञान उजेडांत आणलें होतें. अशा अनेक समाजसेवकांची नांवें आपणांस इतिहासांत सांपडतील. त्यांनीं त्यावेळीं दिलेल्या हादऱ्यांचा परिणाम कदाचित दिसला नसेल परंतु तें कार्य अगदीच फुकट गेलें असें मला म्हणतां येणार नाहीं. त्यांनींच रूळावलेल्या त्या पायवाटेचा आपणांस आतां हमरस्ता तयार करावयाचा आहे.

त्या समाजसेवकापैकीं आपल्या भारतांतील म. कबीर, म. ज्योतिबा

फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादि कितीतरी समाजसुधारकांनीं हें जन-जागृतीचें कार्य केलें आहे. एवढेंच नव्हें तर पाश्चात्य राष्ट्रांतील अनेक विद्वानांनीं आणि सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्यांनींसुद्धां या देवा-धर्माच्या भ्रामक कल्पनांवर जबरदस्त हल्ला करून, त्यांचा फोलपणा सिद्ध करून दाखविला आहे. परंतु त्यांच्या हयातींतला काळ प्रगत विज्ञानाच्या दृष्टीनें नि प्रतिगाम्यांच्या प्रभावी संघटित प्रचारामुळें कमालीचा प्रतिकूल होता. तरीपण अशा परिस्थितींतहि त्यांनीं न डगमगतां अगदीं निर्भयतेनें आपले विचार जगापुढें मांडण्याचें धाष्टर्य केलेंच आणि अखेरपर्यंत प्रतिगाम्यांचा छळ सहन केला.

पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांपैकीं जर्मनीमधील **कार्ल मार्क्स** याचें मत तर त्याच्या विशिष्ट तत्त्वाच्या आधारें त्यानें सर्व जगाला निक्षून सांगितलें आहे कीं, 'मानवाच्या सर्वांगीण उन्नतीच्या आड येणारी सर्वांत मोठी अडगळ म्हणजे देवा-धर्माची होय.' हें पटवितांना त्यानें आपल्या राष्ट्रांतील ख्रिश्चन धर्मांतील भ्रामक कल्पनावर प्रकाश टाकून त्यांवर कोरडे ओढले आहेत. शें-दीडशें वर्षांपूर्वीं त्यानें मांडलेल्या विचाराची सत्यता आज आपणांस अनुभवावयास मिळते.

त्याचप्रमाणें अमेरिकेंतील सुप्रसिद्ध साहित्यिक मार्क ट्वेन उर्फ सॅम्युएल क्लीमेन्स यानें तर आपल्या ख्रिश्चन धर्मावर नि बायबलवर सडेतोड टीका करून त्याचें सर्व ढोंग उजेडांत आणलें आहे. त्यानें एकोणिसाव्या शतकांत (१८९०) लिहिलेल्या आपल्या '**लेटस ऑफ धी अर्थ**' या ग्रंथांत ईश्वर, धर्म, बायबल नि आत्मा यांवर आपले विचार इतके स्पष्ट नि परिणामकारकरीत्या मांडले आहेत कीं, आजच्या काळीं त्यांची सत्यता मनाला बिंबल्याशिवाय राहात नाहीं.

सदर ग्रंथांतील पुढील कांहीं निवडक उतारे पाहा. तो म्हणतो, '...ईश्वर हा अखेर मानवकल्पितच आहे. आणि ईश्वराबद्दलची ही भावना धर्माच्या नांवाखालीं श्रद्धाळू जनतेची पिळवणूक करून तिचें शोषण करणाऱ्या दांभिक आणि संघटित असलेल्या मक्तेदारी वर्गाचें एक प्रभावी हत्यारच आहे.' '...धर्म हा दडपल्या व चिरडल्या जाणाऱ्या शोषित जनांचा उसासा आहे. ईश्वराधिष्ठित धर्म हि पापी प्रवृत्तीची प्रकृति आहे

असा धर्म हा पापाणहृदयी दुनियेचा संकेत आहे; धर्म ही अफूची गोळी आहे. ...'

'... बायबल या धर्मग्रंथांत थोडेंसें थोर काव्य आढळेल हें खरें आहे. त्या ग्रंथांत काल्पनिक कथाहि आहेत; तशी थोडीबहूत नीतिमत्तेचें पण शिकवण आहे. तरीपण बायबलमध्यें डोळ्यांत सतत सलणारें–अति शिसारी नि उबग आणणारें प्रामुख्यानें नि ओतप्रोत असें कांहीं असेल, तर त्यांतील कमालीचा ओंगळपणा, बीभत्सपणा नि असंख्य असत्य होय. एकंदरींत हा धर्मग्रंथ मानणें हा फार मोठा आणि निष्ठूर विनोद आहे. ...'

'... अत्यंत उच्च प्रतीचें सुख हमखासपणें मिळण्याचें कोणतें ठिकाण असेल तर तें स्वर्ग हें होय. म्हणून प्रत्येकाला स्वर्गप्राप्तीची तळमळ लागून राहिलेली दिसते. त्याच्यासाठीं त्यांची सतत धडपड चाललेली दिसते. आणि बहुसंख्य श्रद्धाळू नि धर्मवेडे अशा विकृत स्वर्गसृष्टीचें स्तुतिस्तोत्रच अहर्निश गात सुटले आहेत. अशा या वेड्यांना काय म्हणावें हेंच कळत नाहीं. (चरित्र–दैनिक मराठा दि. २ डिसें. १९६२)

हे विचार मांडणारा मार्क ट्वेन उर्फ सॅम्युएल क्लीमेन्स हा आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रामाणिकपणें, सचोटीनें, नि नेकीनें जीवन कंठणारा अमेरिकेंतील जन्मानें ख्रिश्चन नागरिक होता. त्याच्या ग्रंथांतील उतारा देण्याचा उद्देश हा कीं त्यानें ख्रिश्चन धर्माला उद्देशून मांडलेले विचार हे सर्वच ईश्वराधिष्ठित धर्मांना कसें तंतोतत लागू पडतात; हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्या दृष्टीनें त्यानें केलेलें विश्लेषण हें हिंदुधर्माचेंच वर्णन आहे कीं काय असा क्षणभर भास होतो. म्हणून त्यानें केलेलें विवेचन हें जगांतील बौद्धधर्म सोडला तर सर्वच धर्मांचें तें वास्तव स्थितीचें रेखाटलेलें हुबेहुब चित्रच होय.

अशाच प्रकारचे विचार मांडणारा पृथ्वीच्या दुसऱ्या टोकास म्हणजे आपल्या भारतांत एक थोर समाजसेवक दृष्टा त्याच काळीं म्हणजे एकोणीसाव्या शतकांत होऊन गेला. त्याचें नांव म० ज्योतिराव फुले हें होय. त्यांनींही हिंदुधर्माच्या विकृत तत्त्वज्ञानावर नि भ्रामक कल्पनांवर प्रहार करून लोकशिक्षणाचें कार्य केलें होतें. ते जरी फार मोठे गाढे विद्वान नव्हते तरी त्यांच्या विचारांची झेप किती लांब पल्ल्याची होती याची जाणीव होते.

त्यांच्या कार्यांचा कितपत परिणाम झाला; ही बाब अलाहिदा आहे. परंतु आज ज्या कारणानें राष्ट्राची नि समाजाची हानि पहावयास मिळते त्या देवा–धर्मांच्या वेडगळ नि विकृत तत्त्वज्ञानापासून सावध राहण्याचा इशारा त्यांनीं १०० वर्षांपूर्वी भारतांतील जनतेला दिला होता. यावरूनच त्यांच्या द्रष्टेपणाची कल्पना येते.

म० ज्योतिराव फुले यांनीं त्याकाळीं लिहिलेल्या आपल्या 'सार्वजनिक सत्य' या ग्रंथांत मांडलेले विचार किती मार्मिक नि वस्तुस्थितिनिर्देशक होते, याची आज खात्री पटते. त्यांच्या ग्रंथांतील पुढील कांहीं निवडक उताऱ्यांवरून हें सहज पटण्यासारखें आहे. ...

'...या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढीं म्हणून मानवांनीं धर्मपुस्तकें लिहिलीं आहेत त्यांपैकीं एकाहि ग्रंथांत आरंभापासून शेवटपर्यंत सारखें सार्वजनिक सत्य नाहीं.' ( सा. स. पृष्ठ क्र. ४. )

'... धूर्त व विद्वान् आर्य ब्राह्मणांनीं क्षुद्रादि अति क्षुद्रांस विद्या शिकण्याचें बंद केलें व आपलें वर्चस्व राहण्यासाठीं बुद्धचा स्वकपोलकल्पित भारत–रामायणासारखें ग्रंथ रचले आणि बगळ्यापरी मोठा धार्मिकतेचा आव आणून त्यांतील भाकड दंतकथा रात्रंदिवस अज्ञानी व भोळसट क्षुद्रादिकांस सांगून त्यांचीं मनें एकमेकांपासून कलुषित केलीं. म्हणूनच हे ग्रथ निव्वळ थोतांडें आहेत.' (सार्वजनिक सत्य पृ. २५)

'... सर्व धर्मग्रंथांत स्वर्गाचें आमीष आहे. परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एक तरी गृहस्थास त्यानें स्वर्ग पाहिला म्हणून सांगता येईल काय ? अतिप्राचीन काळीं कांहीं संधिसाधू नि स्वार्थी ब्राह्मण पुरोहितांनीं अज्ञानी जनांस भेडावण्यासाठीं स्वर्ग तयार केला आहे.' ( सा. स. पृष्ठ १४ )

असे कितीतरी बहुमोल विचार, त्याकाळच्या पुष्ट झालेल्या ब्राह्मण वर्गाच्या विरोधाला नि छळाला न जुमानतां म. फुले यांनीं आपल्या ग्रंथांतून, लेखाद्वारें नि शेंकडों व्याख्यानांतून मांडून, जनजागृतीचें बहुमोल कार्य केलें आहे त्याकाळीं बहुसंख्य जनमतावर त्याचा परिणाम कदाचित् झाला नसेलहि. मात्र आजच्या विसाव्या शतकांत त्यांच्या विचारांची मौलिकता अनुभवांती मनाला पटल्याशिवाय राहात नाहीं.

त्याचप्रमाणें म. कबीर या संतांचे–ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलचे विचार तर त्याच्या दोहे–साक्या द्वारें रचलेल्या ओव्या भारतवासियांच्या मुखोद्‌गत आहेत, त्यांनीं आपल्या काव्यांतून मुल्लापंडीतांची नि ईश्वराच्या भ्रामक अस्तित्वाची निर्भीडपणें टर उडविलेली आहे. अशा आशयाचे त्यांचे अनेक साक्या–अभंग दाखविण्यासारखें आहेत. परंतु विस्तारभयास्तव त्या न देणेंच या स्थळीं योग्य ठरेल.

यानंतर भ. गौतमबुद्ध, म. कबीर, आणि म. फुले यांचे कनिष्ठ पट्ट-शिष्य म्हणवून घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'यांनीं तर आपल्या गुरुवर्यांचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून, त्यांचेंच अपुरें राहिलेलें कार्य पुढें नेण्याचें हातीं कंकण बांधिलें. नि या देशांतील बहुजन समाजाच्या उन्नतीप्रित्यर्थ आणि भारताची आजपर्यंत झालेली बदनामी टाळण्यासाठीं त्यांनीं हिंदुधर्म सुधारणेचें कार्य त्यांनीं हातीं घेतलें. त्यांची मनोमन खात्री होती कीं, आपल्या गुरुनां जरी त्या काळीं त्यांच्या कार्यांत अपयश आलें असलें, तरी त्यांचें तें कार्य **चिरसत्य स्वरूपाचें** असल्यानें,तेंच आपण या वेळीं पुढें नेलें तर या २० व्या शतकांत आपणांस खात्रीनें यश येईल.

परंतु हिंदू धर्माच्या प्रतिगामी बुरसटलेल्या विचारसरणीच्या पाशवी बहुमतापुढें त्यांना अपयशच पत्करावें लागलें. त्यांनीं धर्मसुधारणेसाठीं केलेली भाषणें, लिहिलेले ग्रंथ; केलेले सत्याग्रह नि अखेरच्या घटकेला पार्लमेंटपुढें आणलेलें हिंदुकोड बील, हे सर्व प्रयत्न जमेस धरून आणि आपल्या गुरु-वर्यांना या बाबतींत आलेला अनुभव नि त्यांचा झालेला छळ डोळ्यापुढें धरून; शेवटीं त्यांना अखेरचा निर्णय घेणें भाग पडले कीं, "**या हिंदू धर्माची सुधारणा करूं पाहणें म्हणजे कालाचा, बुद्धीचा नि आयुष्याचा निरर्थक व्यर्य करणें होय.**" म्हणून ज्यांना या धर्माच्या कर्तृत्वशून्यतेची नि भ्रामकतेची जाणीव झाली असेल, त्यांनीं या धर्माचा त्याग करावा. आणि आत्मोन्नति साधणाऱ्या **बौद्ध धर्माचा** अंगिकार करावा. कारण "माणसा-साठीं धर्म आहे. धर्मासाठीं माणूस जन्माला आला नाहीं." या उक्तीनुसार जो धर्म मनुष्याचें कल्याण करूं शकत नाहीं त्या धर्माचा अभिमान तरी कां म्हणून बाळगावा? त्यापासून दूरच राहिलेलें बरें! या डॉ. बाबासाहेबांच्या घोषणेला इ. स. १९५६ सालीं लाखों लोकांनीं साथ देऊन हिंदू धर्माचा

त्याग केला नि अशा रीतीनें त्या धर्मास जबरदस्त टोला दिला गेला. परंतु तो संपूर्ण जमीनदोस्त होण्याची आज अत्यंत निकड आहे. त्यासाठीं बहुजन समाजांतील सुशिक्षित तरूणांनीं आंतरिक तळमळीनें नि राष्ट्रीय निष्ठेनें सरसावून पुढें आलें पाहिजे, तरच आजच्या बदलत्या जगांत भारताची धडगत आहे.

आज जगांतील कांहीं आत्मोन्नतीच्या शिखरावर आरूढ झालेल्या राष्ट्राकडे पाहिलें नि अशा विज्ञानयुगाच्या काळांतहि या देशांतील मुठभर संधिसाधू-प्रतिगामी धर्ममार्तंड बहुजन समाजाला सनातनी बुरसटलेल्या विचारसरणींत गुरफटून ठेवून, त्यांना कोठें नेत आहेत; याचा अंतर्मुख होऊन विचार केला तर आपणांस काय दिसेल ?

## जग कुठें आणि भारत कुठें ?

आज रशिया आणि अमेरिका येत्या कांहीं वर्षांतच मानवाला चंद्रावर प्रत्यक्ष घेऊन जाण्याच्या शोधांत मग्न आहेत, तर या देशांतील लोक त्या चंद्राला परमेश्वर समजून त्याची आराधना करण्यांत वा चतुर्थीला चंद्राला पाहिल्यावर चोरीचा आळ येईल, या भाकड कथांवर विश्वास ठेवून तोंड लपवितांना दिसतात. पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाची कक्षा उल्लंघून सूर्याप्रद जाणारे अग्निबाण तयार केले आहेत, तर या देशांतील लोक रथसप्तमीला सूर्याच्या चित्राची भक्ति करण्यांत अद्याप गर्क आहेत. इतर देशांतील लोक पृथ्वीपासून कोटयावधि दूर असलेल्या ग्रहांच्या निरीक्षणास्तव जीव धोक्यांत घालून प्रत्यक्ष तेथें जाण्याच्या तयारींत आहेत, तर येथील लोक मात्र कुंडलीच्या ग्रहदशांचें गणित करण्यांत धन्यता मानतात. ते लोक अंतराळयानांतून जास्तींत जास्त पृथ्वीप्रदक्षिणा घालण्याच्या चढाओढींत दंग आहेत; तर या देशांतील लोक गाईला प्रदक्षिणा घातल्यानें मिळणाऱ्या पृथ्वीप्रदक्षिणेच्या पुण्यावर संतुष्ट आहेत.इतर लोक पृथ्वीबाहेरील ग्रहमालिकेंतील प्रत्येक ग्रहांचे निरीक्षण नि परीक्षण करण्याच्या प्रयत्नांत चूर आहेत; तर इथले लोक अष्टग्रहीचा कोप होऊं नये म्हणून यज्ञांत खंडो-

गणती तूप जाळून त्यांना शांत करण्याच्या खुळचट प्रयत्नांत अद्यापहि गर्क असलेले दिसतात.

पृथ्वी, चंद्र नि सूर्य एका रेषेंत आल्यानंतर एकमेकांची सांवली पडल्यानें सूर्य किंवा चंद्रावरील भाग छायाछेदित दिसतो. त्यालाच पृथ्वीवरील लोक ग्रहण म्हणतात. त्यांत राहू केतूनें चंद्रसूर्याला गिळण्याचा भ्रामकपणा विज्ञानशास्त्रज्ञांनीं केव्हांच दूर केला आहे हें सारें जग मानतें. परंतु या भारतांतील चांगलें शिकले-सवरलेले लोकसुद्धां ग्रहणाच्या प्रसंगीं उपवास धरून नदी–समुद्रावर स्नानविधीसाठीं नि 'दे दान सुटे गिराण' मागणारांस दान करून, पुण्य हंशील करण्याच्या खुळचट प्रयत्नांत धडपडलेले दिसतात.

अशा कितीतरी अज्ञानमूलक कल्पना कोठें आहेत, तर "जेथें पिकते तेथें विकत नाहीं" या उक्तीनुसार ज्यानें निरीश्वरवादाचा पुकारा करून ईश्वर ही मानवाच्या प्रगतीतील मोठी अडगळ आहे. असें ठांसून सांगणाऱ्या त्या सिद्धार्थ गौतमाचा जन्म ज्या देशांत झाला तोच भारत देश आज ईश्वराच्या भ्रामक कल्पनेनें मागासलेला राहावा हें देशाचें दुर्दैव नव्हें काय ?

सिद्धार्थ गौतमानें जो निरीश्वरवादाचा मूळ सिद्धांत शोधून काढला नि त्या सिद्धांताच्या पायांवर पुढें आपल्या बौद्ध धर्माचें मंदिर उभें केलें, त्या सिद्धांताच्या आधारें शास्त्रीय प्रगतीचें नंदनवन फुलविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगल्यास खराखुरा समतेचा स्वर्ग निर्माण होईल. नि या देशाची रोखलेली प्रगति पुढें जाण्यास निश्चित मदत होईल यांत बिलकूल संदेह नाहीं.

## भारतांतील अभ्युदयाचा मार्ग

परंतु भारतीयांचें हें स्वप्न साकार होण्यास जी मोठी अडगळ आहे; ती म्हणजे या देशांतील बहुसंख्य जनतेवर ज्या प्रतिगामी धर्माचा पगडा आहे, "त्या वैदिक किंवा ब्राह्मणी धर्माचीच आहे." कारण येथील बहुसंख्य जनतेवर त्या धर्मांतील कपोलकल्पित भाकडकथांची नि अंधश्रद्धेची जी पक्कड हजारों वर्षें घट्ट बिबली गेली आहे; ती सैल होणें आजपर्यंतच्या अनुभवावरून सुतराम शक्य नाहीं. म्हणून जर आपणांस जगाच्या बरोबर

उन्नतीच्या शर्यतींत भाग घ्यावयाचा असेल; तर अशा ग्रंथप्रामाण्य नि ईश्वराधिष्ठित धर्मांना दूर सारून, आत्मोन्नतिबरोबरच समाजोन्नति नि राष्ट्रोन्नतीस वाव मिळणाऱ्या धर्माची कांस धरणेंच केव्हांहि उचित ठरेल. असा धर्म जगांत जर कोणता असेल तर तो म्हणजे भ. गौतम बुद्धाचा "बौद्ध" धर्मच होय. भ. बुद्धाचें तत्त्वज्ञान हाच भारतालाच नव्हे तर जगाला एकमेव आधार आहे.

म्हणूनच डॉ. आबासाहेब आंबेडकर यांनीं आपल्या देशाची ही निकडीची गरज ओळखली. 'या देशांतून लुप्त केला गेलेला बौद्धधर्म'च या देशाची प्रगति विनाविलंब घडवून आणण्यास मदत करील, अशी त्यांची ठाम समजूत झाली नि त्यांनीं ती आपल्या कोटयावधि अनुयायांसह प्रत्यक्षांत हि आणली. हिंदू धर्म किंवा वैदिक धर्म हा अतिप्रतिगामी, प्रगति रोखणारा नि अज्ञानमूलक धर्म आहे याची प्रचिती कट्टर हिंदूधर्माभिमानी विचारवंतांना नाहीं असें नव्हें ! तर याची कित्येकांना पूर्ण जाणीव आहे.

परंतु त्यांना उघड विरोध करण्याचें धैर्य मात्र होत नाहीं. एवढेंच नव्हें तर या धर्मांत मामुली सुधारणा घडवून आणण्यासाठीं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं या देशाच्या मध्यवर्ति शासनसंस्थेतर्फे प्रयत्नहि केले होते. परंतु त्या धर्मांतील पुरोगामी समजणाऱ्या एकाहि देशभक्तानें त्यांना साथ देण्याचें धैर्य दाखविलें नाहीं.

यावरून या धर्माच्या प्रतिगाम्यांनीं बसविलेली धार्मिक पकड किती घट्ट आहे याची प्रचिती येतें. परंतु या देशांतील सुशिक्षितांना या धर्मानें केलेली राष्ट्राची सर्वस्वी अधोगति यांच्या अद्याप लक्षांत येऊं नये याचेंच आश्चर्य वाटतें.

## भारताच्या सामर्थ्यविनाशाची कारणें

आज जगांतील इतर उन्नत राष्ट्राच्या मानानें आपल्या देशाची जी अवनत कळा पहावयास मिळते, अगर गेल्या आठव्या शतकापासून आपल्या राष्ट्रावर जीं परचक्रें येऊन आपल्या सर्वस्वाची हानी झाली, त्याचें प्रामुख्यानें जर कोणतें कारण असेल तर या देशांतील हिंदुधर्म नि त्याचे प्रचारक ब्राह्मण पुरोहित वर्ग, हाच त्याला सर्वस्वी जबाबदार आहे.

अडीच हजार वर्षांपूर्वी सिद्धार्थ गौतमानें या वैदिक धर्माच्या प्रतिगामित्वाची लक्षणें ओळखून, त्या धर्माविरुद्ध प्रचार केला नि मानवांच्या कल्याणाचा, त्यांचा अभ्युन्नती घडवून आणणारा बौद्ध धर्म निर्माण केला. आणि त्या धर्माच्या तत्त्वज्ञानानें त्याकाळीं अखिल भारतीय जनता सर्वस्वी भारावून गेली. एवढेंच नव्हे तर सुमारें हजार बाराशें वर्षे त्या धर्मांचें अस्तित्व या देशांत राहिले. परंतु येथील वैदिक धर्ममार्तंडांनीं नाना खटपटी लटपटी करून, त्या धर्माची या देशांतून हकालपट्टी केली नि तेव्हांपासूनच या देशाच्या अवकळेस प्रारंभ झाला हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं.

कारण अनेक परकियांनीं या देशांवर हल्ले करून संपत्ति, स्वातंत्र्य नि प्राणांची अतोनात हानी केली. परंतु या आपत्तीला जबाबदार कोण तर म्हणे बौद्धधर्म नि त्याचे अहिंसा तत्वच कारणीभूत आहे. असा येथील कांहीं हिंदू धर्ममार्तंडांनीं उलटा कांगावा करून, ऐतिहासिक सत्य लपविण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला, या बाबतींत हिंदू धर्माचेच एक कट्टर अभिमानी नि विचारवंत आचार्य भागवत काय म्हणतात—

'भारताला जी ही अवनत कळा प्राप्त झाली आहे, या दोषाला जबाबदार कोण तर या देशांतील वैदिक धर्मीय बहुतांशीं जबाबदार आहेत. बुद्धकालानंतर भारतीय समाजाच्या अवनतावस्थेला प्रारंभ झाल्याचें स्पष्ट दिसतें. पण याची जबाबदारी बुद्ध किंवा महावीर यांच्यावर ढकलण्याची आमच्या हिंदू विचारवंतांची प्रथा मला मान्य नाहीं. बुद्ध आणि महावीर यांनीं निर्माण केलेले प्रश्न वैदिक बुद्धीवंतांना आकलन झाले नाहींत आणि सामाजिक अराजकतेला भिऊन, त्यांनीं जड परंपरा टिकविण्याचें जे आंधळे प्रयत्न चालविले, त्यामुळें भारतीय समाजाचा सामर्थ्यविनाश झाला असें माझें स्पष्ट मत आहे.' (महाराष्ट्रीय संत मंडळाचें ऐतिहासिक कार्य-प्रस्तावना)

उपरोक्त आचार्य भागवत यांचे विचार ऐकल्यानंतर या देशाच्या अधोगतीला कोण कारणीभूत झाले याचें आणखी निराळें विवेचन करण्याची गरज आहे, असें मला वाटत नाहीं.

आचार्य भागवत यांच्या मताप्रमाणें वैदिक धर्मांतील बुद्धीवंतांना

भ० बुद्धाचे विचार आकलन झाले नाहींत. अर्थात् हें उघडच आहे कीं स्वार्थ, श्रेष्ठत्व नि ऐतखाऊपणा यांच्या धुंदींत त्यांना बुद्धाचे विचार कसे आकलन होतील ? भ० बुद्धानें पाहिलें कीं, मुठभर ब्राह्मण लोक देवाधर्माचे जाळें निर्माण करून बहुसंख्य श्रमिक वर्गाला पद्धतशीर लुटीत आहेत. आणि त्यालाच धर्म व नीति असें संबोधण्यांत येत आहे. म्हणून भ० बुद्धानें पहिला तडाखा याच देवाधर्मावर हाणला. त्यामुळें भुसभुशीत पायावर उभारलेली ब्राह्मणी धर्माची चौकट पायासकट हादरली. बुद्धानें आपल्या सारखेच महान त्यागी सेवक हजारोंनीं तयार केले. नव्हें बुद्धीला पटणाऱ्या तत्त्वज्ञानाकडे ते आकर्षिले गेले. त्यांच्या सहाय्यानें सबंध भारतभर अनेक पर्यटनें केली. आणि जीर्ण वैदिकधर्म जमीनदोस्त केला. जवळ जवळ दीड हजार वर्षें भ० बुद्धाच्या साम्यवादी तत्त्वज्ञानाचा अमाल भारतावर चालला होता. इतकेंच नव्हें तर निम्मे आशिया खंड (पूर्वभाग) या विचारानें व्यापले होते. याचा प्रत्यक्ष पुरावा पूर्व आणि आग्नेय आशियांत आजहि आपणांस पहावयास मिळतो. जवळजवळ जगांतील (६० ते ७० कोटि), एकचतुर्थांश लोकसंख्या बुद्ध तत्त्वज्ञानाखालीं आज जगांत नांदत आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, या धर्माचे अनुयायी भारतांत मात्र अल्पसंख्यांक प्रमाणांत आहेत.

## भेदनीतीनें बौद्धधर्म लोपला पण तत्त्वज्ञान शिल्लक !

बौद्धधर्माच्या जन्मापासूनच त्याचे विरोधक—वैदिक आर्य ब्राम्हण त्याच्या नाशाची तयारी करण्यास कंबर कसून पुढें आले होते. कांहींनीं तर बौद्ध धर्मांतच प्रवेश केला. ते तेथें राहून भेदनीति करूं लागले. त्या भेदनीतीपैकीं त्या धर्मांत आपल्या वैदिक धर्माचे चमत्कार पूजा—विधि, अंधश्रद्धा आदि प्रकार घुसडून त्या धर्मांत 'महायान' पंथाची दुसरी शाखा निर्माण केली. एवढेंच नव्हें तर भ० गौतमाला विष्णूचा अवतार ठरवून पूजा—प्रार्थनेचें खूळ निर्माण केलें. जातककथामधून अनेक चमत्कृतीनिदर्शक कथा निर्माण केल्या, नि आपल्या वैदिकधर्माचा मुलामा त्या धर्मास चिकटवून त्यांस विपरीत स्वरूप आणलें.

त्याचप्रमाणें जे आर्यब्राह्मण-पंडित बाहेर राहिले त्यांनीं अविवेकी आणि सत्तापिपासू राजे लोकांवर आपल्या देवाधर्माची भुरळ घालून नि त्यांची तोंड फाटेपर्यंत स्तुतीस्त्रोत्रें गाऊन, त्यांना बुद्ध धर्माविरुद्ध चेतवण्याचें पद्धतशीर कार्य केलें. दोन्हीं बाजूंनीं असा मारा झाल्यामुळें बुद्धधर्म चिरडला गेला तर त्यांत काय आश्चर्य ? पण एवढें मात्र खरें कीं या साम्यवादी तत्त्वज्ञानानें या देशांतील लोकमतावर जी पकड वसविली ती आजतागायत सुप्तावस्थेंत कां होईना, तशीच आहे. बुद्धानें वैदिक संस्कृतीविरुद्ध नि ईश्वराच्या अस्तित्वाविरुद्ध बहुजनसमाजास पचणारे असे नवें तत्त्वज्ञान दिलें. आणि त्यांचा वैचारिक कायापालट घडवून आणला. 'रक्तपाता-शिवाय घडवून आणलेली, **निर्भेळ वैचारिक पायावर आधारलेली हीच जगांतील पहिली क्रांति होय.**' परंतु त्या क्रांतीचें तत्त्वज्ञान सदैव लोकाभिमुख ठेवण्यासाठीं भ० बुद्धानंतर कोणीहि खंबीर नेता न उरल्यानें नि विरोधी पाशवी शक्तीचा जोर बळावल्यानें त्या धगधगणाऱ्या तत्त्वज्ञानरूपी विस्तवावर राखेचे थरांवर थर बसत गेले. विझला मात्र नाही. अखेर त्या राखेच्या खालीं धगधगणाऱ्या इंगळावर फुंकर मारण्याचें कार्य अलीकडेच म्हणजे सन १९५६ सालीं याच देशांतील एका महान समाजसुधारकानें केलें. त्यांचें नांव डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

डॉ. बाबासाहेबांनीं या कार्याला जो हात घातला आहे तो अगदीं योग्य वेळीं नि राष्ट्राची योग्य गरज ओळखूनच घातला आहे. कारण आज आपला भारत स्वतंत्र आहे. अशावेळीं येथील जनता सुसंस्कृत, सज्ञान, सुशील, करुणा, प्रज्ञा-शील इत्यादि गुणांनीं युक्त नसेल तर राष्ट्राचा अभ्युदय केव्हांहि दृष्टिपथांत येऊं शकणार नाहीं. आणि हें साध्य गांठण्यासाठीं एकच मार्ग शिल्लक आहे नि तो म्हणजे '**बुद्धतत्त्व**' त्या शिवाय कोणताही धर्म हे समाजसुधारणेचें कार्य करूं शकणार नाहीं.

म्हणून या देशांतील झाडून साऱ्या समाजसुधारकांनीं नि राष्ट्रहितेच्छु देशभक्तांनीं डॉ. बाबासाहेबांच्या या कार्यास मदत करून नि त्यांच्या सदिच्छेची कदर करून, या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठीं निर्भयतेनें सरसावून पुढें यावे हीच या नवोदयोन्मुख भारत देशाची सर्वांना कळकळीची हांक आहे.

जय भारत । नमो बुद्धाय ।

—०—

ग्रंथालय, ठाणे.
७३६०८
............ दि: ..........